# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९१२०७४०३**

**किटाळ**

**लक्ष्मण माने**



## 'उपरा'नंतरचे दाहक आत्मकथन

''लक्ष्मण, ज्या जनतेने फुलांच्या हारांच्या डोंगरावर उभे केलं होते, त्याच जनतेने गळ्यात जोड्यांच्या माळा घातल्या होत्या. म्हणून घाबरायचं नाही. तीच आई पुन्हा माया करायला लागते.''

'उपरा'कार लक्ष्मण माने यांच्या उपरानंतर आलेली अनेक पुस्तके ही त्यांच्या जीवनप्रवासाची सांगाती आहेत. हागणदारीच्या कुशीपासून विधान परिषदेपर्यंतचा प्रवास सगळ्यांना ठाऊक आहे. अनेक सामाजिक चळवळी, आंदोलने, जातीनिर्मूलनापासून ते भटक्याविमुक्ताना त्यांच्या मार्गापासून दूर करून सामाजिक प्रवाहात आणण्यासाठी केलेले मोठे कार्य, शिक्षणाचे महत्त्व ओळखून जागोजागी स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्था, आश्रमशाळा, वसतिगृहे, असा आयुष्याचा मोठा पट, केवळ समाजासाठी वाहिलेला, जगलेला, अनुभवलेला, अर्पित केलेला! साहित्यिक आणि कार्यकर्ता म्हणून असलेले स्थान त्यांना मिळालेल्या पद्मश्रीने अधोरेखित केले, गौरवांकित केले. लक्ष्मण माने हे सगळ्यांचे झाले. सर्व स्तरांचे झाले. परंतु अशी व्यक्ती जेव्हा कर्तृत्वाच्या एका टप्प्यावर पोहोचते तेव्हा तिला पुढे घेऊन जाणाऱ्या वाटेला वाकवण्यासाठी काही शक्ती प्राणपणाने एकवटतात, वाट अवरोधित करून टाकतात, पाय पुतळ्यासारखे तिथेच गाडले जातील याची काटेकोरपणे काळजी घेतात. मग पुढचे सारेच अंधारमय होत जाते, मागे फिरण्याची वाट तर आधीच खोदून नाहीशी केलेली असते. उरते ते माथ्यावर रणरणारे ऊन आणि पायाखाली धगधगती माती. सूर्याला ग्रहण लागते, चंद्राला ग्रहण लागते, तसे हे एका टप्प्यावरचे ग्रहण आहे, अशी त्याची भलामण केली जाते. पण तो थांबलेला काळ किती जीवघेणा असतो, हे फक्त त्यालाच कळू शकते, ज्याच्या नशिबी हे आले आहे. लक्ष्मण माने यांनी हे ग्रहण अनुभवले आहे, प्राणपणाने झेलले आहे आणि त्यातून ते सहीसलामत बाहेर देखील पडले आहेत. परंतु तो काळाकुट्ट कालखंड मागे कसा टाकणार? सारे आयुष्य पणाला लावणारा हा कालखंड म्हणजे अग्निपरीक्षाच होती, त्याने सोसायला लावलेला दाह आणि आयुष्यावर कोरून ठेवलेल्या खुणा कशा लपवून ठेवणार? त्या ग्रहणकालात अनुभवलेले, सहन केलेले, जे अमानुषपणाचे होते, त्याचे वर्णन म्हणजे 'किटाळ' होय.

लक्ष्मण माने यांनी स्थापन केलेल्या संस्थेत सेवा करीत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांनी लक्ष्मण माने यांच्या विरोधात बलाकाराचे दावे पोलीससस्टेशनात दाखल केले, एक दोन नाही, तब्बल सहा दावे. तेही चांगले दहा पंधरा वर्षांपूर्वीच्या काळाचे. यातले सत्यासत्य बाहेर पडेपर्यंत पोलीस आणि न्याययंत्रणा कामाला जुंपली जाते. या यंत्रणेचा खाक्या सगळ्यांनाच ठाऊक आहे. तिच्या अंमलाखाली भरडणे म्हणजे काय असते, हे मात्र जो अनुभवतो त्यालाच ते चांगल्याप्रकारे अनुभवाने कळत जाते. लक्ष्मण माने यांच्या विरोधात असे दावे दाखल झाल्यानंतर त्यांच्यामागे लागलेला ससेमि रा, त्यापासून वाचवण्यासाठी त्यांना करावी लागलेली धडपड, न्यायालयीन लढाई, पोलिसी तपास, पोलीस कोठडी, न्यायालयीन कोठडी, वकील, साक्षीपुरावे, असे एक मोठे विवर निर्माण झाले. ज्याच्या तळाशी लेखक सापडले. हे विवर म्हणजे शिकार करण्यासाठी तयार केलेले मायावी जाळे. ज्यातून सावज सहजासहजी सुटणार नाही, मरणांत अशा यातना सहन करीत आयते हाती सापडते, तसे ते सापडले.

बलात्काराची केस पोलिसस्टेशनात दाखल झाल्यानंतर लेखक एकटे उरत नाहीत. त्यांच्यासोबत त्यांचे कुटुंबीय आहे. या सगळ्यांची ससेहोलपट सुरू होते. मानसिक छळ सुरू होतो. सामाजिक बहिष्काराचे डोंगर समोर येतात, आर्थिक घडीला सुरुंग लागतो. आणि कधीही स्वप्नात केली नसेल अशी वागणूक नशिबी येते. पोलीस कोठडी काय असते, तुरुंगाच्या भिंतीआडचे जग कसे असते, पोलीस तपासाच्या तऱ्हा कशा असतात, हे सारे सर्वप्रकारचे छळ करणारे अनुभव लेखकाच्या वाट्याला आले आहेत. ते सहन करताना आत्महत्येचे विचार मनात न आले तरच नवल!

लेखकाचे हे 'उपरा'नंतरचे पुढचे आत्मकथन आहे. लेखकाने उपरात आपल्या जगण्यातला संघर्ष वर्णन केलेला आहे. तो समाजाने लादलेला, जातीय व्यवस्थेने जखडलेला आणि जन्माच्या नाळेने बांधलेला होता. परंतु किटाळमध्ये आलेला संघर्ष एका विशिष्ट हेतूने लादलेला आहे. मूठभरही नसलेल्या माणसांनी आपली सूडबुद्धी प्रज्ज्वलित करून तिच्यात लेखकाला जाळण्याचा प्रयत्न केलेला आहे. यात अनेक हेतू आहेत, काही शक्ती कार्यरत आहेत. परंतु लेखकाने त्याचे वर्णन करताना कुठेही आपले लेखकत्व वैयक्तिक पातळीवर आणलेले नाही, की आपल्या लेखनधर्माचा विसर पडू दिलेला नाही. 'उपरा' वाचत असताना जे लक्ष्मण माने आपल्यासमोर लेखक म्हणून उभे होते, ते तसेच या 'किटाळ'मध्येही उपस्थित आहेत. कुठलाही आततायीपणा, अन्याय अन्याय, सूड, मानहानी, असा आक्रोश नाही. अशा दाहक प्रसंगी एक लेखक अन्य कुणा व्यक्तिरेखेचे चित्रण करील, तसेच चित्रण तावूनसुलाखून निघाल्यानंतरही त्यांनी अतिशय संयमितपणे केलेले आहे. 'सत्याला मरण नसते. सत्य धारदार बनते तेव्हा ते काळीज चिरत जाते.' 'बाईने आंघोळ केली की पुरावा नष्ट.' अशी वाक्ये ते सहजपणे लिहून जातात. आपले कुटुंबीय, आप्त, मदत करणारे, यांच्याविषयीची कृतज्ञताही ते व्यक्त करतात. 'मी टू' (बाई खोटे कशाला बोलेल हो? तिच्या अब्रूचा खेळ ती का मांडील?') आणि 'अट्रॉसिटी' यांचा वापर कसा होऊ शकतो याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे 'किटाळ' होय. यातले मानसिक द्वंद्व हे एक झाड दोन पक्षी याचे स्मरण करून देते. जे लेखकाच्या सोबत वाचकालाही पुन्हा पुन्हा विचार करायला लावते.

सतीश भावसार यांनी या ग्रंथाचे मुखपृष्ठ सजविलेले आहे. अंगावर फेकलेला चिखल अशी कल्पना इथे दृश्य स्वरूपात साकारलेली दिसते. हा चिखल आहे की आत्म्यातून करपून झिरपलेले रक्ताचे अवशेष आहेत, याचे द्वंद्व व्यक्त करणारे, अंतर्मुख करायला लावणारे तसेच खिळवून ठेवणारे मुखपृष्ठ आहे.

**मूल्य ३०० रुपये   सवलतीत १८० रुपये**

# ग्रंथपान

**लाल माती**
**शब्दांकन : विश्वास पाटील**




**हिंद केसरी आणि महाराष्ट्राची लाल माती**

'माझ्या दृष्टीने काशी पैलवानाबरोबरची ही लढत म्हणजे माझ्या पैलवानकीच्या वाटचालीत महत्त्वाची लढत ठरली. या कुस्तीने मला मोठी इज्जत दिली, मानसन्मान दिला. आत्मविश्वास दिला. पैसा दिला आणि खऱ्या अर्थाने मल्ल म्हणून मला स्वतंत्र ओळख दिली. माझ्या 'हिंदकेसरी'च्या वाटचालीतील हे पहिले पाऊल होते.'

कुस्ती हा खेळाचा एक प्रकार आहे, हा खेळ वैयक्तिक आहे, इतके वरवर पाहून चालणार नाही. त्यासाठी लागणारी मेहनत, चिकाटी, सराव, शरीरयष्टी, खुराक, तालीम, वस्ताद, पाठबळ, संधी, अशा अनेक बाबींची आवश्यकता असते. एकटा पैलवान असून भागत नाही, त्याला आकार द्यावा लागतो, पाठीशी खंबीरपणे कुणीतरी उभा असावा लागतो. सुदैवाने महाराष्ट्राने या खेळात नेहमीच आपला दबदबा कायम राखलेला आहे. महाराष्ट्र आणि कुस्ती हे एक समीकरण या क्षेत्रात असणाऱ्या सगळ्यांनी मान्य केलेले आहे. असे असले तरीही सांगली आणि कोल्हापूर यांचे वर्चस्व इतर जिल्ह्यांच्या तुलनेत कायमच श्रेष्ठत्वाच्या पातळीवरचे राहिलेले आहे, हे कुणीही मान्य करील. 'महाराष्ट्र केसरी' आणि 'हिंद केसरी' हे कुस्तीतील मानाचे पुरस्कार समजले जातात. हे पुरस्कार मिळविणारे कुस्तीगीर याच शहरांत असलेल्या तालमीतून घडलेले आहेत. शाहूपुरी तालमीचे श्रीपती खचनाळे हे १९५९ साली झालेले पहिले हिंदकेसरी, मग हजरत पटेल, तेही याच तालमीचे. मारुती माने हे सांगलीच्या कवठेपिरान तालमीचे, तर मोतीबाग तालमीचे गणपतराव आंदळकर हे हिंद केसरी झालेले. म्हणजे तसा आलेख काढला तर हे दोन्ही पुरस्कार महाराष्ट्रात आणलेले आहेत ते या दोन्ही जिल्ह्यातील तालमींनी. त्याच परंपरेत शोभणारे आणखी एक नाव आहे, दीनानाथसिंह, कोल्हापूरच्या गंगावेस तालमीचा हिंदकेसरी पैलवान, ज्याने प्रथमच या तालमीसाठी हा पुरस्कार मिळवण्याची कामगिरी उत्तम प्रकारे पार पाडलेली आहे.

दीनानाथ मूळचे कोल्हापूरचे नाहीत. ते आहेत उत्तर प्रदेशातील. पोटापाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी मुंबई गाठली, पण लौकिक मिळवला तो कोल्हापूरचा पैलवान म्हणून. यासाठी पाठबळ आणि माणूस पारखून घेणारी माणसे पाठीशी असावी लागतात, तशी ती त्यांना लाभली, हिऱ्याला सोन्याच्या कोंदणात बसवणारी. ती होती, खाशाबा जाधव, वसंतदादा पाटील, बाळासाहेब देसाई, शरद पवार, मारुती माने, दारासिंग. दीनानाथ यांचा मुंबई ते सांगली व नंतर कोल्हापूर असा प्रवास झाला तो या मान्यवरांच्या आग्रहामुळे आणि कुस्तीवरील प्रेमामुळे. या तालमींमधील लाल माती, इथे असलेले कसदार वस्ताद आणि सहकारी मल्ल यांच्या सहवासात दीनानाथ महाराष्ट्र केसरी झाले आणि खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे झाले. मुंबईच्या प्रत्येक मैदानावर त्यांनी त्या काळच्या नामांकित पैलवानांशी लढत दिली. महाराष्ट्रात ज्या-ज्या ठिकाणी कुस्त्या आयोजित होत, तेथे जाऊन लढती दिल्या. दिल्ली, राजस्थान अशा भारतातील मोठ्या शहरात झालेल्या कुस्त्यांमध्ये भाग घेतला. भल्याभल्या नामांकित पैलवानांना अस्मान दाखवत लाल मातीत लोळविले. स्वतः कधीही स्वतःची पाठ लाल मातीला पाठ लावू दिली नाही. अशा या दीनानाथ नावाच्या पैलवानाने कुस्तीसाठी असलेले सगळे मानाचे पुरस्कार आपल्या मेहनतीच्या, शक्तीच्या आणि डावपेचाच्या युक्तीने जिंकलेले आहेत. हे यश मिळवताना त्यांनी स्वतःचे वर्चस्व निर्विवादपणे भारतभर प्रस्थापित केले, तसा आपल्या तालमीचा, आपल्या कोल्हापूर – महाराष्ट्राचा आणि त्यांच्या उत्तरप्रदेशाचा लौकिकही सिद्ध केला. या सगळ्यांना प्रतिष्ठेचा सन्मान मिळवून दिला. अभिमान वाटावा असे या सगळ्याचे वर्णन या चरित्रात आले आहे.

कुस्ती ही केवळ त्या पैलवानाची नसते. त्यामागे वस्ताद, तालीम, मदत करणारे सहकारी, गाव या सगळ्यांच्या प्रतिष्ठेचा विषय असतो. बाळासाहेब देसाई यांनी दाखवलेले प्रेम हे खेळाइतकेच आपल्या पैलवानाच्या प्रतिष्ठेला शोभणारे म्हणावे लागेल. वस्ताद पैलवानाकडून किती आणि कशी मेहनत करून घेतात, हा एक थक्क करणारा अनुभव ठरावा. बाराशे ते पंधराशे जोर मारणे, पाठीवर पैलवानाला घेऊन मेहनत करायची तर खुराकही तसाच आला. दूध, तूप, बदाम, थंडाई, मटण, सोन्या-चांदीचे भस्म, आकणी, यांचे प्रमाण आज सांगूनही कुणाचा विश्वास बसणार नाही, पण हे वास्तव आहे. महाराष्ट्र केसरी हा महाराष्ट्राचा पुरस्कार, 'हिंद केसरी' हा राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार, तसेच 'भारत केसरी', 'रुस्तुम ए हिंद', 'भारत भीम' अशा पुरस्कारांची ओळख या पुस्तकातून करून दिलेली आहे. काशी यादव, मारुती माने, गणपत आंदळकर, श्रीपती खचनाळे, मारुती वडार, मा. चंदगीराम, सतपाल, हरिश्चंद्र बिराजदार, त्या काळी गाजलेले हे पैलवान, त्यांची वैशिष्ट्ये, कुस्ती खेळण्यातले कौशल्य, त्यांची निर्माण झालेली स्वतंत्र ओळख, डावपेचावर असलेली त्यांची हुकूमत, त्यांनी गाजवलेली कारकीर्द यांचीही माहिती यात दिलेली आहे. ही माहिती कुस्तीचे दोन हात करताना पैलवानाने माहीत करून घेतलेली असते, अशा ओघात दिलेले आहे. त्यामुळे होणारी कुस्ती कुणासोबत आहे याचा अंदाज करणे सोपे जाते. ढाक, एकलांगी, एकेरी पट,दुहेरी पट, मुलतानी, यासारखे युक्तीने डाव वापरून मैदान जिंकता येते, ते येथेच कळते. त्यावेळी असलेले खुराकाचे दर, नेत्यांचे औदार्य, कुस्तीशी असलेले नाते, यासगळ्यांचे वर्णनही यात आलेले आहे. स्वतःची कौटुंबिक परिस्थिती, रीतीरिवाज, बहिणींची लग्ने, यांचेही तपशील सोबत आहेत.

विश्वास पाटील यांनी केलेले शब्दांकन हे अतिशय उत्तम झालेले आहे. यात लेखक डोकावणार नाही याची काळजी घेताना चरित्रनायकाच्या भूमिकेला पूर्ण न्याय मिळेल याची त्यांनी घेतलेली काळजी लक्षात घेण्यासारखी आहे. भाषाशैलीही सहज आणि चपखल आहे.

पुस्तकाचे अर्थपूर्ण मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी रुजवले आहे.

**मूल्य १५० रुपये सवलतीत ९० रुपये**

# ग्रंथपान

**अस्वस्थ तांडा**
**डॉ. विजय जाधव**




**अस्तित्व जपलेल्या वस्तीवरील संस्कृती**

'तांडा म्हणजे भीषण दारिद्र्य! ढोरकष्टाला जुंपलेली आणि घाम गाळणारी मजबूत जमात! संकटं आणि प्रश्नांना आपल्या पायाशी लोळण घालायला विवश करणारी जमात! धैर्यवान तरीही दारिद्र्याशी पक्की नाळ जुळलेली. कितीही कष्ट केले तरी थकून अंथरुणावर न पडणारी. नाचगाणी, डफडी बडवायची आणि अशा बेधुंद अवस्थेत कितीही रात्र झाली याचं भान नसणारी! इतर कष्टकरी इतके कुठं उत्साही, कलाप्रेमी असतात?'

गाव, शहरापासून दूर असलेली, डोंगरकुशीच्या आश्रयाने राहणारी कष्टाळू आणि काटक मनुष्यवस्ती म्हणजे तांडा. वाटेल ते आणि वाटेल तितके कष्ट करायची तयारी आसलेली ही माणसे, हाताला काम असते तेव्हा वाघ असतात पण काम नसते तेव्हा गाय होऊन राहण्याची वेळ त्यांच्यावर येते. पावसाळ्यात मोजकेच दिवस काम. पुढे जेव्हा ऊसतोडीचा हंगाम सुरू होतो तेव्हा या हातांना पुन्हा काही महिन्यांसाठी काम मिळते. तेवढेच. त्यामुळे दारिद्र्य पाचवीला पूजलेले असल्यासारखे कायम त्यांची सोबत करीत राहते. ही गरिबी या कथांच्या मध्यभागी आहे. ती माणसांना कुठल्या थरापर्यंत घेऊन जाते हे वेगळे सांगायला नको.

ऊसतोडीला जावे लागत असल्याने मुले शिक्षणपासून वंचित राहतात, हा यातला सगळ्यात मोठा धोका. दुसरा राक्षस आहे तो 'हुंडा' नावाचा. हुंडा दिल्याशिवाय मुलीचे लग्न होत नाही. हा हुंडा एकाला गरिबीत हात देतो तर दुसऱ्याला फाशीचा दोर जवळ करायला भाग पाडतो. कर्जमाफीच्या नावाखाली फसवणारे लांडगे आहेतच. ते गरिबाच्या असहायतेचा फायदा घेण्यात कुठलीही कसर ठेवीत नाहीत. ही गरिबी दूर करण्यासाठी कधी कधी अंधश्रद्धेची ही माणसे बळी ठरतात, त्यासाठी अघोरी कृत्ये करायला तयार होतात, तेही या कथांमधून आले आहे.

मानवी स्वभावाचे दर्शनही या कथांमधून प्रभावीपणे घडत जाते. 'अस्वस्थ तांडा' या कथेतील बेबी संताप अनावर होतो तेव्हा सासऱ्याचा कुऱ्हाडीने खून करायला मागेपुढे पाहात नाही. मुलीचा गर्भपात करायला निमूटपणे मान तुकवणारी विद्या वेगळेच वास्तव समोर आले, तेव्हा बेभान झालेली विद्या 'दणका' कथेत पाहायला मिळते. परिस्थिती आणि घरातले संस्कार यांच्यात स्वप्नांचा चुराडा झालेला अनिरुद्ध कसा हतबल ठरतो याचे वर्णन 'चुराडा' या कथेत आले आहे. एसटीच्या ड्रायव्हरशी लग्न केल्यानंतर नशिबी आलेल्या आजाराची शिकार ठरलेली रीमा, शिक्षण झालेले असूनही बेरोजगारी वाट्याला आलेला रमेश आणि कंडक्टर म्हणून एसटीत लागलेली श्रद्धा, यांचा तडजोडीचा संसार, या विविध व्यक्तिरेखा समर्थपणे साकारलेल्या आहेत. कस्तुरी, हळद या कथा हेलावून टाकणाऱ्या आहेत. खुंटीला टांगलेले दप्तर बालविश्व उभे करते तशी अगतिकताही!

तांड्यावर असलेल्या प्रथा, रिवाज, संस्कृती यांचे दर्शन या कथा घडवतात. मुलीच्या अंगाला लग्नाची हळद लागली तर ती लग्न झाल्यानंतरच धुतली जाते. ठरलेला वर लग्नासाठी आला नाहीतर तिचे लग्न दुसऱ्या वराशी लावले जाते. ज्याच्या घरात कुणाचा मृत्यू झालेला असेल तर तांड्यावरील इतरजण येऊन त्या घरात दिवाळीचा दिवा लावतात आणि घराची पूजा करतात. पितृअमावस्येला पितरं घातले जात नाही, दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी आणि होळीच्या दुसऱ्या दिवशी सकाळी घालतात. त्याला बंजारा बोलीत 'धबुकार' म्हणतात. अशा इतरही चालीरिती इथे वाचायला मिळतात.

लेखक ज्या संस्कृतीतून आलेले आहेत, त्या संस्कृतीत रुजलेल्या भाषेचा गंध काही वेगळाच म्हणयला हवा. वाचकाच्या सोयीसाठी तिचा अर्थही सोबत दिलेला आहे. ही भाषा परखड, स्पष्ट आणि सडेतोड आहे, थेट आशयाला भिडणारी. तिथे असणारे वाक्प्रचार, गाणी, यांचाही उपयोग या लेखनात चपखलपणे केलेला आहे. यातून दुर्गम आणि दुर्लक्षित राहिलेल्या एका संस्कृतीचा परिचय होत जातो. लेखकाची भाषा सरळ आणि आशयाला न्याय देणारी असेल तर ते लेखन अधिक प्रभावी होते, तसे हे लेखन प्रभावी झालेले आहे. यात ओघाने आलेली वाक्ये पाहिली की, लेखकाच्या प्रतिभेचा आवाका लक्षात येतो. जसे, 'सोन्यासारख्या जीवनाचं अल्युमिनियम झालं. झक मारली अन् लग्न केलं!' 'हा कारखाना ऊसाचे केवळ ट्रकच पोटात रिचवत नाही तर गोरगरिबांची आयुष्येही तो खाऊन टाकतो.' 'ढग आले तं पाऊस नाही. आलाच पाऊस तं पेरणीला पैसे नाहीत. माणसाचं डोस्कं कसं चालेल?' वास्तव मांडण्यात लेखकाची अस्वस्थता वारंवार अनावर होत असूनही कथांचा तोल बिघडणार नाही याची खूप संयमपूर्वक काळजी घेतलेली दिसून येते. जे सांगायचे ते सांगण्यात ते यशस्वी झालेले आहेत, असे खात्रीने म्हणता येते. कथांना हवे असलेले तंत्र, पारंपारिकता, यापासून या कथा मुक्त आहेत. त्यांची मांडणी एका रेषेत येत नाही. परंतु त्यांच्यातले सच्चेपण, आशयाची सखोलता, वास्तवाचे प्रत्ययकारी चित्रण, यामुळे या कथांना स्वतःचा बाज लाभलेला आहे. उद्याचा एक आश्वासक लेखक म्हणून त्यांच्याकडून अपेक्षा करणे वावगे ठरणार नाही ते यामुळेच.

डॉ. प्रकाश राठोड यांची मर्मग्राही अशी प्रस्तावना या पुस्तकाला लाभलेली आहे. तसेच लेखकाचे स्वतःचे मनोगतही आवर्जून वाचावे असे आहे.

सतीश भावसार यांचे मुखपृष्ठ या पुस्तकाला लाभलेले आहे. तांड्यावरील चित्र स्त्रीवेषातून साकारले आहे. अंगभर आभूषणे, तितकीच आभूषणे रंगीत वस्त्रांवर आणि कडेवर मूल, हा इथला जगण्यातला अभिन्न भाग. पाठीमागचे पाल हे सतत होणाऱ्या स्थलांतराचे प्रतीक. आशय आणि शीर्षक यांचा समन्वय साधणारे सुरेख मुखपृष्ठ लक्ष वेधून घेते.

**मूल्य १५० रुपये   सवलतीत ९० रुपये**

# ग्रंथपान

## काळे आकाश निळा प्रकाश

**डॉ. प्रमोद सलगरकर**




**कवड्याशा वरील काळे डाग**

'मुलांचे शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम ठेवायचे असेल तर त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे. मुलांना त्यांचे सर्व प्रकारचे प्रश्न मोकळेपणाने व निर्भयपणाने मांडता येण्यासा एक मुक्त व्यासपीठ असले पाहिजे. काही अत्यंत वैयक्तिक प्रश्न कौन्सिलर किंवा थेरपिस्टच्या मदतीने सोडवता येतील. मुलांची बरीचशी सायकॉलॉजिकल एनर्जी अशा निरर्थक व दिशाहीन संघर्ष व तणावामुळे वाया जाऊ नये.'

एड्स या भयानक रोगाविषयी अनेक समज गैरसमज समाजात पसरलेले आहेत. रुग्ण, नातेवाईक आणि समाज या सगळ्यांचा या रोगाकडे पाहण्याचा दृष्टिकोण अतिशय गंभीर आणि तितकाच तिरस्कार भरलेला आहे. या रोगाने घातलेले थैमान १९९० चाली भयानक स्वरूपाचे असल्याचे जागतिक तपासणी अहवालात निष्कर्ष द्वारे स्पष्ट झाले. या आजाराविषयी चिकित्सक पद्धतीने तपासणी करून मुळापर्यंत जाण्याचा प्रयत्न झाला. यात या रोगाची सगळी वर्तुळे स्त्रियांच्या भोवती फिरत असल्याचे लक्षात येते आणि या वर्तुळात केवळ स्त्रिया सापडल्या आहेत असं नाही तर पुरुष देखील यात सापडलेले आहेत. आणि पुढचा निष्कर्ष असा की पुरुषांच्या मुळेच हा रोग स्त्रियांकडे संक्रमित झालेला आहे. अशा या वर्तुळाने एक मोठा परीघ निर्माण केलेला आहे. या सगळ्याची उत्पत्ती, उपाय, परिणाम, समाज, वैद्यकशास्त्र, राजकीय दृष्टिकोन आणि मानसिकता या अंगाने तपासणी करणे व त्यावर मोकळेपणाने चर्चा करणे आवश्यक असल्याचे दिसून येते. याविषयी डॉक्टर सलगर यांनी अतिशय मेहनतीने आणि तितक्याच चिकित्सकपणे हा विषय या पुस्तकात मांडलेला आहे. डॉक्टर सलगर हे कन्सल्टंट सर्जन म्हणून काम पहात आहेत. त्याचबरोबर ते केअर अंड सपोर्ट युनिट फॉर पीपल लिविंग एच आय व्ही, चैतन्य हॉस्पिटल, चौपाड, सोलापूर येथे हे काम पहात आहेत. याशिवाय इतर वैद्यकीय संस्थांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग आहे. कार्ल रॉजर्स यांच्या मानसोपचार पद्धतीवर विश्लेषणात्मक या ग्रंथाचं लेखन त्यांनी केले आहे. गेल्या पंधरा वर्षापासून एचआयव्ही एड्सग्रस्त रुग्णांच्या बरोबर काम करीत आहेत त्यामुळे या विषयाचा सर्वांगीण विचार आणि सखोल चर्चा या पुस्तकात मांडलेला आहे. रोग आणि त्याचे निवारण हे केवळ वैद्यकीय विज्ञानाच्या अंतर्गत सोडविण्याचे विषय नसून आजाराचे बहुआयामी स्वरूप समजावून घेतल्याशिवाय त्यावर निर्णयाक उपाय योजना करता येणे शक्य नाही, हे सत्य एड्सने रेखित केले आहे. एचआयव्हीचा अभ्यास हा एका अर्थाने माणसांचा अभ्यास आहे. या अभ्यासातून अनुभवास आलेले संचित सुजाण वाचकांसमोर ठेवण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. या विषयाच्या अंतरंगात पहाताना लैंगिक भावनांचे शास्त्रीय विश्लेषण केलेले आहे त्यासाठी त्यांनी फ्रॉइड, युंग, सार्त्र यांच्या शास्त्रीय दृष्टिकोनांचा संदर्भ यात दिलेले आहे. तसेच माणसाच्या लैंगिक प्रेरणा व लैंगिक वर्तन, जीवशास्त्रीय प्रेरणा, सखोलता, व्यापकता आणि व्यामिश्रता यांचाही शोध या पुस्तकात घेतलेला आहे. अनेक रुग्णांची अनुभवाच्या आधारावर माहिती, त्यांचे अनुभव यात दिलेले आहेत. या आजारात सापडलेल्या रुग्णांची संख्या आकडेवारीसह दिलेली आहे. हा आजार मुळात आफ्रिकन देशातून सर्वत्र फैलावला असा समज आहे परंतु अमेरिकेसारख्या प्रगत देशातही याचे अस्तित्व आहे त्याचप्रमाणे भारतासह अन्य अनेक देशांचा समावेश आहे. मूळ शब्द पॉर्न, प्रॉस्टिट्यूट असा शब्द ग्रीकमध्ये आहे तो परनेम या क्रियापदापासून घेतला आहे. याचा अर्थ विकणे. देहविक्री असा यातून निघालेला अर्थ. कसल्याही प्रकारची कायदेशीर मान्यता किंवा सुरक्षितता नसल्यामुळे या व्यवसायाचे झपाट्याने गुन्हेगारीकरण झाले आहे. स्त्रियांवर होणारे अत्याचार, बळजबरी आणि केवळ भूक भागविणे या भूमिकेतून केली जाणारी कृती एवढेच याचे स्वरूप राहिले आहे. यामुळे आज अनेक संस्था या व्यवसायात आलेल्या स्त्रियांना कायदेशीर संरक्षण आणि त्यांचे पुनर्वसन व्हावे यासाठी प्रयत्न करीत आहेत. संपूर्ण अभ्यासानंतर औषधोपचाराने एड्स नियंत्रणात राहत असला तरी त्याचे समूळ निर्मूलन होऊ शकत नाही याकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

प्रतिबंधक औषधांचा वापर आणि लैंगिक वर्तना बद्दलचा सारासार विवेक हेच या प्रश्नावर खरे उत्तर आहे. या विषयाची मांडणी करताना लेखकाने वेगवेगळे विभाग केलेले आहेत. विषय समजावून सांगताना त्यात वैद्यकीय शब्दांचा इंग्रजी वापर टाळलेला आहे त्यामुळे हा विषय समजणे सोपे झालेले आहे. लेखक स्वतः वैद्यकीय सर्जन असूनही त्यांच्या लेखनात सहज सोपेपणा आहे. अनेक संदर्भांचा उपयोग केल्याने या लेखनाला बहुमोल असे मूल्य लाभलेले आहे. कलकत्ता येथील सोनारा वस्ती आणि उपचार केंद्र, वेगवेगळ्या ठिकाणी सुरू असलेले उपचार केंद्र यांची माहिती येथे दिलेली आहे

या पुस्तकाला डॉ. यश वेलणकर यांची प्रस्तावना लाभलेली आहे. ही प्रस्तावना केवळ लेखकाचे कौतुक करीत नाही तर या संपूर्ण विषयाचा साकल्याने विचार मांडलेला आहे. त्यामुळे हा विषय अधिक व्यापक आणि समावेशक असा झालेला आहे. लेखकाने स्वतःचे मनोगत दिलेले आहे. लेखनामागील भूमिका, उद्देश आणि त्यांचा अनुभव याविषयी त्यांनी प्रांजळपणे लिहिले आहे. हे एकूणच पुस्तक या विषयावरील एकमेव असावे असे वाटते. विषयाचे गांभीर्य, पुरुष आणि स्त्री यांची लैंगिकता, पुरुषसत्ताक पद्धतीचा दृष्टिकोन, माणसाची मानसिकता, रुग्णाचे अंतकरण, या सगळ्याचा साकल्याने विचार केलेला विचार हा प्रथमच वाचनात आलेला आहे त्यामुळे या विषयाची माहिती घेऊ इच्छिणाऱ्या, अभ्यास करू इच्छिणाऱ्यांसाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल. एका मोठ्या समस्येवर लेखकाने मोठ्या धैर्याने एक उत्तम पुस्तक लिहिले आहे, यासाठी त्यांचे अभिनंदन करायला हवे. शिरीष घाटे यांचं आकृतिबंध स्पष्ट करणारे मुखपृष्ठ सूचक आहे.

**मूल्य २५० रुपये   सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**जातिव्यवस्था आणि महाराष्ट्रातील जाती–जमाती**
**सुनिल सांगळे**




## अस्वस्थ कोंडीच्या तळाशी जाणारे लेखन

'आज जरी विविध जातीत विवाह होत नाहीत आणि ती स्थिती मागील दोन हजार वर्षे तशीच आहे असे गृहीत धरले तरीही भारतातील जातिसंस्थेतील कोणतीही जात ही संपूर्णपणे एकाच रक्ताची आहे असे समजणे हा फार मोठा गैरसमज आहे. मनुमृतीतील नियम पाळून विविध वर्णांतील स्त्रियांचे विवाह हे इतर वर्णांतील पुरुषांशी होणे शास्त्रसंमत होते. असे असताना भारतीय जातिव्यवस्थेत कोणतीही जात किंवा वंश शुद्धतेचा दावा करू शकत नाही.'

'जातिव्यवस्था आणि महाराष्ट्रातील जाती–जमाती' हा सुनील सांगळे यांनी लिहिलेला ग्रंथ ग्रंथालीने प्रकाशित केला आहे. जात आणि तिची व्यवस्था, चातुर्वर्ण्य व्यवस्था, उच्च–नीचता, स्पृश्यास्पृश्य, हे विषय म्हणजे समाज व्यवस्थेला चिकटलेले गेंड्याचे कातडे आहे. त्याने समाजमनाला असे जखडून ठेवलेले आहे की, भल्याभल्या सुधारकांना त्याला भेदण्यात हवे तसे यश मिळू शकलेले नाही. जात आणि तिला जोडून आलेल्या इतर व्यवस्थांसाठी आपण नेहमीच 'मनुस्मृती' या ग्रंथाला शीर्षस्थानी ठेवलेले दिसते. परंतु लेखकाने घेतलेल्या शोधानुसार कौटिल्याचे अर्थशास्त्र, नारद स्मृती, बृहस्पती स्मृती, विष्णू स्मृती, वशिष्ठ धर्मसूत्र, आपस्तंब धर्मसूत्र, गौतम धर्मसूत्र यांसारखे आणखी आधार मिळाले, जे मनुस्मृतीच्याही अगोदर धर्मग्रंथ म्हणून मनुस्मृतीसारखे सामाजिक बंधनांचे व नियमांचे संगोपन करीत होते.

स्पॅनिश आणि पोर्तुगीजमधून आलेला 'कास्ट' हा शब्द जात या शब्दाच्या मुळाशी आहे. जात हा एक सामाजिक गट असून त्याचे सदस्यत्व त्या गटाचे सदस्य असलेल्या आईबापाच्या पोटी जन्म घेतल्याने मिळते. आणि या गटातील सर्व सदस्य या गटाबाहेर विवाह न करण्याच्या अत्यंत कठोर सामाजिक नियमाने बांधील असतात, असे डॉ. केतकर सांगतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही याच्याशी सहमती व्यक्त केलेली आहे. मूळ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र असे चार घटक परंतु यांच्यात जी इतर जातीय घटकांची भर पडली ती या चार घटकातील संकरातून. अम्बष्ठ, निषाद, सुत, मागध, चांडाळ, उग्र अशी नावे आली ती याच परस्पर विरोधी घटक संकरातून. पुढे ही पोटजातींची संख्या आणखी वाढत गेली. ती कशी, कोणती, यांची माहिती लेखकाने या ग्रंथात दिलेली आहे. पुढे ब्रह्मण, मराठा, कुणबी, बंजारा, भिल्ल, मातंग, महार, न्हावी, कहार, चारण अशी वर्गवारी करीत त्यांचे व्यवसाय, विवाह पद्धती, आचार, आहार, संकर यांचाही तपशील दिलेला आहे. यात चालीरीती, रिवाज, धर्मपद्धती, आचरण काटेकोर पालन व्हावे असा दंडक अपेक्षित होता. त्याचा भंग म्हणजे दंडाला सामोरे जाणे हा त्याचा परिणाम.

मुलगी नको, मुलगा हवा, ही काही आजची अपेक्षा नाही. पूर्वीही हीच अपेक्षा होती. स्त्रीभ्रूण हत्या, हे त्याचे पुढचे टोक कशात आहे, याचे उत्तर याच मनुस्मृतीमध्ये आहे. स्त्रियांवर असलेली बंधने, हुंडा, बालविवाह, पुनर्विवाहाला विरोध, अशी अनेक कारणे त्यापाठी आहेत. त्यांचाही वेध लेखकाने या ग्रंथात घेतलेला आहे. लक्ष्मण माने, सोनकांबळे, किशोर शांताबाई काळे, बेबी कांबळे, दया पवार अशा अनेकांच्या आत्मचरित्रांचे संदर्भ देत आपले मत स्पष्ट केलेले आहे. आवश्यक तिथे आकडेवारी, इसवीसन दिलेले आहेत. जातीची उत्पत्ती आणि जात टिकून राहण्याची कारणे, अस्पृश्यता कधी आली, अठराव्या शतकातील जातीव्यवस्था, प्रत्येक जातीत नामकरण करण्याची पद्धती, मंदिरे, असा सर्व बाजूंनी हा विषय मांडलेला आहे.

अभ्यासपूर्ण असे लेखन वाचकांच्या हाती देताना हमखास सैद्धांतिक परिभाषेच्या सोसात देण्याचा जणू प्रघातच पडत चालला आहे की काय, अशी शंका येते. आशयाच्या परिप्रेक्ष्येला नेमकेपणाने सादर करण्याची ती आवश्यकता असते, असे समर्थन त्यापाठी लावता येऊ शकते. परंतु मूठभरासाठी आख्खे भांडार ओलीस ठेवणे अयोग्य असते. उद्देश सफल व्हावा असे वाटत असेल तर ते अशाच भाषेत व्यक्त व्हावे, जे वाचकाला सहज आकलन होईल. आपले लेखन सर्वस्तरातील वाचकासाठी आहे, ते त्याच्यापर्यंत सहजपणे पोहचायला हवे, हे भान लेखकाने इथे जपले आहे. लेखनासाठी अनेक संदर्भांचा आधार घेतलेला आहे. डॉ. केतकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. धुर्ये, नरहर कुरुंदकर, प्रबोधनकार ठाकरे, रसेल, यांच्या मतांचा आधार घेतलेला आहे. हे संदर्भ परके वाटत नाहीत. आपल्या सोप्या, सरळ, आणि सहज शैलीत हे लेखन केलेले आहे. विषयाचा आवाका किती मोठा आहे, याचे आकलन हा ग्रंथ वाचल्यानंतर लक्षात येतो. एखाद्या वृक्षाला असंख्य फांद्या, पारंब्या आणि पानेफुले असावीत, त्यातून खोड वा बुंधा दिसू नये. केवळ एक मोठा वृक्ष दिसावा, असा हा विषय. त्याच्या अंतरंगात शिरणे म्हणजे स्वतःचे अस्तित्व मागे ठेवून प्रवेश करणे, असा हा विषय. परंतु लेखकाने संयमपूर्वक एकेक फांदी वेगळी करीत या अंतरंगाचा शोध घेतला आहे. या शोधाला एक सूत्र आहे. त्या सूत्राला संयमाने गुंफताना कुठल्याही फांदीला विन्मुख ठेवलेले नाही. एकेक प्रकरण घेत काटेकोरपणे मांडणी केलेली आहे. मांडणीत उपशीर्षकांचा आधार घेतलेला आहे. त्यामुळे प्रत्येक प्रकरण नेमकेपणाने आणि तितकेच प्रभावीपणाने विषयाला न्यायापर्यंत घेऊन जाते. अभ्यास आणि त्याची चिकित्सा यांच्या जोडीला लेखकाकडे असलेले विषयाचे आकलन अतिशय गांभीर्यपूर्वक व्यक्त झालेले आहे. त्यामुळे त्याचे संदर्भमूल्य अधोरेखित झाले आहे. कुणाही अभ्यासकाला, संशोधकाला मार्गदर्शक ठरावे असा हा ग्रंथ आहे. एक उत्तम संशोधन वाचकांच्या हाती दिले यासाठी लेखकाचे आणि प्रकाशकाचे अभिनंदन करायला हवे.

प्रा. हरी नरके (निवृत्त सदस्य–राज्य मागासवर्ग आयोग) यांनी या ग्रंथाची मौलिकता अधोरेखित केली असून लेखकाच्या संशोधनाचे कौतुक प्रस्तावनेत केलेले आहे. सतीश भावसार यांनी साकारलेले मुखपृष्ठ त्यांच्या समग्रतेचे दर्शन घडवते, थेट आशयाला कवेत घेते.

**मूल्य ३५० रुपये सवलतीत २१० रुपये**

# ग्रंथपान

**औद्योगिक संबंध आणि कलहाच्या कथा**

'अहो साहेब! तुम्ही आम्हांला मूर्ख समजलात काय? फिरोजची बडतर्फी करणे एवढी सोपी गोष्ट वाटली की काय तुम्हाला? तुम्ही ज्या दिवशी त्याला बडतर्फ कराल, त्याच दिवशी कंपनीतील सर्व कर्मचारी बेमुदत संपावर जातील. तो प्रश्न आम्ही आमच्या इभ्रतीचा प्रश्न समजू आणि फिरोजच्या बडतर्फीच्या अंमलबजावणीबद्दल न्यायालयाकडून स्थगितीचा आदेश आणू. मग बसा बोंबलत!'

'अनुभवाची शिदोरी' हा कवी विलास गावडे यांचा तिसरा कथासंग्रह. या संग्रहात दहा कथा आहेत. या कथा सामान्यतः असणाऱ्या विषयापेक्षा वेगळ्या विषयावर आधारलेल्या आहेत. हा विषय आहे औद्योगिक वातावरणाचा. कंपनी, कामगारवर्ग, कामगारांची संघटना आणि व्यवस्थापन या घटकांभोवती गुंफलेल्या या कथा आहेत. हे विश्वच वेगळे आहे. उत्पादन, वेतन, सुविधा, संप, कामगार करार, स्वेच्छानिवृत्ती, या वरवर दिसणाऱ्या गोष्टी. परंतु इथले विषय वेगळे आहेत. इथले कामगार संबंध, औद्यौगिक कलह वेगळे आहेत. या सगळ्यात सतत एक ताण भारलेला असतो. विजेची तार प्रवाहाने भारलेली असावी तसा. कधी ठिणगी पडेल याचा नेम नसतो. व्यवस्थापन शिस्त आणि उत्पादन याचे अस्त्र हातात घेऊन मालकाच्या तोऱ्यात वावरत असते. तर व्यवस्थापन हे मालक नसून आपणच खरे मालक आहोत, हा अहंभाव कामगारांच्या मनात असतो. तोच व्यवस्थापनावर सतत आपला दबाव प्रभावीपणाने टाकत असतो. त्याच्या पाठीशी उभी असते ती त्यांची संघटना. यातून उडणारे संघर्ष हे दोन शत्रू समोरासमोर उभे असल्यासारखे होत असतात. यासाठी अनेक कायदे आहेत. यांचा वापरही दोन्ही पक्षांकडून एकमेकांवर प्रहार करण्यासाठी केला जातो. हे सारे विलास गावडे यांनी या कथासंग्रहात केंद्रस्थानी ठेवलेले आहे.

'भात्यातील बाण' या कथेतील नाईकसाहेब हे आपली भूमिका स्पष्ट करतात की, शिस्त आणि प्रॉडक्शन या दोन गोष्टीमध्ये कधीही तडजोड केली नाही, करणार नाही. परंतु त्यांना अडवणारे मांडवकर तिथे आहेत आणि पाठिंबा देणारे कर्णिकसाहेब. याच्या संघर्षाची ही कथा आहे. 'चाप' या कथेत कंत्राटी कामगार आणि त्यांना वेठीला धरणारे कंत्राटदार हा विषय हाताळलेला आहे. कंत्राटी कामगार हे सुद्धा कामगार आहेत परंतु त्यांना कुठले फायदे अथवा सुविधा कंपनीकडून उपलब्ध नाहीत. ते कंत्राटदाराच्या हातातील बाहुले असल्यासारखी त्यांना वागणूक मिळते. हा अन्याय आहे. या विषयाला सकारात्मक पातळीवर कसे आणता येते, हा कदमसाहेबांचा स्तुत्य उद्देश ही कथा स्पष्ट करते. अर्थात राजेसाहेब, व्होरासाहेब यांचे सहकार्यही यासाठी महत्त्वाचे ठरते. 'सिझोफ्रनिया' या कथेत फिरोज, कल्पना या कामगारांच्या बदली व बडतर्फीच्या निमित्ताने व्यवस्थापन आणि कामगार संघटना यांच्यातला संघर्ष अतिशय प्रभावीपणे या कथेत मांडला आहे. 'धोबीपछाड' या कथेत ग्रॅच्युइटी कमी मिळाली हे कारण दाखवून व्यवस्थापनाला वेठीला धरणारा धनाजी शेट्ये, त्याला पाठिंबा देणारे भुसारेसाहेब आणि प्रकरण हाताळणारे विसपुतेसाहेब, यात कामगार कायदे, कामगार आयुक्तालय, कामगार संघटना, असा रंजक प्रवास असून एखादे कामगार प्रकरण कसे हाताळले जाते याचे उत्तम उदाहरण म्हणजे ही कथा. मुरलीधरन या कर्तबगार अधिकाऱ्याला कंपनीचे हित पाहताना केवळ स्वतःच्या मर्जीप्रमाणे वागता येत नाही. इथे इतरही घटक महत्त्वाचे आहेत. आणि त्यात कामगार संघटना हा प्रबळ घटक आहे. तो चारचौघात ज्ञानाच्या कशा चिंधड्या उडवू शकतो, याचा अनुभव 'काटेरी खुर्ची या कथेत आला आहे. कामगार नेत्याच्या तोंडी आलेली भाषा ही या कथेच्या वातावरणातच नव्हे तर एकूण औद्योगिक वातावरणातील निदर्शक ठरते. कामगार करार हा विषय तेवढाच महत्त्वाचा आणि कामगारांच्या जिव्हाळ्याचा विषय असतो, हेही यात अधोरेखित होते.

**अनुभवाची शिदोरी**
**विलास गावडे**




विलास गावडे हे उत्तम कवी आहे. आतापर्यंत त्यांचे चार कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेत आणि त्यासाठी त्यांना विविध पारितोषिकेही प्राप्त झालेली आहेत. तसेच दोन कथासंग्रह प्रकाशित झालेले असून तेही पारितोषिकांनी सन्मानित झालेले आहेत. कवीकडे असलेली भाववृत्ती आणि संवेदनशीलपणा, आपल्याभोवतीचे टीपकागदाप्रमाणे टिपण्याची सजगता आणि त्याच्याशी जोडलेले आंतरिक नाते, यामुळे त्यांच्या कविता वाचकाच्या मनात स्थान निर्माण करून आहेत.

विलास गावडे यांच्याकडे असलेली लेखनातली सहजता लक्ष वेधून घेणारी आहे. कथा सादर करीत असताना ते जे विश्व उभे करतात ते एखाद्या चित्रपटासारखे दृष्यमय भासत राहते. एक संपूर्ण चित्र त्याच्या भावविश्वाला उलगडत जाते. व्यक्तिरेखांची संख्या मोठी असूनही ती प्रत्येक सजीव स्वरूपात तिच्या स्वभाव वैशिष्ट्यासह वाचकाच्या हृदयात आपले स्थान स्वतंत्रपणे राखून ठेवते. हे लेखकाचे मोठे यश म्हणायला हवे. औद्योगिक क्षेत्रातील घडणारे प्रसंग, वातावरण, त्यांच्यातले संबंध, संघर्ष, यांच्यामधील समतोल राखणे ही अतिशय अवघड बाब आहे, परंतु लेखकाने हे आव्हान लीलया पेललेले आहे. त्यामुळे प्रत्येक कथा स्वतंत्र आणि कसदारपणे वाचकाच्या हाती आलेली आहे. सहजता आणि गती ही लेखनात असेल तर ते लेखन वाचकाला आपल्या कवेत घेतल्याशिवाय राहात नाही. ही गती आणि सहजता गावडे यांच्या प्रत्येक कथेतून प्रत्ययाला येते. त्यामुळे वेगळ्या वातावरणातल्या कथा असूनही त्या वाचकाला आपले वेगळेपण दाखविण्यात यशस्वी झाल्या आहेत असे निश्चितपणे म्हणता येते. एक आगळावेगळा कथासंग्रह वाचकांच्या हाती दिला यासाठी लेखकाचे आणि प्रकाशकाचे अभिनंदन करायला हवे.

औद्योगिक समूहात यंत्र आणि व्यवस्थापन हे एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला कामगार आणि त्यांची संघटना, असे दोन घटक समोरासमोर असतात. ते परस्परांचे एका नाळेने बांधलेले सख्खे नातेवाईक असतात आणि पक्के वैरी. या दोघांना जोडणारी नाळ तुटणार नाही, याची कसरत करावी लागते ती व्यवस्थापकीय घटकाला. त्याची ही एकप्रकारची तारेवरची कसरत हेच सतीश भावसार यांनी मुखपृष्ठावर साकारले आहे.

**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथपान

**अस्पृश्य देवता आणि**
**निवडक कथा**
**डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे**



## पारंपरिकतेचा तळ ढवळून काढणाऱ्या कथा

‘या दुर्दैवी वेडीला साडी देऊन बदल्यात काय मिळणार? देवीला नेसवलेली साडी नंतर पुजारी घेऊन जातात. बस् तेवढंच! दात्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी फक्त एकदा ती साडी देवीला नेसवली जाते. दररोज दात्यांकडून अर्पण केल्या गेलेल्या साड्यांचं, कपड्यांचं काय होतं कोण जाणे? वेडीने पुजाऱ्याला याबद्दल काही विचारलं नाही. नाहीतर कोप व्हायचा आणि शाप द्यायचे. म्हणतील, उष्ट्या पत्रावळी उचलणारी तू बाई वस्तूचं मोल विचारणारी तू कोण आहेस?’

सुप्रसिद्ध लेखिका डॉ. प्रतिभा राय यांचा हा कथासंग्रह. त्याचा अनुवाद केला आहे डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे यांनी. सहस्त्रबुद्धे या साहित्यात लौकिक प्राप्त केलेल्या लेखिका आहेत. हिंदी हा त्यांचा अभ्यासाचा विषय. चित्रा मुद्‌गल, सुधा अरोडा, नंदकिशोर नौटियाल, सआदत मंटो, शंकर घोष, ललित सहगल, भीष्म सहानी, लक्ष्मीनारायण लाल, यांच्या साहित्याचा मराठीत अनुवाद त्यांनी केलेला आहे. तसेच विजय तेंडुलकर, विश्वास पाटील, चेतन दातार, डॉ. रोहिणी गवाणकर, डॉ. प्रकाश आमटे, यांच्या साहित्याचा हिंदीत अनुवाद केलेला आहे. त्यांच्या या साहित्यिक योगदानासाठी अनेक पुरस्कार त्यांना लाभलेले आहेत. त्याच सिद्धहस्त लेखणीतून हा अनुवाद दर्जेदारपणे साकारलेला आहे.

या कथासंग्रहात तेरा कथांचा समावेश आहे. यातील प्रत्येक कथा स्वतंत्र विषय आणि स्वतंत्र विचार घेऊन आलेली आहे. या सगळ्या कथांची गुणवैशिष्ट्ये उदाहरणासह सांगण्यासाठी स्वतंत्र लेखाची आवश्यकता आहे. उत्तम कथा कशी याचे प्रमाण सांगणाऱ्या या कथा आहेत. प्रत्येक कथेत आशयाला जोडून आलेली सौंदर्यस्थळे वाचताना अंगावर जी मोहिनी येते, ती अक्षरशः भारून टाकणारी असते. विषयाचा आवाका कवेत घेताना विचारांचे बाहू किती अंगानी आपले शक्तीप्रदर्शन करू शकतात, याचे दर्शन या कथा घडवतात. एखादी कविता फुलत जावी तसा हळूवार अनुभव संपूर्ण कथेवर दवासारखा विसावत जातो, वाचकाला चिंब करीत जातो. कथा ही आपल्या भवतालातून, जगण्याच्या अनुभवांतून जन्माला येते. परंतु तिच्या जन्माचा सोहळा कशाप्रकारे साजरा करायचा हे लेखकाच्या वकुबावर अवलंबून असते. प्रतिभावान लेखकाची प्रतिभासंपन्न ताकद काय असते हे त्याने निर्माण केलेल्या निर्मितीवरून ठरत असते. या संग्रहातील कथा लेखिकेच्या त्या प्रतिभेचा सुंदर पुष्पहार घेऊन आल्याचा दाखला देतात. जागोजागी आलेली वाक्ये ही केवळ विचारांची देणगी नाही, ती चिंतनाची, अभ्यासाची, आपल्या नितळ मनाची, जे दिसते त्या पलीकडे पाहणाऱ्या दृष्टीची देणगी आहे, याची साक्ष देतात. लेखनातली सहजता आणि प्रवाहीपणा भावणारा आहेच, परंतु त्यापाठी असलेली धग जाळून टाकावी इतकी दाहक आहे. तरीही ही धग धगधगणारी न दिसता लोण्याची लवचिकता आणि स्निग्धस्नेह हळुवारपणाचा अंगिकार केलेली आहे. असे लेखन डॉ. प्रतिभा राय याच करू शकतात.

प्रचंड दानधर्म, प्रसाद, पूजाअर्चा यातून देवदेवताविषयीचे माजलेले स्तोम हे भाविकतेचे प्रतीक म्हणता येईल का? देवांना या सगळ्यांची अपेक्षा असते आणि त्याचा ते उपभोग घेतात का? अपवित्र, अस्पृश्यता म्हणजे काय, त्यांचे देवतांना वावडे असते का? त्याचवेळी शरीरावर एक चिंधीही नाही, पोटात अन्नाचा एक कण नाही, अशा मंदिराच्या दाराशी असलेल्या माणसाकडे नाक मुरडीत दुर्लक्ष करणे, ही कोणती भाविकता म्हणायची? ‘अस्पृश्य देवता’ ही कथा दगडातला देव आणि हाडामासाचा माणूस या दोघांकडे पाहणाऱ्या आपल्या वृत्तीचा बुरखा फाडते. घराला, घरातल्या प्रत्येक वस्तूला कुलूप लावण्याची गरज कोणत्या मानसिकतेतून निर्माण झाली आहे? घरात असलेल्या इमानदार माणसांच्या इमानदारीवरच संशय आहे का? या प्रश्नावर सुंदर प्रकाश ‘अभिमान’ या कथेतून टाकलेला आहे. आजारातून बरे होणार नाही हे माहीत असूनही निरपेक्षपणे आधार देत सेवा करणे, ही वृत्ती जोपासली तर केवळ रुग्णच नाही, तर त्याचे आप्तही मानसिकदृष्ट्या सुखावतात, याचा अनुभव ‘आनंदाश्रू’ ही कथा देते. ‘माझं गाव’ ही कथा केवळ बदललेल्या गावाचे वर्णन करीत नाही, तर माणसामाणसात झालेले बदलही दाखवते. पंचेचाळीस वर्षांनी गावी परतलेल्या चेतनच्या भावभावनांचे वर्णन बदलत गेलेल्या गावाइतकेच मनोज्ञ आहे. ‘तीर्थरहस्य’ ही कथा खरोखर रहस्यमय वाटावी अशी आहे. सरस्वतीचे एकटीने तीर्थयात्रेला नियमितपणे जाणे, त्यासाठी दानधर्म करणे आणि पतीचे तीर्थक्षेत्री नदीत बुडून झालेले निधन, या घटनांकडे समाज कोणत्या नजरेने पाहतो, याचा प्रत्यय म्हणजे प्रत्येकाच्या नजरेची प्रचितीच होय. मृत झालेल्या अनोळखी तरुणाच्या खिशात नावाची चिठ्ठी सापडली आणि ओळख पटवायला राघवबाबू यांना पोलिसाचा बेरात्री फोन आला. अशावेळी मानसिक आंदोलनांचा जो कौटुंबिक कल्लोळ निर्माण होतो, त्याची कथा म्हणजे ‘निरुत्तर’. पक्षघात झाल्याने अंथरुणाला खिळून असलेल्या चंद्राला स्वेच्छामरण मिळावे ही पालकांची इच्छा आणि आत्ममग्न रुग्ण याचे जगणे हे जीवघेणे आहे तसे जगण्यावर प्रेम करणारेही आहे, याचा प्रत्यय ‘चंद्रभागा आणि चंद्रकला’ ही कथा देते.

डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे यांनी केलेला हा अनुवाद मूळ साहित्यकृती–इतकाच सकसपणे सिद्ध केलेला आहे. मूळ लेखिकेच्या नावाला आणि त्यांच्या प्रतिभेला साजेसा न्याय या अनुवादाने दिलेला आहे, असे निर्विवादपणे म्हणता येते. हा मूळचा मराठीतला डॉ. सहस्त्रबुद्धे यांनी कथासंग्रहाचा अनुवाद समरसतेने आणि सर्व अनुभव पणाला लावून केलेला आहे. अनुवादक हा केवळ शब्दांचे भाषांतर करणारा नसतो, तो दोन भाषांचा दूत असतो, आशयाला आपल्या आंतरिक आत्मीयतेने जोजावणारा असतो हे अनुवादाने सिद्ध केलेले आहे. त्यामुळे आपण आपल्या मातीतला कथासंग्रह वाचत आहोत, असेच वाटत राहते. एक अतिशय सुंदर आशयसंपन्न कथासंग्रह उत्तमपणे मराठीत आणला यासाठी त्यांचे अभिनंदन करायला हवे. सतीश भावसार यांनी आशयसंपन्न असे मुखपृष्ठ साकार केलेले आहे.

**मूल्य २०० रुपये   सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**बाबा आमटे : व्यक्तित्व, कवित्व आणि कर्तृत्व**

**बाळू दुगडूमवार**




**हिमालयाच्या अंतरंगात असलेल्या रसांचा शोध**

'समाज कार्यात वेगळी वाट निर्माण करणाऱ्या समाजसेवक बाबा आमटे यांचे व्यक्तित्व हे ऋषी विश्वामित्र यांच्याशी साम्य सांगणारे वाटते. विश्वामित्र स्वतःच्या तप सामर्थ्याने राजर्षीत्वाचा त्याग करून ब्रह्मर्षीत्वाकडे जात राहिले. त्याचप्रमाणे बाबा आमटेही आपल्या सुखासीन, उच्चभ्रू, समृद्ध जीवनाचा त्याग करून श्रमर्षीतकडे जात राहिले आहेत.' एका प्रवासाची ही ओळख लेखकाने प्रस्तावनेत करून दिलेली आहे. बाबा आमटे त्यांचे व्यक्तित्व हे एक विलक्षण आव्हान आहे. ज्याला वादळाची उपमा दिलेली आहे. अशा वादळाचा शोध घेणे सोपे नाही. परंतु लेखकाने अतिशय परिश्रमपूर्वक या व्यक्तित्वाचा, त्यांच्या कर्तुत्वाचा आणि त्यांच्या ठायी असलेल्या कवित्वाचा शोध घेतलेला आहे. सामाजिक कार्याचे डोंगर उभे करणारे समाजसेवक बाबा आमटे हे सर्वांना ठाऊक आहेत. कुष्ठरोगाचा प्रयोग स्वतःच्या शरीरावर करून घेणारे बाबा हे वेगळेच व्यक्तित्व. सुखवस्तू घरात सर्व सुखांची भांडारे त्यांच्यासाठी खुली असताना दलित, दीनदुबळे, कुष्ठरोगी यांच्यासाठी त्यांनी सुरू केलेले विविध प्रकल्प पाहिले तर त्यांच्या या व्यक्तित्वात असलेल्या वेगळेपणाची ओळख होते. नागपूर जिल्ह्यातील 'अशोकवन प्रकल्प', चंद्रपूर जिल्ह्यातील 'सोमनाथ प्रकल्प', भामरागड तालुक्यातील हेमलकसा गावचा 'लोकबिरादरी प्रकल्प' आणि यांच्यासोबत वृद्धांसाठी 'उत्तरायण' वृद्धाश्रम तर अनाथांसाठी 'गोकुळ 'अनाथ आश्रम ही त्यांच्या समाजकार्याची जागतिक ओळख असलेली तीर्थस्थळे. ही तीर्थस्थळे आणि बाबा आमटे हे एकच व्यक्तित्व असल्याच्या खुणा आहेत. बाबा केवळ या प्रकल्पा पुरतेच मर्यादित राहिलेले नाहीत तर 'भारत जोडो', 'स्वातंत्र्य चळवळ', पंजाबमधील 'शांती यात्रा', 'नर्मदा बचाव ' मधील सहभाग यातून बाबांचा देशप्रेम, बंधुत्व, मानवता आणि सामाजिक जाणिवां यांचा प्रत्यय 'अभय साधक' या शब्दांशी सिद्ध होतो. त्यांच्या व्यक्तित्वाविषयी लिहिताना लेखक म्हणतात, 'बाबा आमटे यांचा एकूण जीवन प्रवास उजेडाकडून अंधाराकडे जाणारा होता त्यांचे जगणे म्हणजे आपल्या जगण्याचे उद्दिष्ट काय याचा प्रयोगशील शोध होता. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सामर्थ्य आणि गती मानतेचा वादळी आवेग होता. हा आवेग स्वयंप्रेरित, स्वयंचलित आणि स्वयम् नियंत्रित असा होता. त्याला दिशा होती.'

बाबांच्या ठायी असलेल्या सामाजिक, मानसिक, राजकीय आणि साहित्यिक जाणिवांचा शोध लेखकाने घेतलेला आहे. सामाजिक कार्यात अखंड बुडालेले बाबा आमटे हे उत्तम कवी होते. त्यांनी लिहिलेले कवितासंग्रह 'ज्वाला आणि फुले', 'माती जागवील त्याला मत', 'करूणेचा कलाम' हे होत. तर 'उज्वल उद्यासाठी', 'सार्वजनिक संस्थांचे संचालन', 'श्रमिक कार्यकर्ता विद्यापीठ' हे त्यांचे वैचारिक लेखन होय. या प्रत्येक लेखनाचा लेखकाने स्वतंत्रपणे शोध घेतलेला आहे. यातून बाबा आमटे यांचा साहित्यिक परिचय होतो. त्यांच्या कवितेविषयी लिहिताना वि. स. खांडेकर लिहितात, 'भूकंपाची नोंद करणाऱ्या वेधशाळेतल्या यंत्रासारखी बाबांची संवेदनशीलता तरल आहे. पण भावनांच्या घोळात ते कधी गुरफटून पडत नाहीत.' हेरंब कुलकर्णी लिहितात, 'बाबा आमटे यांची शब्दकळा जितकी सुंदर आहे त्याहीपेक्षा दाहक, उत्कट टोकदार, ज्वालाग्रही शब्द आहेत. हे त्यांच्या कविता वाचल्यावर समजलं.'

निवडणूकही फक्त श्वासनांची टाकसाळ झाली आहे नोटां सारखा आश्वासनांचा ही चलन फुगवटा या देशात झाला आहे. जहाजाबरोबर स्वतःला बडवून घेणारे कर्णधार जेथे असतात तेथेच बुडता देश वाचवणाऱ्या नाविकांच्या पिढ्या जन्म घेतात यासारख्या कवितांच्या ओळी अधोरेखित केलेल्या आहेत तसेच वेळोवेळी बाबांनी व्यक्त केलेली मते आणि विचार यांचीही ही उद्धृते लेखकाने यात दिलेली आहेत. त्यावरून बाबांच्या जीवन प्रवासाची दिशा लक्षात येते.

बाबा आमटे यांचा शोध तीन टप्प्यात घेण्यात आलेला आहे. 'व्यक्तित्व, कवित्व आणि कर्तृत्व' या शीर्षकावरून हे लक्षात येते. प्रत्येक टप्प्याचा अभ्यास करताना लेखकाने उपशीर्षके देऊन सविस्तरपणे त्या त्या विषयाला अधिक सखोल असा न्याय दिलेला आहे. त्यामुळे तो विषय समग्रपणे नोंद झालेला आहे. विषयास अनुसरून असलेले संदर्भ त्या या प्रकरणाच्या शेवटी दिलेले आहेत. या संदर्भांच्या यादीवरून विषयाची व्याप्ती आणि सखोलता लक्षात येते. लेखकाचा व्यासंग आणि विषयावरील हुकूमत याचाही प्रत्यय हे लेखन वाचताना येतो. लेखनातली प्रगल्भता आणि समृद्धपणा ही लेखकाच्या कसदार लेखनाची पावती म्हणावी लागेल. मांडणी, सुबोधपणा आणि नेमकेपणा यामुळे बाबा आमटे यांच्या चिकित्सक चरित्राला वेगळेपण लाभले आहे. संदर्भमूल्य असलेला हा ग्रंथ अनेक दृष्टीने मार्गदर्शक ठरावा. बाबा आमटे यांच्यावर आतापर्यंत बरेच लेखन झालेले आहे परंतु हे वेगळे लेखन असल्याने अनेकांपैकी एक असे न होता एक स्वतंत्र मूल्य असलेले लेखन ठरलेले आहे. एक चांगला ग्रंथ लेखकाने वाचकांच्या हाती मिळाला याचे समाधान वाटते.

डॉक्टर प्रकाश आमटे यांनी बाबांविषयी आणि लेखनाविषयी व्यक्त केलेले मत समग्र ग्रंथाचे सार म्हणता येईल. नयन बारहाते यांनी सजविलेले मुखपृष्ठ आशय आणि व्यक्तित्व यांना अनुरुप असे झालेले आहे. विशेष म्हणजे या ग्रंथाची मांडणी देखील आकर्षक पद्धतीने केलेली आहे.

**मूल्य ३०० रुपये सवलतीत १८० रुपये**




# ग्रंथपान

**चांगदेव काळे**
**संपर्क : ९८६९२०७४०३**

**तिसरा डुळा**
**किरण येले**




**जगण्याच्या रखरखीत प्रवासातले अनवाणी प्रवासी**

'हातापायाच्या काड्यांवर आपलं भलंमोठं डोकं सांभाळत हेलपाटत चालणारं, चळाचळा मुतायला लावणारी नजर बाळगणारं, पेनच्या निबेसारखी नखं असणारं मूल म्हणजे या कथेचा लेखक होतं, ज्याचं नाव 'जावेद' आहे, जो आजही जिवंत आहे आणि कायम जिवंत असेल. त्याचं तोंड दाबा, गळा दाबा, श्वास बंद करा, खून करा, तरीही तो मरणार नाही कधीच.'

'तिसरा डुळा' हा किरण येले यांचा 'मोराची बायको' नंतर आलेला दुसरा कथासंग्रह. किरण येले यांचा खरा परिचय आहे तो कवी म्हणून. 'चौथ्यांच्या कविता', 'बाईच्या कविता' हे दोन कवितासंग्रह अगोदर प्रकाशित झालेले आहेत. परंतु याबरोबरच त्यांचे दूरदर्शनवर मालिका लेखन सुरू असून 'प्लॅटफार्म नं.९' हे नाटकही प्रकाशित झालेले आहे. त्यामुळे कवी, कथाकार आणि नाटककार अशी त्यांची ओळख आता स्थापित झाली असून या तीनही साहित्यप्रकारांवर त्यांची हुकूमत आहे, ती या साहित्यातून आणि अनेक नियतकालिकांमध्ये प्रकाशित झालेल्या कसदार लेखनावरून सर्वमान्य झालेली आहे. आजच्या कसदार आणि सशक्त कथालेखकांच्या यादीत किरण येले यांचे नाव आवर्जून घ्यायला हवे.

'मोराची बायको' हा कथासंग्रह त्याच्या वेगळेपणामुळे वाचक आणि समीक्षकांच्या नजरेत भरला, तसाच वेगळेपणा जपलेला 'तिसरा डुळा' हा कथासंग्रह आहे. या संग्रहात एकूण सात कथा आहेत, दीर्घ वाटाव्यात अशा. आवाका मोठा असलेल्या. वाचताना वाचकाला आपल्या कवेत घेणाऱ्या. जगण्यासाठीची धडपड जन्मतःच सोबत असलेल्या, संघर्षाने तावून सुलाखून निघालेल्यांच्या या कथा आहेत. 'जावेद जिवंत आहे' या कथेत जावेद या लहान बाळाला भुकेपासून वाचवण्यासाठी केंद्रस्थानी ठेवलेले दिसते परंतु जमील आणि रखमाचा जिवंत राहण्यासाठी जो संघर्ष आहे, तो जावेद इतकाच जीवघेणा आहे. हा संघर्ष घडणाऱ्या सगळ्या घटनांतून अशा टोकावर येऊन पोहोचतो की विचारांचे चक्र जागीच गोठून जावे. 'तिसरा डुळा' या कथेतला म्हादू अंगावर शिवाचा वेष परिधान करतो आणि जणू आता प्रत्यक्ष भगवान शिवाची शक्ती आपल्याला प्राप्त झाली आहे या आवेशाने वागू पाहातो. होणाऱ्या अन्यायाविरोधात या शक्तीचा उपयोग करू पाहातो. परंतु हे सोंग सोंगच ठरते तेव्हा त्याचा होणारा भ्रमनिरास कडेलोटासारखा दयनीय ठरतो. आणि स्वप्नांचा चुराडा होत असलेले पाहणे मंजुळेच्या नशिबी येते. तीच अवस्था 'झुंबर' कथेतील धनकूची. डोक्यावरच्या पेटत्या दिव्यांचे झुंबर मिरवणुकीत वाहताना स्वतःलाही उजळू पाहातो. परंतु इतरांना उजळून टाकताना त्याच्या खाली असलेल्या अंधाराचीच सावलीच त्यांच्यावर पांघरूण घालते. 'इसाक पक्का हिंदू होता' या कथेचे वातावरण हे हिंदू आणि मुस्लीम धर्माच्या कडवेपणाने भारलेले आहे. बाप मुस्लीम आणि आई हिंदू, यांच्या पोटी जन्म घेतलेल्या इसाकने माथ्यावर भगवा टिळा मिरवला, सगळ्या देवांच्या आरत्या पाठ केल्या, तरीही त्याला हिंदूपण लाभत नाही. 'असुविधाके लिये खेद है...' या कथेतील कुतुब परिस्थितीने आवळलेला तरीही वेश्याव्यवसायात सापडलेल्या अमलाला सोडवण्यासाठी मदत करू पाहतो. त्याला तिच्यात स्वतःची मुलगी सायरा दिसते. बंद पडलेल्या कंपनीच्या जागी नवीन टोलेजंग इमारत उभी राहणार आहे, तिचे 'प्रॉपर्टी एक्झिबिशन' लागले आहे. त्याचवेळी एक्झिबिशनच्या बाहेर बंद कंपनीच्या अवशेषात मशीन ऑपरेटर दत्ता जावळे आपल्या पूर्वीच्या दिवसांचे अवशेष शोधतो आहे. यात असलेला विरोधाभास, माणसांमाणसांमध्ये असलेला स्वार्थ, धार्मिक तेढ आणि तिचा केलेला सोयीस्कर वापर, पिचलेल्यांना नसलेले भवितव्य, या सगळ्यांमागे असलेले मानसशास्त्र या कथांमधून मांडलेले आहे. त्यांच्यात समान सूत्र नाही, परंतु एका वर्गाचा शोध, त्यांच्यातली दुर्बलता, त्यांच्यात असलेली जगण्यासाठीची आस, यशाऐवजी पदरी आलेले अपयश, हे सारे लेखकाने या कथांमधून वाचकांसमोर ठेवले आहे. त्यांच्या मनाचा तळ ढवळून काढला आहे. वार करणाऱ्या वृत्तींची धार किती धारदार आहे, यावर बोट फिरवून पाहिले आहे. याचे कारण या व्यक्तिरेखांना स्वतःला स्वतःविषयी लिहिता येत नाही. 'मी का लिहितो' या मनोगतात या व्यक्तिरेखांच्या मानसिकतेविषयी आणि स्वतःच्या लेखनाविषयी लेखकाने स्वतःचे चिंतन लिहिले आहे, ते लक्षात घेण्यासारखे आहे.

किरण येले यांचे कथालेखन हे आपण एखादा चित्रपट पाहात आहोत असे चित्रदर्शी आहे. कथेत असलेल्या व्यक्तिरेखांची वैशिष्ट्ये सांगताना ते तिच्याभोवती असलेले वातावरण नाटकाच्या नेपथ्यासारखे उभे करतात. त्यामुळे ती कथा केवळ त्या व्यक्तिरेखांची न राहता संपूर्ण वातावरणाची, तिच्यामागे असलेल्या वास्तवाची होते. वास्तवात मुरलेली भाषा तिच्या अंगभूत वैशिष्ट्यांसह देण्यावर भर आहे. त्यामुळे या व्यक्तिरेखांचे जिवंतपण ठसठशीतपणे अधोरेखित झालेले दिसून होते. कथांना असलेला शेवट हा धक्कादायक वा ठरवून केलेला नाही, कथेला तिच्या नैसर्गिक प्रवाहाने जाऊ देण्याचे स्वातंत्र्य ते देतात. या शेवटाबाबत आणखी एक वैशिष्ट्य सांगता येईल, ते म्हणजे त्या विषयी कथाकाराचे निरूपण ते शेवटी देतात. त्यामुळे कथा संपल्यानंतरही ती आपल्या वाचनकप्प्यातून दूर होत नाही, वाचक म्हणून आपण तिथेच जखडलेले राहतो. 'घोडा आपल्या मालकाशिवाय दुसऱ्या कुणाला पाठीवर खोगीर बांधायला देत नाही.' 'हनिमूनकी रात सांस की बात!' 'रस्त्यावरच्या माणसांचं अर्ध आयुष्य जवळपास चवड्यावरच जातं, पोटातली भूक दाबत.' यासारखी वाक्ये इतक्या सहजपणे आणि तितक्याच चपखलपणे येतात, की ती कथेइतकीच मनाचा ठाव घेतात. या सगळ्यात हेही जाणवत राहते, कथा आणि कथाकार हे दोघे एकाचवेळी वाचकाची संवाद साधत आहेत. सतीश भावसार यांचे आशयसंपन्न मुखपृष्ठ हे संग्रहाचे वैशिष्ट्य ठरावे.

**मूल्य २५० रुपये  सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथपान

**गौरवशाली सेवेची चतुर्थ गाथा**

'फक्त गुन्हे उघडकीला आणले म्हणजे गुन्ह्याचा तपास पूर्ण होतो असे नसते. जोपर्यंत पूर्ण तपास होऊन बळकट पुरावे हस्तगत करून त्यावरून कोर्टात दोषारोपपत्र सादर करून त्याची केस कोर्टात चालवून आरोपीला शिक्षेपर्यंत नेल्याशिवाय हे त्या विविक्षित गुन्हातपासाचे काम संपत नसते.'

यशवंत व्हटकर यांच्या जीवनगाथेचा 'सॅल्यूट' हा चौथा भाग. 'गुन्हेगारांच्या मागावर', सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' आणि 'सत्यमेव जयते' ही त्यांची अगोदर प्रकाशित झालेल्या जीवनगाथेची नावे. २८ एप्रिल १९८३ ते ३१ मे २०१८ असा ४३ वर्षांचा हा सेवाकाल, पोलीस उपनिरीक्षक ते साहाय्यक पोलीस महानिरीक्षक असा चढता भाजणीतला अभिमानास्पद प्रवास. म्हटले तर खडतर, जिवाशी खेळणारा, म्हटला तर कर्तव्य, सेवा, न्याय यांचे पालन. सेवाकाळात केलेल्या कामगिरीविषयी, झालेल्या दंगलींविषयी, घडलेल्या गुन्ह्यांविषयी, भेटलेल्या अधिकाऱ्याविषयी, त्या त्या वेळी घेतलेल्या निर्णयांविषयी त्यांनी प्रांजळपणे लिहिले आहे. यातून एका कालखंड उभा राहिलेला आहे. असा कालखंडाचा दस्तऐवज म्हणून या चरित्रांकडे पाहिले जाते. व्यक्तिगत प्रवास जसा एका टोकाकडून दुसऱ्या टोकापर्यंत बढतीच्या स्वरूपात आलेखासारखा होत जातो, तसा गुन्हेगारी जग आणि त्यांची कार्यपद्धती, पोलिसदल आणि त्यांची कार्यपद्धती यांचाही आलेख वाचकासमोर कालखंडानुसार उलगडत जातो. जे जे घडते त्याविषयी त्या-त्या वेळी खूप चर्चिले जाते. परंतु पुढे ते काळाच्या ओघात स्मरणातून वाहून जाते. अशावेळी अशा चरित्रांचा उपयोग होतो, जी त्यांचे जतन करून ठेवतात. हे जतन करून ठेवण्याचे काम यशवंत व्हटकर यांनी करून ठेवले आहे. कसाबला जेरबंद करण्याची घटना, कुर्ला दंगल, शक्तीमिल बलात्कार प्रकरण, आझाद मैदान दंगल, मंत्रालयात लागलेली आग, आमदाराने पोलिसावर उगारलेला हात, बंदरातून होणारी तेलचोरी, बलात्काराचा खोटा आळ घेणारी बाई, खंडणी, गुन्हेगार टोळीतील म्होरक्यांची टोपण नावे, खलिस्तान चळवळीचा बिमोड, यासारख्या अनेक प्रसंगात बजावलेली कामगिरी, त्यांचा तपास, त्यावेळी आलेले विविध अनुभव, हे सारे यात आले आहे. शक्तीमिलच्या प्रकरणात सापडलेल्या आरोपीला गोळ्या घालाव्यात इतकी कठोरता, आणि पिडित तरुणीकडे पाहताना खळकन् डोळ्यांत अश्रू येण्याइतपतचे हळवेपण, अशी व्हटकरांची दोन रूपे इथे पाहायला मिळतात. अरविंद इनामदार, सत्यपाल सिंह, हिमांशू रॉय, लक्ष्मीनारायण, विवेक फणसळकर, सतीश माथूर, दाते, यासारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदर्शाविषयी लिहिताना त्यांच्या ठायी असलेल्या कृतज्ञता, आपुलकी आणि पारख यांचा परिचय होतो. त्यामुळे ही जीवनगाथा नावाप्रमाणे केवळ यशवंत गाथा नाही, ती एका कालखडांची मौलिक अशी पोलिसगाथा आहे, असे म्हणता येईल.

दक्षता मासिकाचे सरसंपादकत्व, अध्यात्माकडे झुकलेला कल, कुटुंब, याविषयीचे तपशीलही येथे आलेले आहेत.

**सॅल्यूट**
**यशवंत व्हटकर**



ही एक यशस्वी सेवाकालाची गौरवशाली गाथा आहे. एक कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी, शिस्तीचा कडक अधिकारी, जिवावर उदार होऊन थेट हत्यारधारी जमावाला भिडणारा अधिकारी, न्यायासाठी अन्याय करणाऱ्यांची पाळेमुळे उखडून मुसक्या आवळणारा अधिकारी, अत्याचाराने पिडीत झालेल्यांसाठी काळजातून हेलावणारा अधिकारी, राष्ट्रपती शौर्यपदकाला गवसणी घालणारी कामगिरी पार पाडणारा अधिकारी, अशा अनेक बिरुदावलीने सन्मानित झालेले व्हटकर जमिनीवर पाय रोवून उभे आहेत असेच त्यांची गाथा वाचताना लक्षात येते.

व्हटकरांची लेखनशैली ही खाकी वर्दीवर मिरवलेल्या पदकांसारखी प्रसन्न आहे, माळरानावर उगवलेल्या हिरवळीसारखी. तिच्यात त्यांच्या कडक शिस्तीचे करडे फटकारे नाहीत, सर्व जगाच्या पालकात्वाने गांजलेले अर्वाच्च्य भाषेचे ओरखडे नाहीत, की पदाने प्राप्त झालेल्या अधिकाराचा दर्प नाही. एखादा संवेदशील कवी आपली कविता हळुवारपणे फुलवत नेईल, इतके हळवेपण आणि संवेदनशीलता यात आहे. मार्दव आहे. 'तपासात पोलिसांनी काठी न उचलता नुसते पेन उचलल्याने दंगल घडवून आणणाऱ्यांच्या व दंगलखोरांच्या तोंडाला अक्षरशः फेस आला.' 'तपासात नियंत्रणकक्षाच्या वायरलेस संदेशाप्रमाणे एकेक घटना अक्षरशः माळेतील मण्यांप्रमाणे जोडून त्या घटनेकरिता आवश्यक पुराव्यांची साखळी करवून घेऊन ती सांधून-सांधून एकसंघ 'केस' बनवली.' ' आमच्या तपासाने त्यांची पुरती हवा गेली... सध्या त्यांची अवस्था आहे चेपळून गेलेल्या फुटबॉलसारखी.' यासारखी वाक्ये त्यांच्यातल्या साहित्यिकाची ओळख करून देतात. आपले कार्य आणि शौर्य यांचा आलेख सादर करताना अनेकांना इतरांवर दोषारोप करण्याची, सगळे श्रेय आपलेच आहे असे ठणकावून सांगण्याची वा इतरांचे न्यून दाखविण्याची खुमखुमी असते, परंतु व्हटकरांनी आपली रेषा मोठी दाखवण्यासाठी इतरांच्या रेषा खोडून टाकलेल्या नाहीत. उलट करता येईल तितके कौतुक आणि श्रेय ज्याचे त्याला मोकळेपणाने बहाल केलेले आहे. त्यामुळे त्यांच्या वरिष्ठांप्रमाणेच सहकारी असलेल्या रमेश महालेसारखे इतर अधिकारी आणि हवालदार पवारसारख्या पोलिसांचे कौतुक त्यांच्या नावानिशी केलेले दिसून येते. आपले कर्तव्य पार पाडीत असताना कोणते भान जपायला हवे, याचाही वस्तुपाठ त्यांच्या एकूण कारकिर्दीवरून स्पष्ट होतो.

यापूर्वी काही पोलीस अधिकाऱ्यांची सकस आत्मचरित्रे प्रकाशित झालेली आहेत. त्यांच्यात व्हटकरांच्या आत्मचरित्राने भर घातली आहे, असे निःसंशयपणे नमूद करता येते. सतीश भावसार यांचे उचित मुखपृष्ठ मूर्तिमंत गौरव साक्षात उभे करते.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**दक्षिणेची मथुरा तेर**
**राज कुलकर्णी**




**वैभवाच्या खुणा जपणारे गाव**

'आजपर्यंत ज्यांना जीवनविकासाचा मार्ग कधीच उपलब्ध झाला नाही, अशा अठरापगड जातींना भटकंतीच्या धाग्यात एकत्र गुंफण्याचं काम संतांनी केलं. सामान्यांची ईश्वरभक्तीचं कर्मकांड, पौराहित्य यांच्या तावडीतून सुटका करून प्रपंचाला परमार्थ पातळीवर नेण्याचं शिकवलं ते संतांनी. भागवतभक्तीची महती सांगणाऱ्या वारकरी संप्रदायाची जन्मभूमी म्हणजे मराठवाडा आणि या मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यात भगवंतांची पताका फडकावली ती तेरच्या गोरोबा कुंभार यांनी.'

महाराष्ट्राला लाभलेली सांस्कृतीक, संत–शौर्याची परंपरा, उभी असलेली कला, भक्ती, शिल्पे, तीर्थे,गड, लेण्या यांची अजोड देण, नदीखोऱ्यांचे वैभव, इतिहास, संपन्नता, यामुळे सर्वगुणसंपन्न असा महाराष्ट्र हा आपला प्रत्येकाचा अभिमानाचा मानबिंदू ठरलेला आहे. त्यात भर पडली ती उत्खननातून उजेडात आलेल्या प्राचीन अशा संस्कृतीची, वैभवाची. ती आहे 'तेर' नावाची. उस्मानाबाद जवळ असलेल्या 'तेर' गावाचे वैभव तेथे झालेल्या उत्खननामुळे उजेडात आले. त्यासाठी ब्रिटिश संशोधक कझीन, निजाम सरकार, बी.एन. चाफेकर आणि बॅनर्जी, म रेश्वर दीक्षित यांनी केलेले प्रयत्न जसे मौलिक आहेत, तसे ते वाचकांपर्यंत पोहचवण्याचे श्रेय राज कुलकर्णी यांच्याकडे जाते. 'तेर' हे केवळ उत्खननाशी नाते सांगणारे एक गाव नाही, तर त्याला एक संस्कृती आहे, जी मोहंजोदडो आणि हडप्पाच्या संस्कृतीशी साम्य दर्शवते, तिच्याशी नाते दर्शवते, तिचा सर्वांगीण परिचय करून देताना या गावाला 'दक्षिणेची मथुरा' अशी उपमा दिलेली आहे. पैठण ही दक्षिणेची काशी समजली जाते तसे तेर दक्षिणेची मथुरा.

राज कुलकर्णी हे व्यवसायाने विधिज्ञ आहेत, तरी वृत्तीने साहित्यिक आणि संशोधक आहेत. आकाशवाणी, वृत्तपत्रे, नियतकालिके यांच्यासाठी नियमित लेखन केलेले असून, 'आठवडी बाजार' आणि 'वेताळ पंचविशी' ही त्यांची पुस्तके प्रकाशित आहेत. 'पं.जवाहरलाल नेहरू' हा यांच्या संशोधनाचा विषय आहे. नुकतेच उस्मानाबाद येथे पार पडलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनातही त्यांचा लक्षणीय असा सहभाग होता.

तेर येथे सापडलेल्या अनेक वस्तू, भांडी, मूर्त्या, नाणी, स्तूप, विटा, शिलालेख, यावरून या गावाच्या रचनेची, तेथील लोकजीवनाची, संस्कृतीची, राहणीमानाची, व्यापारउदीम, पिके, यांची माहिती उपलब्ध झाली आहे. तिचा संपूर्ण तपशील या पुस्तकात आलेला आहे. या सापडलेल्या वस्तूंचे जतन येथे उभारलेल्या लामतुरे संग्रहालयात केलेले आहे.

या गावाला ऐतिहासिक वारसाही लाभलेला आहे. सातवाहन, शिलाहार ते निजामाच्या राजवटीपर्यंतच्या इतिहासाचे वैभव या गावाने अनुभवलेले आहे,जतन केलेले आहे. निजाम आणि स्वातंत्र्य चळवळ यांचे हे गाव साक्षीदार आहे. अनेक घाव या गावाने सोसलेले आहेत. त्याकाळी गावाभोवती लाकडी तटबंदी असलेले एकमेव गाव म्हणून याची इतिहासात नोंद झालेली आहे.

लामतुरे पुरातत्त्व वस्तुसंग्रहालय यालाही एक इतिहास आहे, त्यासाठी लामतुरे कुटुंबाचे योगदान, येथे सापडलेली हस्तदंती बाहुली व तिच्यावरून सिद्ध झालेली हस्तदंती कला, हा एक वेगळाच इतिहास या पुस्तकात वाचायला मिळतो. मराठवाडा ही संतांची भूमी आहे. संत गोरोबा कुंभार याच तेरचे. त्यांनी रुजवलेला भक्तीभाव या गावाने आजही श्रद्धा आणि निष्ठापूर्वक कसा जतन केलेला आहे, त्याचा आणि संत गोरोबा कुंभारांचा थोडक्यात पण प्रत्ययकारी असा परिचय लेखकाने या पुस्तकात करून दिलेला आहे. तो आदर्श म्हणजे त्या गावाचे सांस्कृतिक वैभव म्हणायला हवे.

राज कुलकर्णी यांनी अतिशय मेहनतीने हे पुस्तक साकारलेले आहे. त्यासाठी त्यांनी केलेला अभ्यास आणि संशोधन याचा प्रत्यय हे पुस्तक वाचत असताना येतो. तेर गावाचा इतिहास, स्वातंत्र्याचा इतिहास, सातवाहनांपासूनचे ऐतिहासिक पुरावे, उत्खननाचा इतिहास, असा मोठा दस्तऐवज या पुस्तकाच्या निर्मितीत सामावलेला आहे. संत एकनाथ, संत नामदेव यांच्या अभंगातून आलेले तेरविषयीचे आणि संत गोरोबा कुंभार यांच्या विषयीचे अचूक संदर्भ वाचताना आपण थक्क होतो. कुठलेही संशोधन मुळापर्यंत जाऊन केलेले असेल तर ते परिपूर्णतेच्या निर्मितीचा आनंद नक्कीच देते. तसा आनंद हे पुस्तक वाचताना मिळतो. एखाद्या गावाची माहिती देताना ती गॅझेटियरमध्ये असते तशी रुक्षपणे दिली जाते. परंतु राज कुलकर्णी यांनी या पुस्तकाच्या लेखनाला तसे खर्डेवजा रुक्षपण येणार नाही याची काळजी घेतलेली आहे. मजकूर जसा सर्वांगीन असायला हवा तसा तो वाचनीय असला पाहिजे, वाचक या लेखनाशी जोडलेला राहिला पाहिजे, हे भान त्यांनी राखले आहे, याचा अनुभव पुस्तक वाचताना सतत येत राहतो. मजकुराच्या जोडीला जसे संदर्भ येतात तसे अनेक फोटो दिलेले आहेत. त्यातले काही रंगीत आहेत. त्यावरून तेरच्या संस्कृतीचा, एकूण जीवनव्यवहाराचा परिचय दृश्यस्वरूपात होतो. लेखनातली सहजता आणि तिच्यातला सखोलपणा भावणारा आहे. लेखनाला जो समग्रपणा असायला हवा तो तर जपलेला आहेच परंतु तो वाचत असताना आपण वाचक लेखकाच्यासोबत तेर गावाच्या खाणाखुणा पाहात त्या गावातून प्रत्यक्ष हिंडत आहोत, असे वाटत राहते. उत्खनन आणि उत्खननाशी जोडलेल्या गावाचा इतिहास कसा लिहिला जावा, याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'दक्षिणेची मथुरा तेर' हे पुस्तक होय.

तेर येथे सापडलेली हस्तिदंती बाहुली ही त्याकाळच्या तेर गावाच्या शिल्पकलेची प्रतीक समजली जाते. परदेशात पचंड लोकप्रिय असलेली ही बाहुली आजही लामतुरे यांच्या संग्रहात पाहायला मिळते. शिरीष घाटे यांनी ही बाहुली मुखपृष्ठावर योजताना तिचे मूळ स्वरुपाला जसेच्यातसे जिवंत ठेवलेले आहे. या बाहुलीच्या डोळ्यांत असलेला नितळ घारेपणा ही तिची खरी ओळख. ती ओळख कायम ठेवण्यातले कौशल्य मुखपृष्ठकारांकडे नक्कीच जाते.

**मूल्य १६० रुपये सवलतीत १०० रुपये**

# ग्रंथपान

ट्वेल्थ फेल
अनुराग पाठक
अनुवाद : संदीप काळे



**जिद्द आणि चिकाटी यांची साथ क्षमतेला असेल तर यश शरण येणारच!**

'मनोज, तुझ्यामध्ये खूप काही करण्याची अपार क्षमता आहे. जर तुझ्यात क्षमता राहिली नसती तर मी तुला काहीच सांगितले नसते. मात्र आपल्या क्षमतेसोबत न्याय न करणे म्हणजे स्वतःवर आणि समाजावर अन्याय करण्यासारखे आहे. सर्व अपमानांचा बदला घेण्याचा एकच मार्ग आहे, तो म्हणजे यशस्वी होऊन जगासमोर उभे राहणे.'

'ट्वेल्थ फेल' या अनुराग पाठक लिखित हिंदी कादंबरीचा मराठी अनुवाद केला आहे 'सकाळ समूहा'चे प्रसिद्ध पत्रकार आणि संपादक, संदीप रामराव काळे यांनी. सिद्धहस्त लेखक म्हणूनही त्यांनी स्वतः चे स्थान सिद्ध केलेले आहे. आतापर्यंत पंचवीस ग्रंथां नावांवर जमा आहे. 'मु.पो. आई' या ग्रंथाने तर त्यांच्या कारकिर्दीवर कळस चढविलेला आहे, असे निर्विवादपणे सदरचा अनुवाद हा त्यांच्या उत्तम अनुवादकाची सा परभाषेतले कुठलेही साहित्य अनुवादामुळे आपला मू पूर्णपणे पुसून टाकल्याचा कटू अनुभव जेथे घेते, ते अनुवादाद्वारे त्याच्या भाषेत उत्तम कामगिरी बजावल्याच होतो. तो अनुभव संदीप काळे यांनी या अनुवादाद्वारे निखलसपणे म्हणता येते. त्यांचा 'भाऊ' हा शब्द मात्र देण्यास विसरत नाही.

मनोश शर्मा या तरुणाची ही कहाणी आहे. गणि बागुलबुवा मानगुटीवर बसल्यानंतर जे होते तेच मनो त्याला टाळून पुढे जाण्याला पर्याय राहात नाही. परंतु नसते. दात आहे तर चणे नाहीत आणि चणे आहेत तर दात नाहीत, या म्हणीची पुरेपूर अनुभूती या प्रवासात सतत येत राहणे, याला कोणते भाग्य म्हणायचे? तरीही मनोज हा काटेरी प्रवास तडीस नेण्याची चिकाटी सोडीत नाही, हे महत्त्वाचे. या खडतर प्रवासात अनेक व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. त्यात प्रामाणिक, इमानदार वडिलाचे ध्येयवादी व्यक्तिमत्त्व, तात्काळ निर्णय घेऊन अनेकांना न्याय देणारे दुष्यंतसिंह नावाचे वरिष्ठ अधिकारी, विवेकानंद केंद्राचे त्यागी, यांचे चित्रण आणि त्यांच्या आदर्शांवर चालण्याचे मनोजचे संकल्प, हे प्राप्त परिस्थितीत जळत्या निखाऱ्यांवरून चालण्यासारखे भासत राहते. काटकसरीत नेटाने संसाराचा गाडा ओढतांनाही मुलाच्या शिक्षणासाठी पदरमोड करणारी आई, प्रेमात पडल्यानंतरही त्यात हरवून न जाता स्वतःचे ध्येय गाठणारी, प्रेम वेगळे आणि भवितव्य घडवणे वेगळे यांची जाणीव ठेवणारी, ती मनोजला करून देणारी श्रद्धा, मदत करण्यात कुठेही मागे नाही परंतु परखडपणे अपमान होईल इतका जिव्हारी बोलणारा पांडे नावाचा मित्र, यांची चित्रणे अतिशय सकसपणे साकारलेली आहेत. ग्रामीण आणि शहरी जीवन, गामीण भागात असलेल्या शैक्षणिक दुरावस्थामुळे मुलांची शहरी मुलांच्या तुलनेत होणारी स्पर्धेतील कोंडी, लोकसेवा आयोगाच्या पूर्व व मुख्य, मुलाखत असे परीक्षेचे टप्पे, त्यासाठी करावी लागणारी तयारी, प्रेमात पडलेल्यांची मानसिक अवस्था, असा मोठा आवाका या कादंबरीला लाभलेला आहे. एखादा चित्रपट पहावा तसा हा प्रवास आपल्यासमोर झरझर उलगडत जातो. प्रत्येक टप्प्यावर श्वास रोखून ठेवायला तर कधी भावनाविवश होण्यास भाग पाडतो.

तरुणांच्या भावविश्वाला हळुवारपणे फुलवत जाणारी ही कादंबरी आहे. यशाचा पाठपुरावा करताना होणारी दमछाक आणि पुन्हा पुन्हा नव्याने सुरुवात करताना वाटणारी उमेद, यात मानसिक अवस्थांची जी आंदोलने उसळतात, आपटतात लाटांसारखी, त्यांची वर्णने वाचकाला आपलेपणाशी जुळवून घेतात. स्थळकाळानुसार भाषेचा वापर बदलत जातो, त्यांची कंपने हृदयाची कंपने मोजताना दिसतात तशी लेखकाने समर्थपणे उलगडलेली आहेत. कथानकाचा बांधेसूदपणा हा कादंबरीसाठी मोठा गुण आवश्यक असतो, तो इथे पीळदारपणे दिसून येतो. 'माणसाने तितकीच मोठी स्वप्ने बघावीत जितकी त्याची पात्रता असते.' 'नेहमी उंच भरारी घेतली पाहिजे. खूप उंची ी तरी त्यात वाईट काही नाही. त्यानिमित्ताने निदान होतील.' ' 'टुरिझम' आणि 'टेररिझम' या शब्दांच्या चा गोंधळ होऊन तो चुकला होता.' यासारखी अनेक प्रतिभेची आणि कथानकाची सुंदर प्रतीके ठरलेली

शिखरापर्यंत पोहोचण्यापर्यंतचा प्रवास हा एकट्याचा त्यात अनेकांचा सहभाग असतो. त्या सगळ्यांना समोर गण्याचा, वातावरणाचा, परिस्थिती व बौद्धिक क्षमता, ावा लागतो. तो लेखकाने घेतलेला आहे. स्वतःचे गाव, पिली कोठी, उत्तरांचल असा भौगोलिक प्रवास, तिथली मानवी वर्तन, यांची वर्णने कादंबरीला जिवंतपणा बहाल ी मांडणी लहान लहान अशा पन्नास प्रकरणांत केलेली ण एखाद्या यशस्वी ठरलेल्या आयपीएस अधिकाऱ्याचे आहोत असे सतत वाटत राहते. वास्तविक हे खरोखर एका मनोजकुमार शर्मा नावाच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याचे चरित्र आहे. त्यामुळे याला 'चरित्रात्मक कादंबरी ' म्हणता येईल. 'मनोजकुमार शर्मा हे इतरांना कायम उर्जा देणारे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांची ही उर्जा अनेकांपर्यंत येवो यासाठी हा पुस्तक प्रपंच आहे', संदीप काळे यांनी अनुवादाबाबतची स्वतःची भूमिका त्यांच्या मनोगतात मांडलेली आहे. प्रकाश आमटे यांची प्रस्तावना या पुस्तकाला लाभलेली आहे. एक चांगले पुस्तक मराठी आणले यासाठी संदीप काळे यांचे अभिनंदन करायला हवे. 'महाराष्ट्रातला प्रत्येक तरुण या ऐतिहासिक दस्तऐवजाचं जबरदस्त स्वागत करेल' हा अनुवादकाचा विश्वास सार्थ ठरेल, असे हे पुस्तक नक्कीच आहे.

दिल्ली दरवाज्यात प्रवेश करणाऱ्या ट्वेल्थ फेल तरुणाचा प्रवेश, ही कल्पकता आशयाला संपन्न करणारी आहे. तीच कल्पकता नयन बारहाते यांनी समर्पकतेने मुखपृष्ठावर साकारलेली आहे. आयुष्याची रम्य पहाट उजळणारी रंगसंगती तितकीच अनुरूप आहे.

**मूल्य १९६ रुपये सवलतीत १३० रुपये**




# ग्रंथपान

चांगदेव काळे

संपर्क : ९८६९२०७४०३

**ओंजळ**

**रेश्मा राणे-जाधव**




**सुगंधात न्हालेली ओंजळ**

दे लढा अन लिही जुलुमाच्या प्रतिकाराचं तेजस्वी पान
मुळापासून उपटून टाक अन्यायानं माजलेलं रान

कवयित्रीचा हा संग्रह पहिलाच आहे असे प्रस्तावनेत नमूद केलेले आहे. संग्रह पहिला आहे म्हणजे कवयित्री नव्याने कविता लिहू लागली आहे, असा मात्र त्याचा अर्थ नाही. अनेकांचे कवितासंग्रह हे खूप उशिरा प्रकाशित झालेले असतात परंतु त्यांचे काव्यलेखन हे त्याच्या खूप आधीपासून सुरू झालेले असते. फळे आणि फुले आल्यानंतर झाडाच्या अस्तित्वाची दखल घेतली जाते, परंतु झाड त्याच्या कितीतरी आधीपासून जमिनीत रुजलेले असते, हे लक्षात घ्यायला हवे. लेखनात आलेली प्रगल्भता आणि कसदारपणा हा त्या फळाफुलांसारखा आहे परंतु तो काही नव्याजुन्यावर अलंबून नसतो, वा पुस्तकांच्या संख्येने गुणोत्तरे सांगणारा नसतो. तो असतो त्या कवीच्या प्रतिभेचा आविष्कार, स्वतःच्या अस्तित्वाने दिपवून टाकणारा, आपलासा वाटणारा, भारावून सोडणारा. तसा हा 'ओंजळ' नावाचा संग्रह आहे.

या संग्रहात पन्नास कवितांचा समावेश आहे. या कवितांना स्वतःचा असा तरल वर्ख आहे. आत्म्याचा शोध घेण्याचा प्रयत्न या प्रत्येक कवितेतून प्रकर्षाने जाणवतो. त्यातला प्रांजळपणा काळजाला हात घालणरा आहे. 'देवदासी' या कवितेत 'तनासकट माज्या मनाची बी मातीच हाय', 'रात फकस्त माझ्यासाठी, दिसा माझं कोन न्हाय' अशा ओळी येतात तेव्हा मन हेलावल्याशिवाय राहत नाही. या कवितेला ग्रामीण बोलीभाषेचा साज चढवलेला आहे. तशा आणखी 'वझं' (८०), 'तवाच भूक कळाया लागली' (८५) या बोलीभाषेचा आधार घेणाऱ्या कविता आहेत. त्यांचे वेगळेपण हे मुळातल्या मातीशी नाते सांगणारे आहे. 'बाई : फक्त एक घुसमट' ही कविता बाईच्या संपूर्ण आयुष्याचा आलेख मांडणारी कविता म्हणता येईल. जन्मापासून जन्म देईपर्यंत आणि जन्मभर फक्त बाईपणाची घुसमट प्रत्येक टप्प्यावर कशी श्वासागणीक हिशेब देत राहते, याचे प्रत्ययकारी दर्शन घडवते. हे दर्शन उसवून टाकणारे आहे. 'लेकी, ओझं वाटतं ह्यांना तुझं' याच धाग्यात मांडलेली आहे. या कविता कवयित्रीच्या आरस्पानी निरीक्षणाची, स्वतः कडे खोलवर पाहण्याची दृष्टी देते. तरीही या कविता स्त्रीवादाचा पुरस्कार करणाऱ्या नसून स्त्रीकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाला अधोरेखित करणाऱ्या आहेत. अवतीभवती खूप काही घडताना पाहूनही 'महाकाय' वटवृक्ष तटस्थ राहतो, हा वटवृक्ष माणसांच्या तटस्थपणाचे प्रतीक आहे. आज कितीही प्रगतीच्या गोष्टी करत आहोत तरी मानव अजून अश्मयुगाशीच उभा आहे, हे निरीक्षण प्रत्येकाच्या आत्मीक प्रवृत्तीवरच घाव घालणारे आहे. माणसाची बंद मूठ ही सामर्थ्य देणारी असू शकते तशी रितीही असू शकते. खेळला जाणारा खेळ हार येणार म्हणून टाळायचा नसतो तर तो जिंकण्यासाठी खेळायचा असतो. वारी आणि वारकरी यांच्यातले नाते कैवल्याशी जोडणारे असते तर स्प्रिंगच्या बाहुलीत आलेले मुकेपण हे मूक समाजाचे द्योतक ठरते. परंतु कधीतरी ही आज्ञेनुसार चालणारी बाहुली ठोका चुकवील असा आवाज करील असा इशाराही देते.

कवयित्रीला असलेली कवितेची समज ही उपजत गुणांची ओळख करून देणारी आहे, फुलात असलेल्या रंग आणि गंधासारखी. तिच्यातले सहजपण प्रवाहीपणाशी नाते सांगणारे आहे. कुठेही ओढून, बळजबरीने प्रतिमा आणि रुपकांना कोंदणात बसवण्यासारखा अंगिकारण्याचा सोस तिला नाही. कवितेला तिच्या बाजाप्रमाणे फुलू द्यावे, आपल्याला जे सांगायचे आहे, ते तिच्यात चपखलपणे मिसळले जाईल इतकेच भान जपावे, ही अलिप्तता खूप अलवार आणि सुखवणारी म्हणता येईल. कवितांची लांबीरुंदी मोठी आहे पण ती तिच्या आशयाची अपरिहार्यता आहे. मुक्तछंदाचा वापर केलेला आहे पण मोकाट सुटण्याचा स्वच्छंदीपणाचे स्वातंत्र्य घेत नाही. अनेक कविता या लयबद्ध असा ठसा उमटवणाऱ्या आहेत, तर काही कवितांचा ठेका आपल्याला त्यांच्यासोबत चालीवर गाण्यास भाग पाडतो, ठेका धरायला लावतो. बऱ्याचशा कविता सरोजिनी बाबर यांनी संकलित केलेल्या लोकगीतांशी नाते सांगतात. बालपण (३९), मरण (४१), लेकी (४४), घर (५८), शब्द (७२) या कवितांमध्ये आलेले वेगळेपण रुणझुणत आलेले असून कवितांचा ठसठशीत असा ठसा उमटवते. एखादे धृवपद पुन्हा पुन्हा येते तशा कवितेच्या शीर्षकओळी प्रत्येक कडव्यात शीर्षभागी येतात, त्यामुळे कवितेचा ठाशीवपणा शिल्पासारखा अधिक भरीव आणि आशयसंपन्न होतो. एक वेगळा आणि संग्रही असावा असा हा संग्रह कवयित्रीविषयी खूप अपेक्षा व्यक्त करणारा आहे.

'फुलांची ही ओंजळ' निश्चितच सुगंधी आहे. ग्रीष्माच्या कडक उन्हात, चैत्र महिन्यात येणाऱ्या मोगऱ्याचे झाड जसे चहुअंगांनी टपोऱ्या पांढऱ्याशुभ्र फुलांनी बहरून गेलेले असते आणि या फुलांचा सुगंधी दरवळ जसा चहुदिशांना सुगंधी करत असतो, तद्वत हा कवितासंग्रह पानोपानी सुरेख कवितांनी बहरला आहे. मोगऱ्याच्या सुगंधाप्रमाणे या देखण्या कविता वाचकांच्या काळजात कधी घर करतात हे समजतसुद्धा नाही. हे कौतुक केले आहे डॉ. कीर्ती आनंद यादव यांनी. यापेक्षा आणखी वेगळा पुरस्कार कोणता असू शकतो!

मोगऱ्याची ताजी फुले पटकन मनाला आकर्षित करतात ती त्यांच्या मोहून टाकणाऱ्या सुगंधाने आणि प्रसन्न टपोऱ्या टवटवीतपणामुळे. ओंजळ भरून ही फुले घ्यावीत आणि अशी नाकाशी घट्ट धरून ठेवावीत की, थेट काळजाची कुपीच अपुरी वाटावी. तीच ओंजळ सतीश भावसार यांनी मुखपृष्ठावर अलगदपणे पुढे केली आहे. ती पाहताना आतल्या कवितांची फुले आपल्यासमोर गंध घेऊन आल्याचा भास होतो.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

**एका स्वर्गस्थ देशाची गोष्ट**
**संजय कळमकर**



**अद्‌भुत आणि वास्तव**

पुन्हा मतदान करू नये म्हणून भारतात बोटाला शाई लावतात, हे एका दुय्यम निवडणूक अधिकाऱ्याने सांगितले, तेव्हा एक देव हसत म्हणाले, स्वर्गात ते शक्य नाही. काही देवांना चार–चार, सहा–सहा हात आहेत. काही दानवांना तर शंभर हात आहेत. बोटांना शाई लावण्याचे ठरले तर तेच काम कित्येक वर्षे चालेल. त्यापेक्षा मतदान केल्यावर सरळ हातच काढून निवडणूकशाखेत जमा करायचे. त्यावर ज्याच्या त्याच्या नावाची लेबले लावायची. मतदानप्रक्रिया पूर्ण झाल्यावर हात ज्याचे त्याला परत करायचे.'

देवाने निर्माण केलेल्या पृथ्वीवरील मानवजातीचे सर्वेक्षण करण्यासाठी स्वर्गातून देवच वेष पालटून पृथ्वीवर येतात, त्यावेळी त्यांना जे आढळते ते आश्चर्य आणि कल्पनेच्या पलीकडचे आहे. गणपतीउत्सव, देवांची गजबजलेली स्थळे, शिक्षण, शिक्षक आणि संस्था, माणसांच्या जगण्याचे पाच प्रकार, आरक्षण, पैसा, कीर्तनकार, दवाखाने व करावयाच्या चाचण्या, अशा अनेक क्षेत्रांचा अनोखा परिचय त्यांना होतो. मानवाने परग्रहांवर वसती करण्याइतपत चालवलेले प्रयत्न म्हणजे प्रत्यक्ष स्वर्गालाच दिलेले आव्हान नव्हे, तर जगन्नियंत्यालाच आव्हान आहे इतपत केलेली वैज्ञानिक प्रगती, हा त्यांच्यासाठी धोक्याचा जणू इशाराच म्हणावा लागेल. यात आणखी एक मोठे क्षेत्र आहे ते राजकारण आणि निवडणुकांचे. हे सर्वेक्षण देवाधिदेवांसाठी त्यांच्या कल्पनेपेक्षाही मानवाची प्रगती दाखवणारे आहे. या सगळ्यांचे मार्मिक चित्रण या कादंबरीत नेमकेपणाने आलेले आहे. या कादंबरीचा दुसरा भाग आहे तो राजकारण आणि निवडणुकीचा. पृथ्वीवरील राजकारण स्वर्गात नव्हे नरकात पोहोचते, परंतु त्याची धास्ती स्वर्गापुढे उभी राहते. पृथ्वीवर सत्तेसाठी सर्वकाही क्षम्य समजले जाते. निवडणुकीसाठी उभा करण्यात येणारा उमेदवार लायक कोणता याची कसोटी म्हणजे, त्याचे कोणत्याही प्रकारे निवडून येणे हीच. स्वर्गात हेच राजकारण शिरते आणि देवेंद्राच्या सिंहासनालाच आव्हान उभे राहते. विरोधी पक्षाला गारद करण्यासाठी आणि आपली सिंहासनावरील सत्ता आपल्याच हाती ठेवण्यासाठी मग देवेंद्राला मदत घ्यावी लागते ते पृथ्वीवरून आलेल्या मुरब्बी राजकारणी मंडळीची. ही राजकारणी मंडळी सत्तेसाठी पटावरील मोहरे फिरवण्यात पटाईत कसे आहेत याचा अनुभव देवेंद्रासाठी आश्चर्यकारक आहे, त्याचवेळी त्यांच्या मदतीपोटी केलेल्या मागण्याही. हे राजकारणातले डावपेच आणि तडजोडी, त्यानुसार येणारे निकाल, यांची उत्कंठा शेवटपर्यंत उत्तमपणे सांभाळलेली आहे. नरक आणि स्वर्गातला भेद, यमावर कामाचा येणारा ताण, त्याच्या रेड्याला करावे लागणारे काम, यासाठी सातव्या वेतनाची त्याने केलेली माागणी, इतकेच नव्हे; तर प्रत्येक प्रसंगी या सातव्या वेतनाची मागणी पुढे रेटण्याचा प्रयत्न, हे सारेच मनोरंजक आहे आणि त्याचवेळी जाणवत राहते, पृथ्वीवरील जगण्यात आणि स्वर्गातील जगण्यात असलेले अंतर आता कमी झालेले आहे की काय? एक मात्र खरे, की पृथ्वीवरील एकूण वास्तव डोळसपणे यात आलेले आहे आणि ते डोळ्यांत घालण्याइतके अंजनाचे जळजळीत अर्क आहे. स्वर्गाने स्वर्गातच रममाण राहावे, त्याने पृथ्वीच्या प्रेमात न पडलेलेच बरे! पण हेच होकायंत्र उलट दिशेने फिरवता येईल, याचा विचार करा, असा सूचक हेतू प्रत्येकाने विचारात घेतला तर! ही अपेक्षा फोल नसावी.

संजय कळमकर यांची ही कादंबरी मनोरंजनाच्या अंगाने जाणारी, अद्‌भुत, उत्कंठावर्धक आणि काहीशी मिथकस्वरूपाची म्हणता येईल. कळमकर यांच्याकडे असलेली सर्जनशीलता आणि नवीन वाट चोखाळण्याचे सहजपण वाखाणण्यासारखे आहे. स्वर्गात राहणारे देव आणि त्याने पृथ्वीसारख्या एका ग्रहावर निर्माण केलेले जीव, यांच्यात असलेली साम्य आणि विसंगतीदर्शक स्थळे, यांच्यातला समन्वय आणि विरोधाभास एकाच वेळी दृश्य–स्वरूपात दाखवणे म्हणजे तारेवरची कसरत म्हणावी लागेल. परंतु कळमकर यांनी लीलया ही कलाकृती साकारली. भाषा हा सगळ्यात महत्त्वाचा आणि लक्ष वेधून घेणारा भाग. स्वर्गात देवांच्या तोंडी असणारी भाषा आणि पृथ्वीवरील माणसांच्या तोंडी असलेली भाषा यातले नेमकेपण त्यांनी अतिशय तरलपणे जपलेले आहे. मोबाईल–गगनध्वनी, वारा–पवनदेव, टीव्ही–स्वर्गमाध्यम,लोकसंसद–देवसंसद, शिवशाही–देवशाही, स्पेसशटल–महास्वर्गयान, अशा अनेक शब्दांचे चांदणे स्वर्गाच्या रम्य आणि सुखद वातावरणाचे कल्पित अस्तित्व चंदेरी करून टाकते, वाचकालाही त्याच्यात न्हाऊ घालते. स्वर्ग कसा असेल, हे जो तो आपल्या कल्पनेने रंगवतो. परंतु इथे प्रत्यक्षात स्वर्गच लेखकाने आपल्यासमोर उभा केलेला आहे. त्या स्वर्गात देवेंद्र, त्याची पत्नी इंद्राणी यांच्यात झालेले संवाद, देवेंद्र आणि यम यांच्यात झडणारी शाब्दिक चकमक, दरबार, राजमहाल, विश्रांतीस्थळे, करमणूक, या सगळ्या प्रसंगांचे आपण साक्षीदार आहोत, इतके त्याच्याशी एकरूप होतो. कादंबरीत आलेल्या व्यक्तिरेखा, त्यांच्यात असलेले व्यावहारिक आणि सोयीचे शहाणपण अचंबित करते तसे लेखकाच्या निरीक्षणाचा प्रत्यय देते.

ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक डॉ. द.ता. भोसले यांनी केलेली समीक्षा हा या कादंबरीचा मोठा पुरस्कार म्हणावा लागेल.

मानव देवापुढे शरण जाताना हात जोडतो यात नवल नाही. परंतु देवाने मानवापुढे हात जोडलेले आहेत, असे दृश्य कधी आपल्या पाहण्यात नाही. पण तेच विपरीत दृश्य या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर पाहायला मिळते. त्यामुळे साहजिकच आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. यात आणखी विरोधाभास असा, देव स्वर्गाच्या द्वाराशी उभा आहे आणि ज्या मानवापुढे त्याने हात जोडलेले आहेत तो आहे हातात मोबाईल घेतलेला. बरे हा मानव कुणी भक्त म्हणावा तसा नाही, तो आहे राजकारणात मुरलेला राजकारणी. अशा दोन ध्रुवांवर असलेल्या वृत्तींची मोट बांधलेली आहे चित्रकार सतीश भावसार यांनी. लेखकाच्या कल्पक सर्जनशीलतेला आणि आशयाच्या गाभ्याला साजेसे हे मुखपृष्ठ आहे.

**मूल्य ३०० रु.  सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

## टिपंवणी

**डॉ. सिसिलिया कार्व्हालो**




**थेंबथेंबांतूनी भरल्या निर्मळ अमृताच्या घागरी**

'बारीक-सारीक चुकांसाठी पापनिवेदन करायचं आणि पुन्हा त्याच चुका करत राहायच्या, याला काही अर्थ आहे का? उलट ज्यावेळेला काही चूक घडली असेल त्याचवेळेला त्या व्यक्तीकडून क्षमा मागितली तर खरा मोठेपणा आहे.'

डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांचे नाव म राठी सारस्वतांच्या यादीत सन्मानाने घेतले जाते. त्यांनी आतापर्यंत केलेली साहित्यसेवा ही केवळ रसिकवाचकमान्यच नव्हे; तर कसदारपणामुळे ती समीक्षकांच्या आणि सारस्वतांच्या मान्यतेची मोहोर उमटलेली अशी राजमान्य सेवा ठरलेली आहे. कवितासंग्रह, कथासंग्रह, कादंबरी, समीक्षण, संपादन, संशोधन, अनुवाद, चरित्रात्मक, बालसाहित्य अशा सर्व क्षेत्रांत त्यांनी बजावलेली कामगिरी त्यांच्या सृजनशीलतेचा परिचय करून देण्यास पुरेशी आहे. आणि त्यासाठी त्यांना सन्मानित करण्यात आलेल्या पुरस्कारांची यादी ही त्यांच्या दर्जेदार लेखनावर उमटलेली मोहोर आहे, हे मान्य करायला हवे.

'टिपंवणी' हे आत्मकथन म्हणजे त्यांनी घेतलेला स्वतःचा शोध आहे, समरसतेने आणि तितकाच अलिप्तपणे. आत्मकथनात केवळ स्वतः च्या जीवनाचे, यशापशाचे चित्रण करून स्वतः चे मोठेपण सिद्ध करणे, असा साधारणतः आत्म कथनात दिसून येतो. परंतु प्रस्तुत आत्मकथन त्याला अपवाद म्हणता येईल. स्वतःकडे किती अलिप्तपणे पाहता येऊ शकते, स्वतःच्या एकूण जगण्याचा आलेख किती निर्मळपणाने मांडता येऊ शकतो, त्याचे उत्तम उदाहरण म्हणून या आत्मकथनाकडे पाहता येईल. आत्मकथनात केवळ एका व्यक्तीचे जगणे नसते. कुटुंब, गाव, समाज, संस्कार, भवताल, अशा अनेक घटकांचा तो दस्तऐवज असतो. तो दस्तऐवज म्हणजे हे आत्मकथन. शिशिन ऊर्फ सिसिलिया वसईच्या भूमिकन्या, तिथल्या जडणघडणीशी एकरूप झालेल्या, कौटुंबिक स्थित्यंतरे आणि गावाची स्थित्यंतरे यांचा समान धागा त्या हळुवारपणे उलगडत जातात, तेव्हा साठच्या दशकापासूनचा खूप मोठा कॅनव्हास आपल्या पटलासमोर साकारत जातो. मराठी माध्यमात शिकलेली, पहिल्या नंबरात उत्तीर्ण होणारी, शिक्षणाचा ध्यास घेतलेली, स्वतःच्या पायावर उभी राहून कुटुंबाच्या जबाबदारीचा क्रूस कुणाच्या मदतीची अपेक्षा न ठेवता स्वतःच वाहणारी, स्पष्ट बोलणारी, अन्यायाच्या विरोधात ठाम उभी राहणारी, समाजासाठी आपण झटले पाहिजे हे भान जपणारी, शिक्षक, प्राध्यापक, वक्ता, साहित्यिका, अशा अनेक रूपांत वावरताना सतत व्यस्त असणारी आणि तरीही आपलेपण जपणारी, पाय जमिनीवर असलेली, अशा विविध भूमिकांत असलेल्या सिसिलिया हे एक प्रसन्न व्यक्तिमत्त्व आहे, जे संपूर्ण आत्मकथनात आपल्यासोबत एका निवेदकाच्या भूमिकेत वावरताना दिसते.

'टिपं' म्हणजे थेंब आणि 'वणी' म्हणजे पाणी. 'टिपंवणी' म्हणजे थेंबथेंब पाणी, शीर्षकाविषयीची ही फोड त्यांनी मनोगतात केलेली आहे. त्याकाळात पाण्यासाठी किती वणवण करावी लागत होती, हेही यात अध्याहृत आहे. कुडाच्या कौलारू घरात एकत्र कुटुंबपद्धतीत असलेला स्नेह जसा जिव्हाळ्याचा तसा गाव म्हणूनही होता. समाजबांधवात होता, जो जातीच्या भिंतीपलीकडचा होता. घरात बोलीभाषेत जे व्यवहार होत ते वाडवळी भाषेत. त्या शब्दांचे उच्चार आणि त्यांचा अर्थ दोन्ही इथे दिलेले आहेत, त्यामुळे त्या भाषेतला गोडवा तेथील फळभाज्यांइतकाच मधुर असल्याचा जाणवतो. चर्च, चर्चमधील प्रार्थना, तिथे उपयोगात असलेले शब्द, बाप्तिस्मा, लग्नसंस्कार, पापनिवेदन, फादर, यांचा परिचय येथे होतो तसाच सिसिलिया यांना भेटलेल्या कुसुमाग्रज, अण्णा आणि अरुणा ढेरे, वामनदादा, दया पवार, ऊर्मिला पवार, मृत्युंजयकार अशा अनेक मान्यवरांविषयीच्या हृद्य आठवणी यात दिलेल्या आहेत. एक मोठे भाग्य त्यांच्या वाट्याला आले ते त्यांनी स्वतःच्या हिमतीने घडवले म्हणून. त्या सगळ्याविषयी लिहिताना त्यांच्या लेखणीतली ऋजुता वाखाणण्यासारखी आहे. आपल्या कुडाचे घर असलेल्या गावापासून परदेशवारीपर्यंतचा त्यांचा प्रवास, हे त्यांनी कमावलेले भागध्येय आहे. आणि ते त्यांनी कमावलेल्या प्रसन्न शैलीत, उत्तम तोल सांभाळत वाचकांच्या समोर ठेवलेले आहे.

आत्मकथनाची मांडणी लहान लहान अशा प्रकरणांतून केलेली आहे. प्रत्येक प्रकरणाला शीर्षक आहे. ते प्रकरण वाचल्यानंतर शीर्षकातले यथार्थपण लक्षात येते. प्रकरणाच्या शेवटी जो सारांश येतो, तो वाचताना तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, यांच्याशी त्यांचा असलेला दाट स्नेह चकित करतो, भारावून टाकतो आणि त्याचवेळी काही दमदार, कसदार वाचले याचा आनंद होतो. प्रत्येक तत्त्व तपासून-पारखून घ्यायचे, ते निर्भीडपणे मांडायचे, आणि आचरणातही तसेच आणायचे, हे वेगळेपण जगण्यात व लेखनात आलेले आहे, त्यामुळे हे लेखन प्रगल्भ मंथनातून निघालेले निर्मळ अमृत आहे, असेच म्हणावेसे वाटते. आत्मकथनाचा सुंदर व आदर्शमय असा आविष्कार, असे या कथनाचे वर्णन करता येईल.

सतीश भावसार यांनी वाळूवर उमटलेल्या पावलांचे ठसे सुरेखपणे मुखष्ठावर योजलेले आहेत. वाळूची स्थित्यंतरे सतत होत असतात, त्या स्थित्यंतरानंतरही त्याच्या पृष्ठभागावर चिरंतन राहील, या विश्वासाचे हे ठसे आहेत.

**मूल्य ४०० रु. सवलतीत २४० रु.**

# ग्रंथपान

**थंड हवेचे ठिकाण**

**सुकन्या आगाशे**




**नात्यांचे बहुपेडी इंद्रधनुष्य**

'अंगभर उसळतात फुलबाज्यांची कारंजी. बारीक बारीक दश त्यांचे. सुखावह. हे माझंच का सगळं! हे गात्रांमध्ये न मावता झरणारे स्रोत! आणि ही नुसता स्पर्श झाला तरी उमलणारी कमळं! झोकात वर चढत जाणाऱ्या चंद्रामुळेच तर– पण बाहेर लाल फुललेल्या गुलमोहोराचा खडा पहारा आहेच त्या चंद्रावर. आणि तो, तो चंद्रही आता घेतोय लांब लांब झोके.'

सुप्रसिद्ध लेखिका सुकन्या आगाशे यांचे 'इस्पितळ आणि पतंग उडवणारा माणूस' आणि 'न लिहिलेलली पाने' हे दोन कथासंग्रह यापूर्वी प्रकाशित झालेले आणि आपण वाचलले आहेत. त्यांचे बालसाहित्य आणि कविता, संशोधनात्मक लेखनही यापूर्वी प्रकाशित झालेले आहे. आता त्यांचा 'थंड हवेचे ठिकाण' हा तिसरा कथासंग्रह आपल्या भेटीला आला आहे. एकूण बारा कथांचा यात समावेश आहे.

'थंड हवेचे ठिकाण' हे काही डोंगरमाथ्यावर किंवा त्याच्या कुशीत विसावलेले नयनरम्य ठिकाण अशी आपली समजूत. परंतु कुठलेही मायेची ऊब देणारे, आपलेपणा जपणारे हक्काचे घरदेखील थंड हवेच्या ठिकाणाइतकेच हवेहवेसे वाटते. कथासंग्रहाचे शीर्षक असलेली ही कथा म्हणजे दोन मैत्रिणींची कथा आहे. त्यातली छाया ही परदेशात वास्तव्याला असलेली. ती आणि तिचा मुलगा श्याम हे दोघे मनू या मैत्रिणीकडे हक्काने राहायला येतात. दोन संस्कृती, नाते, मैत्री यांचा गोफ म्हणजे ही कथा. परंतु पैसे कमावण्यासाठी परदेशात गेलेल्या माणसांसाठी मातृभूमी ही थंड हवेचे ठिकाण ठरते आहे, ही कथेची सूचकता इवल्याशा अवकाशात बरेच काही सांगून जाते.

विश्राम बेडेकरांच्या 'रणांगण' कादंबरीतील निर्वासित झालेली हर्टा जहाजावरून समुद्रात उडी मारून स्वतःला संपवते, हे आपण वाचले आहे. परंतु ही हर्टा आज पंचाहत्तरीच्या वयात जिवंत आहे. तिचा प्रियकर बॉब आहे. तो त्यांनी पत्राने ठरवलेल्या मुंबईच्या रॉयल एम्पायर या हॉटेलात तिची भेट घेतो. जीवनाच्या एका टप्प्यावर पोहोचलेल्या दोघांमधील जीवनाकडे पाहण्याबाबतचा, त्यांच्या कल्पनेत असलेल्या साहचर्याचा ते कशा पद्धतीने स्वीकार करतील, अशी कल्पना समोर ठेवून लेखिकेने 'पुन्हा हर्टा' ही कथा जिवंत आहे. वाचकांना पुन्हा 'रणांगण' कादंबरीचे स्मरण आणि त्यापुढील तिचा 'सिक्केल', असे दोन अनुभव ही कथा देते.

'इतिहासातल्या मुलीस' ही मनूची कथा. वयाच्या चौथ्या वर्षी आईविना पोरकी झालेली. ती पेशव्यांच्या महाली येते आणि तिथपासून थेट झाशीची राणी लक्ष्मीबाई होते. हा प्रवास या कथेत उलगडला आहे तो पत्राच्या माध्यमातून. हा एक वेगळा प्रयोग आहे.

'जागल्या' ही कथा एका जागरूक तरुणाची आहे. आज सर्वच स्तरांवर, विशेषतः शैक्षणिक क्षेत्रात कशी अनागोंदी सुरू आहे, संबधित या विषयाकडे राजकारण म्हणून कसे पाहतात, आणि हे सारे उघड करायचे तर त्यासाठी काय किंमत मोजावी लागते, याचे दाहक वास्तव या कथेने वाचकांच्या समोर ठेवलेले आहे.

या संग्रहातील प्रत्येक कथा ही स्वतंत्र आहे. या कथा केवळ मनोरंजन करत नाहीत तर डोळ्यांत दाहक अंजनही घालतात. पहिली रात्र, ऐलतीरी–पैलतीरी या कथा नवविवहित तरुणींचे मनोविश्व आणि संस्काराचे भान देतात. इतरही कथांचे वेगळेपण आहेच. या कथालेखनात लेखिकेने घेतलेल्या रूपकांचा आधार हा त्यांच्या सृजनशीलतेचा, कथाविश्वाला समृद्ध करणारा कलदार अनुभव आहे. पाण्यातून पैलतीराकडे निघालेल्या काळविटाचा फक्त डोळाच दिसत राहावा, आणि अचानक मगरीने त्याच्यावर झडप घालून पाणी लाललाल करणे, हे उदाहरण गोठवून टाकणारे आहे. तसेच बर्फावरून घसरत जाणारी मुलगी जबडा उघडलेल्या सुसरीच्या भक्ष्यस्थानी नेमकी जावी, हे उदाहरण भंगणाऱ्या स्वप्नांची तीव्रता दाखवते. अशा अनेक रूपकांचा समावेश या कथांमध्ये लेखिकेने केलेला आहे, जो जी.ए. कुलकर्णींच्या कथांचे स्मरण करून देतो, तसा लेखिकेच्या कसदार आणि प्रगल्भ लेखनाने आश्वस्त करतो. कथांची केलेली मांडणी ही चित्रदर्शी आहे, प्रत्यक्ष ती कथा आपल्यासमोर साकारली जात आहे, असे वाचताना वाटत राहते. मानवी संबंधांच्या अनेक पैलूंचे पदर हळुवारपणे उलगडत जातात, व्यक्तिरेखांच्या तोंडी असणारी भाषा ही त्यांची स्वतःच्या वैशिष्ट्यांसह आलेली असल्याने तिच्यातले सहजपण लक्षात यावे इतके खास आहे. मनोविश्लेषणाच्या बाबतीत हेच खासपण लक्षात येते. त्यामुळे या कथा लक्षणीय ठरलेल्या आहेत.

नात्यांचे, भावभावनांचे इंद्रधनुष्य आपल्यासमोर प्रकटलेले दिसून येते.

सतीश भावसार यांनी या संग्रहाचे सुंदर मुखपृष्ठ साकारलेले आहे.

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**



# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**बा मनभावन**

**ललिता छेडा**




**मनाला भावलेल्या बावन्न कला**

''थँक यू सुहास. आजूबाजूला घडत असतं ते पाहणं आणि दिसणं यातला तिसरा कोन दृष्टीचा असतो, जो मी अहंकाराने दूषित केला होता. माझ्या वागण्याचं समर्थन नाही पण खडतर दिवसात आलेल्या वाईट अनुभवांमुळं हा कडवटपणा आला असेल. बहुतेक, परंतु जवळची माणसं आता मला गमवायची नाहीत.'' (पान क्र. १३०)

प्रत्येक माणसाच्या जगण्यात स्वत:चा एक दृष्टिकोन असतो. त्याच्या दृष्टीच्या कोनातून जे योग्य दिसते, मनाला भावते, तशी त्याची जगण्याची रीत होते. हा दृष्टिकोन चूक की बरोबर, याचे भान अन्य कुणी करून देत नाही तोपर्यंत त्याची स्वत:च्या आयुष्याची पाऊलवाट तशीच सुरू राहते. पुन्हा प्रश्न उरतोच. दृष्टिकोनाची दिशा समजावून दिल्यानंतरही तिचा स्वीकार करणे शक्य होते का? पुन्हा नव्याने नवी पाऊलवाट तुडवण्यास मन राजी होते का? सुमंत आणि सुहास यांच्या वागण्यात, आयुष्याकडे पाहण्यात जे अंतर आहे, ते 'दृष्टिकोन' ही कथा उलगडून दाखवते. ''आई, सर्वात प्रथम तुम्ही आमच्या आणि रंजनाच्या संसाराची तुलना करू नका. प्रत्येकाचा स्वभाव, विचार वेगळे असतात आणि संस्कार करू म्हणून होत नाहीत. संस्कार होण्यासाठी आपला स्वभाव, आजुबाजूची परिस्थिती, माणसं हे जबाबदार असतात. एकदा स्वत:चा शोध घेऊन दुसऱ्याला आनंद देता आला, की समृद्ध आयुष्य जगता येतं.''

घरात आलेली सून, ही आई आणि मुलगी यांच्यातला मध्य असतो, तराजूच्या काट्यासारखा, आई सतत लक्ष ठेवून असते ती याच काट्यावर. त्यावरून सुनेच्या चुका, संस्कार, तिचे आईवडील यासारख्या असंख्य जागा नाव ठेवण्यासाठी उपलब्ध असतात. या जागी आपली मुलगी किती गुणी आहे, तिच्यावर आपले संस्कार किती उत्तम आणि बळकट आहेत, ही तुलना ठरलेलीच असते. आणि याचे झुकते माप नेहमी सुनेच्या विरोधी पारड्याला जाते. परंतु कधीतरी आईलाही उमगते, सगळ्या घरी असलेल्या चुली (शेगडी?) मातीच्याच असतात. सून आणि स्वत:ची मुलगी यांच्यात फरक करता येणार नाही, हे सत्य नंदिनीच्या सासूबाईंना उमगते ते 'अष्टभुजा' या कथेत.

बहिणी-बहिणीत तुलना आणि चढाओढ नाही, असे सहसा कुठे आढळत नाही. त्याला सौंदर्य, रंग, शिक्षण, शारीरिक ठेवण, बौद्धिक पातळी अशी अनेक कारणे असतात. त्यातून त्या एकमेकींवर मात करण्याचाही प्रयत्न करण्यात कसूर ठेवीत नाहीत. त्यातून आईचा पाठिंबा कुणा एकीच्या पाठी असेल तर दुसरीचा संसार उद्ध्वस्त व्हायला वेळ लागत नाही; परंतु माणसाला सदसद्विवेकबुद्धी असते आणि तिचा योग्य तो वापर करून कुणीतरी एक दुसऱ्यासाठी स्वत:च्या सुखाची होळी करायला तयार होतो. याला माघार घेणे म्हणायचे का? हा एक वेगळा दृष्टिकोन 'माघार' या कथेत वाचायला मिळतो.

आयुष्यात प्रत्येकाला हवा असतो आपल्या आवडीचा रंग, एनर्जी देणारा, सुखाचा नितळपणा मिरवणारा. भलेही तो भडक असेल परंतु निर्लेप असेल. त्यात कुठला रंग मिसळून त्याचे मूळ स्वरूप बिघडून टाकणारा डल रंग नकोसा असतो. असा डल रंग म्हणजे ग्रे रंग. दोन मैत्रिणी राजश्री आणि रश्मी अशाच स्वत:चा पॅशनचा, एनर्जीचा रंग निवडण्याचा, एकमेकींवर मात करण्याचा डाव खेळतात. हा डाव असतो रोहित या नावासोबत. त्यांच्यातला डाव कोण जिंकला याची उत्कंठा शेवटपर्यंत वाढवणारी ' 'ग्रे'वाली शेड' ही कथा लेखिकेच्या कौतुकात भर घालणारी आहे.

ललिता छेडा यांचा हा पहिला कथासंग्रह आहे. या संग्रहात बावन्न कथा आहेत. म्हणजे हा लघुककथांचा हा एक संग्रह आहे. कथेत सातत्याने बदल होत आहेत. तो बदल आता ब्लॉगलेखनापर्यंत आला आहे. या संग्रहातील कथा या ब्लॉगवरील कथा आहेत. या लेखनात असलेले सातत्य अचंबित करणारे आहे. एक विचार, धागा, सूत्र समोर ठेवून त्यावर कथेची उभारणी करणे सामान्य लेखकाचे काम नाही. त्यासाठी प्रतिभा आणि कल्पकता याची मोठी शिदोरी लेखकाजवळ असावी लागते. ती ललिता छेडा यांच्याकडे पुरेपूर असल्याची ग्वाही हा कथासंग्रह देतो. पहिलाच कथासंग्रह असूनही त्यात कुठे नवखेपण जाणवत नाही. नदीचा प्रवाह संथपणे परंतु दमदारपणे सुरू असतो, तशा कथा दमदार आणि प्रवाही आहेत. आपल्या आसपास घडणाऱ्या घटनांकडे, माणसांच्या स्वभावाकडे पाहण्याचा, निरीक्षण करण्याची आणि त्यातून कथेला आकार देण्याची लेखिकेची क्षमता आणि ऊर्जा वाखाणण्यासारखी आहे. 'रेशीमगाणे', 'मनातलं माझ्या', 'वेगळं राहायचंय', ' 'ग्रे'वाली शेड' यांसारखा अनेक उत्तम कथा. लेखिकेच्या पुढील प्रवासाची ग्वाही देतात.

सतीश भावसार यांनी रेखाटलेले मुखपृष्ठ आणि केलेली मांडणी म्हणजे फुलपाखराच्या कोशावर कोरलेली नक्षीच म्हणावी लागेल. कथा जशा एक सुखद अनुभव देत जातात तसे मुखपृष्ठ, आतील रेखाटणे तरल अनुभव देतात. शीर्षकातही 'भावन'ऐवजी 'बावन' अशी योजना केलेली आहे, ती 'बावन्न कथांचा गुच्छ' यासाठी समर्पक ठरलेला आहे.

**मूल्य ३०० रु.  सवलतीत १८० रु.**

## ग्रंथपान

### वाटेवरले दिवे
**नीला उल्हास चांदोरकर**



**मी आहे, तू पावलं टाकत राहा**

''आपल्या नातेवाईकांचं आपल्या जीवनातलं मोल तांदळाच्या दाण्यावरील टरफलासारखं असतं. तांदळाचा दाणा टरफलासकट आपण खाऊ शकत नाही पण तो जमिनीत रुजवताना टरफलासकटच पेरावा लागतो. अन्यथा तो रुजत नाही, याचा अर्थ असा, की नातेवाईक आपल्याला जीवनातल्या प्रत्येक प्रसंगी उपयोगी पडत नसले तरी आपल्या भल्यासाठी, आपल्या मानसिक स्वास्थ्यासाठी त्यांचं मूल्य मोठंच असतं.'' (पृ. १५२)

आयुष्याच्या वाटेवरचा प्रवास हा अनेकांच्या साथीसोबतीने, सल्ल्याने, मार्गदर्शनाने आणि शिक्षणाने पूर्ण करण्यास मदत होते. त्यांच्याशिवायच प्रवास म्हणजे अज्ञाताच्या निबिड अंधारातून भरकटणे ठरते. हे भरकटणे टाळून योग्य त्या मार्गाने योग्य त्या ईप्सितापर्यंत प्रवास होतो. जीवनातली सार्थकता समजली जाते. ज्यांना ही सार्थकता लाभली त्यांचे जगणे संपन्न आणि सुफल झाल्याचे समाधान देते. अशा सुफलसंपन्न आयुष्याचा पट लेखिका नीला उल्हास चांदोरकर यांनी 'वाटेवरले दिवे' या पुस्तकात उलगडून दाखवला आहे.

आयुष्याची सुरुवात घरातून होते. अर्थातच पहिले दैवत, पहिले गुरू हे घरातल्या देव्हाऱ्यात असतात ते म्हणजे माता आणि पिता. त्यांच्या ऋणाची, संस्काराची, शिक्षणाची बोट धरून चालवण्याची कल्पना त्याच्यासाठी कर्तव्य ठरते. परंतु ज्यांच्यावर हे पैलू पाडले जातात, त्यांच्यासाठी हे देव गुरू असतात. लेखिका अशा आयुष्यातील विभूतींना 'वाटेवरले दिवे' असे संबोधतात ते किती यथार्थ आहे, याचा अनुभव हे पुस्तक वाचताना येतो.

या पुस्तकाची सुरुवात होते ती मिळालेल्या वारशाची, संस्काराची आणि पुण्याईची. याचे सारे श्रेय जाते वडिलांकडे– गणेश नीळकंठ कात्रे यांच्याकडे. कुणाचाही आधार नाही. म्हणावेत असे नातेवाईक नाहीत. आपत्तीजनक दुर्दैव म्हणायचे तर लहानपणीच मातापित्याचं छत्र हरवल्याने आलेले अनाथपण. अशा सर्व बाजूंनी निबिड अंध:कार असताना जीवनाची वाटचाल कशी करता येईल, हा प्रश्न ब्रह्मराक्षसासारखा समोर ठाकलेला. तरीही आपल्या हिमतीवर, कुवतीवर, बुद्धीचा काटेकोर कौशल्यावर त्यांनी आपली जीवननौका कशा यशस्वीपणे पैलतीरापर्यंत पोहोचवली, आलेल्या प्रसंगांना कसे धीरोदात्तपणे सामोरे गेले, याची ही कहाणी लेखिकेने वाचकांसमोर या पुस्तकातून मांडलेली आहे.

एलएलएमपर्यंत शिक्षण, न्यायाधीश म्हणून कारकीर्द, निवृत्तीनंतर पुन्हा वकिली, संस्कृतचा प्रचंड व्यासंग, मेघदूताचा त्यांनी केलेला उत्तम पद्य अनुवाद, ज्याला अर्नोल्ड स्कॉलरने गौरविले गेलेले, बुद्धिप्रामाण्यवादी, सचोटीने वागणे, चोख व्यवहारीपणा, आपल्या कुटुंबाप्रमाणेच मामाच्या कुटुंबाचा प्रतिपाळ करणे, उच्च मूल्यांचा अंगीकार आणि संस्कार असे विविध गुणांनी अलंकृत असलेले वडील– ज्यांना घरात सर्वजण 'काका' म्हणत. त्यांच्याविषयी लेखिकेने फार आत्मीयतेने आणि आदराने लिहिलेले आहे. तसेच आपल्या स्वत:च्या सुफल आयुष्याचे सारे श्रेय त्यांना अर्पण केलेले आहे.

एका स्त्रीचा प्रवास हा मातापिता पती, सासूसासरे, मुले, नातवंडे, भावंडे यांच्या सहवासातून घडत जातो. प्रत्येक टप्प्यावर ही सगळी मंडळी आकाशातील तारे, ग्रह यांच्याप्रमाणे भेटत असतात. लेखिकेच्या आयुष्यात अशी ही सर्व मंडळी आलेली आहे. त्याच्याविषयीदेखील अतिशय हळुवारपणे लिहिलेले आहे. त्याचप्रमाणे त्यांचा वडिलांच्या नोकरीनिमित्ताने झालेल्या बदल्या, तेथील अनुभव, शालेय आणि कॉलेज जीवनातले अनुभव, त्यानंतर संसारात व नोकरीत आलेले अनुभव या सगळ्याविषयी तपशीलवार लेखन केलेले आहे.

सदर पुस्तक दोन भागांत विभागले आहे. एक, वडिलांविषयी आणि दुसरे, संसारात स्वत: रमल्यानंतरचे. शिवाय स्वातंत्र्याच्या चळवळीत सहभागी झालेले मधुकर कात्रे आणि त्यांची बहीण सुमन कात्रे यांच्याविषयीची माहिती परिशिष्टरूपाने सोबत दिलेली आहे. पुस्तकाची मांडणी स्वतंत्र प्रकरणातून केलेली असून प्रत्येकाला शीर्षक दिलेले आहे. वडिलांना जसा संस्कृतचा व्यासंग होता तसा लेखिकेला संस्कृत आणि इंग्रजीचा व्यासंग आहे. या व्यासंगाचा उपयोग या लेखनात झाल्याचा दिसून येतो. मुलीच्या लग्नाच्या वेळी प्रत्येकाची काय अपेक्षा असतात त्याचा श्लोक– कन्या वरपते रूपं, माता वित्तं, पिता श्रुतम् आणि असे अनेक श्लोक त्या सहजपणे लिहून जातात. त्याचप्रमाणे इंग्रजी वाक्येही देतात, विल्यम वर्ड्सवर्थचे काव्यनिर्मितीमागचे प्रख्यात वाक्य. (पृ. २०४)

लेखिकेचा परिचय आहे तो अनुवादिका म्हणून. त्यांची अनुवादाची अनेक पुस्तके प्रकाशित आहेत. सदरचे पुस्तक ही त्यांची स्वतंत्र निर्मिती आहे. प्रामाणिक आणि प्रांजळ असे हे जीवनप्रवासाविषयीचे लेखन आहे. यातला नितळपणा भावणारा आहे. त्याचबरोबर मागील शंभर वर्षांतील सामाजिक, शैक्षणिक, ब्रिटिशपद्धती, संस्थाने व संस्थानिक, जातीय पद्धती यांचे वर्णन या पुस्तकात सखोलपणे आलेले आहे.

सतीश भावसार यांनी सुंदर मुखपृष्ठ साकारलेले आहे.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

## ग्रंथपान

**वंश–अनुवंश**
**हेमा पुरंदरे**




**आपल्या आयुष्याविषयी बोलू काही**

''जनुकं ही डीएनएच्या साखळीतला एक छोटासा तुकडा. वारसांपर्यंत पूर्वसुरींची माहिती जशीच्या तशी पोचवणारा हा महत्त्वाचा दुवा. आईकडून आलेली एक प्रत आणि बाबांकडून एक प्रत, अशा आपल्याकडे प्रत्येक जनुकाच्या एकूण दोन प्रती येतात.''

या वाक्याची प्रचीती अनेकदा पोलिस तपासाच्या निमित्ताने येते. मधल्या काळात एका राजकीय नेत्याबाबत अशीच बातमी प्रसिद्ध झाली होती. त्यांचे पितापुत्राचे नाते सिद्ध करण्यासाठी या डीएनएच्या चाचणीची मागणी करण्यात आली होती. अनेक गुन्हे उकलण्यात या चाचणीचा उपयोग केला जातो. परंतु एवढेच मर्यादित क्षेत्र या डीएनएने व्यापलेले नाही, त्याची व्याप्ती प्रचंड मोठी आहे. याच्या मुळाशी असलेले 'जनुक' हा स्वतंत्र विज्ञानाच्या अभ्यासाचा विषय आहे आणि जन्माला येणाऱ्या प्रत्येकाशी तो जोडलेला आहे. त्याच्याविषयी अनभिज्ञता आणि जागरूकता याच्या अभावी किती विकारांना सामोरे जावे लागते, ह्याची आपणास माहितीच नसते. मुळात जनुक ही विज्ञानाची स्वतंत्र शाखा आहे हेच आपणास माहीत नसते, त्यामुळे त्याच्याविषयीची जागरूकता असणे कठीण. हे कठीण काम सोपे केले आहे, डॉ. हेमा पुरंदरे यांनी.

भारतात पहिली जनुकीय प्रयोगशाळा सुरू करण्याचा मान डॉ. हेमा पुरंदरे यांच्याकडे जातो. गेली चाळीस वर्षे त्या या क्षेत्रात कार्यरत आहेत. अनेक अडीअडचणींवर मात करून त्यांनी या क्षेत्रातले योगदान सिद्ध केले आहे. जनुक हा घटक, त्याचे कार्य, होणारे विकार, त्यावरचे उपाय आणि चाचण्या, त्यांची व्याप्ती, ह्यांची ओळख ही डॉ. हेमा पुरंदरे यांची ओळख. ती ओळख 'वंश–अनुवंश' या पुस्तकातून वाचकांच्या समोर ठेवली आहे. विज्ञानाच्या आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीनंतरही निव्वळ 'माहिती नाही' म्हणून कुणाला त्रास भोगावा लागू नये ही तळमळ. पेशंट्सची मन:स्थिती, त्याच्या कुटुंबीयांचे स्वभावविशेष, त्यांचे जनुकीय समुपदेशन, तसंच वेळेवर योग्य त्या तपासण्या आणि उपाययोजना केल्या तर त्यामुळे होणारे फायदे ह्याबद्दल सर्वांनाच थोडीफार कल्पना यावी, हा हेतू समोर ठेवून या पुस्तकाची निर्मिती झाली आहे.

डॉ. हेमा पुरंदरे यांचे वैशिष्ट्य असे, की आपल्या भारतातील जनतेला आपल्या ज्ञानाचा सदुपयोग व्हावा म्हणून त्या परदेशात शिक्षण पूर्ण करून भारतात आग्रहाने परतल्या. परदेशी आमिषांना त्यांनी निग्रहाने टाळले. उच्च शिक्षण प्राप्त करण्यासाठी घेतलेले कष्ट आणि जिद्द यांच्याबरोबर त्यांनी आपले आपल्या मातृभूमी आणि आपले बांधव यांच्याशी असलेले नाते मनात आणि कृतीत घट्ट केले.

माणसाच्या शरीरात असणाऱ्या गुणसूत्रांची संख्या, त्यांची विभागणी, मातापित्याकडून त्यांचे बाळाकडे होणारे संक्रमण, यांचा तपशील शरीरशास्त्रानुसार इथे दिलेला आहे. परंतु या गुणसूत्रामध्ये मातापित्याच्या स्तरावरच हा दोष वा बिघाड असेल तर त्याचे परिणाम बाळाला कसे सहन करावे लागतात, याचे विश्लेषण थक्क करणारे आहे. १३, १८, २१ या प्रमाणात असलेल्या गुणसूत्रांच्या दोषांमुळे उद्भवणारे विकार, लैंगिक, गुणसूत्राचे दोष यांचे विश्लेषण करताना त्यांनी या गुणसूत्रांना 'नाठाळ', 'द्वाड' अशी विशेषणे दिलेली आहेत.

बाळांमध्ये दिसणारे विकार, व्यंग, बौद्धिक, शारीरिक जडणघडणीत स्पष्ट जाणवणारे बदल, हे सर्व कशामुळे होतात? त्वचा, स्पर्श, शारीरिक कमकुवतपणा, लैंगिक दोष, अनेक विकाराचे मूळ हे जनुक आहे, त्यांची प्रत्येकाची ओळख या पुस्तकातून करून दिलेली आहे.

'वंश–अनुवंश' हे मराठीतील पहिलेच पुस्तक आहे, जे जुनक या घटकाचा सर्वांगीण परिचय करून देते. खरेतर हे आत्मचरित्रात्मक लेखन ठरले असते. परंतु केवळ ठरावीक अशी स्वत:ची माहिती, ओळख देत त्यांनी मुख्य लक्ष केंद्रित केले आहे ते जागरूकतेवर. प्रत्येक प्रकरणाला स्वतंत्र शीर्षक दिलेले असून त्या त्या विषयाची माहिती त्या प्रकरणात दिलेली आहे. ही माहिती वाचकाच्या डोळ्यांत अंजन घालणारी असून 'जागरूक पालकत्व' सिद्ध करण्यासाठी आत्ममुख करणारी आहे. उद्याची पिढी सुदृढ, निकोप असावी या आशेला खतपाणी घालणारी आहे. त्यामुळे प्रत्येकाने वाचावा, नव्हे संग्रही ठेवावा असा हा संदर्भग्रंथ आहे. यात नुसती माहिती नाही तर यापूर्वी ज्यांनी संशोधन केले त्यांचे संदर्भ आहेत. लेखिकेला अनुभवास आलेल्या 'केसेस'चा संदर्भ दिलेला आहे. प्रत्येक केस, त्यांचा अनुभव हा आपल्या ज्ञानाचे कप्पे उघडत जाणारा आहे. शिवाय त्यांनी स्वत:चे छंद, उपक्रम, शेती, बाग, पाळीव प्राणी यांचाही तपशील दिलेला आहे.

उज्ज्वला गोखले यांनी या लेखनाचे शब्दांकन केलेले आहे, ते प्रथमपुरुषी असल्याने त्यासाठी किती व्यवधाने पाळावी लागली, याचा खुलासा त्यांनी त्यांच्या मनोगतात केला आहे. कुठलेही शब्दांकन करताना मूळ लेखकाच्या कलाकृतीला जराही धक्का लागणार नाही याची खबरदारी घ्यावी लागते ती त्यांनी घेतली आहे. अतिशय सोप्या पद्धतीने केलेले हे लेखन, विषय कठीण असूनही सोपा झालेला आहे.

सतीश भावसारांचे मुखपृष्ठ सुंदर!

**हार्ड बाऊंड मूल्य ६०० रु.   सवलतीत ३५० रु.**
**पेपरबॅक मूल्य ३५० रु.   सवलतीत २५० रु.**

# ग्रंथपान

**मन मुक्त ...माझे!**
**नीलिमा गुणे-गोळे**



**मनातल्या उमललेल्या कळा**

आयुष्यात कधी कधी अशी घटना घडते, की ती आपल्या मनावर खोल ठसा उमटवते आणि त्या घटनेची स्मृती आपल्याला पुन:पुन्हा सुखावत राहते. (पृष्ठ क्र. ९१)

नीलिमा गुणे-गोळे यांचा प्रकाशित झालेला हा पहिलाच लेखसंग्रह. पहिला म्हटलं, की साधारणत: 'पहिलटकरीण' या अर्थाने, म्हणजे परिपक्वतेच्या पातळीवर अजून पोचण्यासाठी बराच (लेखन) प्रवास करावा लागणार, असा समज पटकन तयार करण्याची शक्यता अधिक असते. परंतु या समाजाला अपरिपक्व ठरवणारे हे लेखन आहे, याची प्रचीती हा संग्रह वाचल्यानंतर येते. या संग्रहात लेखांची क्रमवारी विषयानुसार नाही. परंतु वाचक म्हणून आपल्याला त्याचे विभाग करता येतात. प्रवास, प्रवासवर्णन, निसर्गप्रेम, चित्रकला आणि आपले आप्त, असे हे विभाग होत आणि हे सगळे वैयक्तिक आयुष्याच्या पातळीवरील जोडलेले, अनुभवलेले, वास्तवाशी निगडित असे लेख आहे. याचा समावेश आत्मचरित्रात करता येऊ शकेल, म्हणजे तरीही हे आत्मचरित्र नाही हे लक्षात घ्यायला हवे.

लेखिकेचा पहिलाच लेख आहे तो विमान-प्रवासाने परदेशी जाण्याविषयीचा, लग्नानंतरचा. म्हणजे संसाराश्रमात प्रवेश आणि नवीन प्रदेश, तेथे स्थिरस्थावर होणे, त्यासाठी करावी लागलेली धावपळ, धडपड, आप्तांपासून दूर गेल्याने आलेले विरक्तीपण आणि आपला दोघांचा संसार यांतला आनंद, वेगळे काही करत असल्याचे समाधान असे बारीक-बारीक तपशील येथे येतात. ते वाचत असताना त्या नवप्रदेशात वाचकही त्यांच्या अनुभवात सहजपणे स्वत:ला कल्पित जातो.

लेखिकेने जे.जे. स्कूलमधून शिक्षण पूर्ण केलेले असून टेक्सटाइल डिझायनर म्हणून वेगवेगळे अनुभवही घेतलेले आहेत. परंतु अमेरिकेत गेल्यानंतर आहे त्याच शिक्षणावर समाधान मानून स्वस्थचित्ताने जगण्याचा आरामशीर मार्ग त्यांनी नाकारलेला आहे. अधिकाधिक शैक्षणिक अर्हता प्राप्त करून स्वत:ला सिद्ध करण्याची जिद्द खरोखर वाखाणण्यासारखी म्हणावी लागेल. जोडीदार डॉ. दिलीप यांचीही जिद्द आणि प्रोत्साहन हा त्यातला पल्सपॉईंट ठरला तरी स्वत:चे स्वत्व सिद्ध करणे महत्त्वाचे ठरते.

अमेरिकेत प्रथम जाणवणारे एकाकीपण, हुरहूर पुढे त्या स्वकर्तृत्वाने, कल्पकतेने आणि लाघवी स्वभावाने पुसून टाकतात. नोकरी, संसार, संस्था, अनेकांना मदत, मुलांचे शिक्षण, संस्कार यातून एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणून लौकिकास पात्र ठरतात.

लेखिका प्रत्येक बाबतीत भारत आणि अमेरिका असा तुलनात्मक भेद दाखवून श्रेष्ठ-कनिष्ठाचा पाढा वाचत नाही. जे जे सुंदर, वेगळेपण जाणवते त्याची नोंद नितळपणे आणि समरसून करतात. अमेरिकेत शिशुशिक्षणाची पद्धती कशी आहे, याचे वर्णन वाचताना वाचकच ठरवतो. अशा निर्णयावर येतो, अशी शिक्षणपद्धती आपल्याकडे नाही, ती कशी स्वीकारता येईल?

लेखिकेकडे असलेली निरीक्षणशक्ती आणि त्यांचे निसर्गावर असलेले निर्व्याज प्रेम याचा प्रत्यय प्रत्येक लेखातून येतो. साधारणपणे प्रवासाला निघालेली मंडळी प्रवासाचे जे वर्णन करतात, त्यात निसर्गापेक्षा मी मी अधिक असतो. परंतु लेखिका वर्णन करतात, ते वाचताना प्रत्यक्ष आपण तो अनुभव जिवंतपणे अनुभवत आहोत, असाच अनुभव येतो. खूप समरस होऊन त्या लिहितात तेव्हा त्यांच्यातला चित्रकार आणि तरल मन आपल्याला सुंदर सहल घडवून आणल्याची अनुभूती देतात.

'भक्तीचा मळा', 'स्वप्नवत माचू-पिचू', 'अरमा - एक महावादळ' हे लेख वाचताना आपण लेखिकेच्या तरलतेचा अनुभव घेत वाचक स्वत:ला हरवून जातो.

त्यांनी स्वत:ला एका शिस्तीतत आखून घेतले आहे. प्रत्येक संधीचे सोने केलेले आहे. त्यात चित्रकलेची जोड मिळाल्याने जगणे सुखद, निरलस, बहुआयामी ठरले आहे.

निसर्गाच्या सोबतच व्यक्तिचित्रणदेखील तितक्याच ताकदीने केलेले आहे. पंढरपूर येथील आजोबा, आई, बाबा, मुले, बहिणी, मैत्रीण जेरी सेरावोलो, पती डॉ. दिलीप यांच्याविषयी असलेले स्नेहाचे नाते आणि त्यांच्यातले मोठेपण त्या सूक्ष्मपणे टिपतात.

चित्रकलेइतकेच त्यांचे कवितेवर प्रेम आहे. प्रत्येक लेखात कवितांच्या ओळी सहजपणे त्या पेरून जातात. त्यांचे वाचन चौफेर आहे. व्यासंग आहे. त्यामुळे आवडलेली इंग्रजी वाक्येही लेखांमधून येतात. परंतु ती ठिगळ न वाटता नक्षीकाम केल्याचा आनंद देतात. समृद्ध व्यासंग आणि समृद्ध अनुभव असेल तर लेखन किती कसदार, सकस आणि नितळ होऊ शकते, याची साक्ष हे पुस्तक देते. इंग्रजी प्रदेशात राहूनही लेखनात कुठेही कोणत्याही शब्दाची घुसमट झालेली दिसून येत नाही. प्रत्येक शब्द मोजून-मापून आणि कलदार नाण्यासारखा खणखणीत आहे. स्वत:च्या लेखनाविषयी त्यांनी व्यक्त केलेले मनोगत आणि लाभलेली कवयित्री नीरजा यांची प्रस्तावना वाचनीय आहे. सतीश भावसारांनी रेखाटलेले मुखपृष्ठही सुंदर आहे.

**मूल्य २०० रु.   सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**ढोर**

**भगवान इंगळे**




**दलदलीतून उमललेले कमळ**

मराठी साहित्यात अनेक आत्मचरित्रांची झालेली नोंद ही त्या त्या काळाच्या गाण्याची नोंद म्हणता येते, मैलाच्या दगडांसारखी. प्रत्येकाचे वैशिष्ट्य वेगळे आहे. प्रत्येकाने आपली नाममुद्रा साहित्याच्या इतिहासात ठळकपणे कोरलेली आहे, अशी नाममुद्रा, जी कधीही नामशेष होऊ शकणार नाही. अक्षरलेणी म्हणून त्यांचा गौरव करण्यात येतो. असेच एक अक्षरलेणे म्हणजे 'ढोर' हे आत्मचरित्र होय. सन १९९९ साली या पुस्तकाची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली. आज त्याची आठवी आवृत्ती प्रकाशित होत आहे. नाणं खणखणीत असेल तर त्याची कदर केली जाते. साहित्यात ढोर या कलदार नाण्याने आपले कलदारपण सिद्ध केले आहे. अनेक मान्यवर वाचकांनी याची नोंद घेत आवर्जून लेखकाला शाबासकीचे सन्मानपत्र बहाल केलेले आहे. त्यांच्या अभिप्रायाची दखल पुस्तकाच्या शेवटी जोडलेली आहे, त्यावरून या पुस्तकाचे उजवेपण अधिक उठावदार झालेले आहे. नामदार सुशीलकुमार शिंदे यांनी दिलेली शाबासकी आणि प्राचार्य रा.रं. बोराडे यांनी केलेली मीमांसा आणि अपेक्षा हे लेखकाच्या यशावर शिरपेच चढवल्यासारखी शोभून दिसतात.

प्रा. भगवान आपा इंगळे हे या आत्मचरित्राचे नायक. ढोर समाजाचे प्रतिनिधी आणि खर्डा या गावाचे रहिवासी. खर्डा हे गाव निजाम-मराठे यांच्या युद्धाचे एक ठिकाण म्हणून प्रसिद्ध, परंतु भामटा हा शब्द याच गावाशी जोडलेला, सुंदर पारदर्शी त्वचेवर नायटा दिसावा तसा. केवळ या भामटा शब्दामुळे किती त्रास सहन करावा लागला, कारण नसताना, याचे वर्णन वाचताना हसावे की रडावे अशी द्वंद्वाची परिस्थिती उद्‌भवते. ढोर समाजात जन्म घेतल्याने काय काय सहन करावे लागले आणि त्याला चरित्रनायक कसा सामोरे गेला याचे वर्णन वाचताना, आपण कल्पनेच्या किती मर्यादेत वावरतो याची लाज वाटू लागते. चामड्याच्या वस्तू वापरताना आपल्यात मुरलेला सहजपणा, हेच चामडे आपल्यापर्यंत पोहोचण्यासाठी ढोर समाजाने किती यातना सहन केलेल्या आहेत यांच्या मुळाशी आपण कधी गेलेलो नसतो, कधी त्याचा विचारही केलेला नसतो. तो विचार, तो सहजपणा या ढोर यातना वाचताना पार गळून पडतो, नव्हे आपली लक्तरे उघडी पडली याची लाज वाटू लागते. ढोर समाजाने ढोरासारखे राबणे समजू शकतो; परंतु त्या नरकयातना आहेत याचा उलगडा ढोर वाचताना होतो. कच्चे कातडे एवढेच आपल्याला ठाऊक असते. परंतु त्याचे पक्के रूप समोर येण्यापूर्वी हालवनी, पाटनी, छिलनी, नांदी, रंगा, उभारनी या प्रक्रियेतून त्याला जावे लागते हेच आपल्याला ठाऊक नसते. ही प्रक्रिया यांत्रिक नाही, मानवी आहे. प्रत्येक टप्प्यावर हा ढोर माणूस स्वतः उसवत राहतो आणि पुन्हा पुन्हा शिवत राहतो. हे काम म्हणजे कष्ट, परिश्रम इतकेच नाही ते नरकयातना भोगायला लावणारे काम आहे, तेही जिवंतपणी, कधी उपाशी तर कधी याच नरकात राहून. लेखक या नरकयातना स्वतः सहन केलेला वज्रपुरुष आहे, पण त्यांचे मन मात्र मेणाहून मऊ आहे. नरकयातनेचे श्रम असोत, शाळेतला उपवास असो, खर्डा गावचा म्हणून पोलीसछळ असो, चकार शब्दाने तक्रारीचा सूर नाही. आपण सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्माला आलो नाही याची पुरेपूर जाणीव असून त्याचा दोष, द्वेष, राग ते कुणावर व्यक्त करत नाहीत. आपली आई गंगाबाय हिच्या शिकवणीनुसार नेहरू-आंबेडकरांसारखे शिकण्यावर लक्ष केंद्रित करतात. सगळे दारिद्र्य, कष्ट, अपमान याचे बाण पाठीशी भात्यात ठेवून जिद्दीने, मन कठोर करत आपला शिक्षणाचा प्रवास पूर्ण करतात. खर्डा, बार्शी, अहमदनगर, संगमनेर, धारावी मुंबई असा एकेक टप्पा पार करत आपल्या ईप्सितापर्यंत पोचतात.

हा प्रवास एकट्या भगवानचा नाही. बाप, आई, महादेव, बहीण पदाबाई यांचा आहे. आठ बहिणी चार भाऊ यांचा आहे. ढोर समाजाचा आहे. खर्डा गावापासून मुंबईपर्यंतचा प्रवासात भेटलेल्या सगळ्या नातेवाईकांचा, सहकाऱ्यांचा, मित्रांचा, शिक्षकांचा आहे. अगदी सौ. आशा इंगळेपर्यंतचा आहे. दलदल, चिखल, दुर्गंधी, ठिगळ लावलेल्या कपड्यापासून ते कडक इस्त्रीपर्यंतचा आहे. हे सर्व वाचत असताना भगवान इंगळे यांसारखी माणसे असेही जीवन जगलेली आहेत, असेही वास्तव आपल्याभोवती आहे, हे पाहून मती दियढ होते. यात माणसांचे स्वभाव, ग्रामीण भागात असलेले रिवाज, अंधश्रद्धा, माणसावरचा विश्वास, जातपंचायत, विधी असा सगळा ऐवज लेखकाने जिवंतपणे उभा केलेला आहे.

एकटाकी लेखन म्हणावे तसे हे लेखन आहे. ज्या भागातून आलो त्या भागात जी भाषा जशी वापरली जाते. तीच भाषा संपूर्ण लेखनासाठी वापरलेली आहे. त्यामुळे तिचे मूळचे अंगभूत सौंदर्य कायम टिकलेले आहे. (प्राचार्य रा. रं. बोराडे यांच्या 'पाचोळा' कादंबरीची यावेळी आठवण होते.) विशेष असा, की हे संपूर्ण लेखन प्रसन्न शैलीतून साकारलेले आहे. मूळचा शाहीर, पोवाडे, विनोद, नकला यांचा सोस अंगी असल्याने सुंदर असा नितळपणाचा प्रवाह झुळझुळत जावा तसा हा लेखनप्रकार आहे. जागोजागी वापरल्या जाणार्या अस्सल रांगड्या शिव्या आणि म्हणींचा मुक्त वापर त्यामुळे मोत्याच्या माळेत माणके-हिरे जोडल्यासारखे सुशोभित झालेले आहेत. एक सुंदर प्रवास वाचल्याचा आनंद दीर्घकाळ स्मरणात होता तो या आवृत्तीने दृढ केला.

**मूल्य २५० रु.   सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

**स्वप्नपंखांना आकाश थिटे**
धैर्य, कल्पनाशक्ती आणि नव्या युगाच्या इस्राएलची जडणघडण
**शिमॉन पेरेस**
**मेधा आलकरी**



**इस्राएल उभारणीचे शिल्पकार**

''एखाद्या राष्ट्राला खतम करायचं असेल तर तुमच्याकडे दोन गोष्टी हव्यात. पहिली अर्थात जबर इच्छा आणि दुसरी म्हणजे आपल्या लष्कराकडे तसं करण्याची श्रेष्ठता असल्याची खात्री!''

दहशतवाद्यांशी वाटाघाटी करणाऱ्या नेत्यांनी हे लक्षात घेतलं पाहिजे, की जेव्हा तुमच्या कानफटीला बंदूक रोवलेली असते तेव्हा तुम्ही वाटाघाटी करणारे राज्यकर्ते नसून ओलीस असता.''

''आम्हाला जी शस्त्रं मिळाली ती बहुतकरून नाझींनी व्यापलेल्या झेक प्रदेशात त्यांनीच सुरू केलेल्या सुविधांमध्ये बनवली गेली होती. हा विधात्याचा एक आश्चर्यकारक संकेत असावा. एकेकाळी आम्हाला मारणारी शस्त्रंच आज आम्हाला तारणार होती. आमचं रक्षण करण्यात उपयोगी होणार होती.''

'इस्राएल' या नावाची जादू जगावर अधिराज्य गाजवते आहे. वाळवंट असलेल्या भूमीला सुजलाम् सुफलाम् करण्याची जादू इस्राएलकडे आहे. ज्ञान–विज्ञान–परमाणूपर्यंतची ऊर्जा, शस्त्रास्त्रे अशा सर्वच क्षेत्रात आघाडीवर असलेले हे चिमुकले राष्ट्र स्वत:च्या ताकदीवर उभे आहे. सगळ्यांच्या आश्चर्याचे केंद्र बनलेले आहे. याचे सारे श्रेय राष्ट्रउभारणीत ज्यांनी आपले आयुष्य समर्पित केले, त्यापैकी एक असलेल्या शिमॉन पेरेस यांचेही आहे. युनोने नोव्हेंबर १९४७ ला पॅलेस्टाईनपासून स्वतंत्र इस्राएलला मान्यता दिली. तिथून हे राष्ट्रउभारणीचे स्वप्न प्रत्येक द्रष्ट्याने पाहिले, त्यात शिमॉन पेरेस हे एक होते, पहिल्या फळातले आघाडीचे नेते.

नाझीच्या संहाराची झळ बसलेले शिमॉन पेरेस यांचे आजोबा हे त्यांचे पहिले गुरू. ज्यांनी अखेरपर्यंत यहुदी राहण्याचे आणि शांततेसाठी काम करण्याचे वचन घेतले. दुसरे आहेत डेविड बेन गुरिऑन, थोर तत्त्वज्ञानी. त्यांनी यहुद्यांना स्वातंत्र्य मिळवून दिले. ते करून देवानिर्मितीकरता नसून मानवतेसमोर उदाहरणादाखल ठेवलेल्या 'लाईट अन्टु नेशन्स' या सर्व जगासाठी मशाल बनण्याच्या ऐतिहासिक मिशनची पूर्ती म्हणून. यांच्या सहवासात आल्यापासून शिमॉनच्या कारकिर्दीला खऱ्या अर्थाने अर्थ प्राप्त झाला. विविध संघटना, संस्थांमधून आपल्या कार्याची सुरुवात करताना स्वत:चे वेगळेपण सिद्ध केले. वेगळा दृष्टिकोन, ध्येय, जिद्द, आत्मविश्वास आणि दूरदृष्टी हे गुण अंगी असलेले शिमॉन इस्राएलच्या निर्मितीसाठी एक मुत्सद्दी राजकारणी, नवनिर्मितीचे स्वप्न साकारणारे हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व ठरलेले आहेत. अनेकदा वादग्रस्त, थांग न लागलेले शिमॉन जे धाडसी निर्णय घेतात, हजरजबाबीपणा दाखवतात, डावपेचांचे आडाखे रचून समोरच्या देशाला आपल्या शब्दाशी आणतात, ते सारे कौशल्य आश्चर्यचकित करणारे आहे. देशाला स्वातंत्र्य जपायचे तर संरक्षणासाठी शस्त्राची गरज आहे. देशाला स्वयंपूर्ण करायचे तर विविध उद्योग येथे सुरू झाले पाहिजे, त्यासाठी कुशल तंत्रज्ञ देशात उपलब्ध पाहिजेत. परमाणुप्रकल्प सुरू करून सर्व राष्ट्रांना पेचात ठेवण्याचे कसब जोपासले जायला हवे, देशात बेरोजगाराचे प्रमाण एक टक्काही असता कामा नये, यासाठी ज्या विविध योजनांना– स्टार्टअप, इस्राएल नॅशनल नॅनोटेक्नॉलॉजी इनिशिएटिव्ह, इस्राएल ब्रेन टेक्नॉलॉजीतर्फे नवनिर्मितीसाठी पुरस्कार– चालना देण्याची कल्पकता अचंबित करणारी आहे. देश आर्थिक संकटात सापडला तेव्हा सर्व खात्यांच्या बजेटमध्ये कात्री लावण्यातही मागेपुढे न पाहणारे शिमॉन दहशतवादी कारवायांच्या वेळीही तितकेच खंबीरपणे उभे राहिलेले आहेत. एक साधा कार्यकर्ता ते पंतप्रधान, अध्यक्ष अशा विविध भूमिकांत वयाची सत्तर वर्षे ते कार्यरत राहिलेले आहेत.

शिमॉन पेरेस यांनी स्वत: लिहिलेला हा सत्तर वर्षांचा दीर्घ प्रवास राजकीय, सामाजिक संघर्षाने भरलेला आहे. प्रत्येक संघर्षात ते यशस्वीपणे पाऊल पुढे टाकत गेलेले आहे. या संपूर्ण प्रवासात त्यांनी जपले ते मानवाच्या शांतीसाठीचे स्वप्न, स्वदेशनिर्मितीचे स्वप्न. देशाला जगात सर्वोच्च ठिकाणी स्थानापन्न करण्याचे स्वप्न. यासाठी त्यांनी कुठेही तडजोड केलेली नाही. त्यामुळेच त्यांना शांतिदूत जसे म्हटले जाते तसे राजकारणातला बहिरी–ससाणाही संबोधले जाते.

हे आत्मचरित्र म्हणावे का, की राजकीय चरित्र म्हणावे? संपूर्ण लेखात कुटुंबाविषयी आलेला उल्लेख फार थोडा आहे. तरी त्यातून त्यांचे कुटुंबवत्सलतेचे दर्शन होते. इस्राएलची उभारणी करताना त्यावेळेचे इतर राष्ट्रांचे असलेले दृष्टिकोन, त्यावेळची राजकीय परिस्थिती, ब्रिटिश सत्तेचा खेळ, राजकारणातले डावपेच या सर्व तपशिलांचा इतिहास येथे आलेला आहे. त्याचबरोबर एका प्रगल्भ विचारवंताप्रमाणे वेळोवेळी व्यक्त झालेले विचार चाणक्याचे स्मरण करून देतात.

इस्राएलचा इतिहास समजून घेण्यासाठी ज्या संदर्भांची यादी आहे त्यात या पुस्तकाचा क्रमांक पहिला ठरावा. तपशीलवार, तारखांसह आलेला इतिहास वाचताना आपण अंतर्मुख होतो.

मेधा आलकरी यांनी केलेला अनुवाद हा तितकाच उत्तम झालेला आहे. त्यात आलेला चपखलपणा आणि सहजपणा यामुळे हा अनुवाद न वाटता मूळ मराठीतील लेखन असल्याचेच जाणवत आहे.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**यश म्हणजे काय? भाग २**

**शिल्पा जितेंद्र खेर**




**यश जेथे शरण येते**

माणसाच्या जगण्यात दोन गोष्टींना सर्वोच्च स्थान प्राप्त झालेले आहे. एक आहे सुख आणि दुसरे आहे यश. सुख ही सामान्य माणसांची अपेक्षा तर यश हे असामान्य माणसांची. सुख अनेक गोष्टींवर अवलंबून असते. त्यात यशाचा वाटा मोठा असतो. त्यामुळे सुखही तात्कालिक कल्पना असून यश ही सर्वकालीन टिकणारी कल्पना होय. माणूस समाधान पावतो तो यशामुळे. विकास, प्रगती, समृद्धी हे सर्व काही यशावर अवलंबून असते. ते प्राप्त होणे म्हणजे यशस्वी होणे, समाधान पावणे, काहीतरी प्राप्त केले, मिळवले या यशाचे धनी होणे. यश ही कल्पना काही एकाकी साकार होणारी, साध्य होणारी गोष्ट नाही. त्यासाठी बुद्धिकौशल्य, मेहनत, अभ्यास, जिद्द, ध्येय, अविरत ध्यास अशा अनेक गोष्टींची आवश्यकता असते. अनेक प्रयासाने या सिद्धीपर्यंत पोहोचता येते. त्यामुळे ज्यांना यश मिळाले त्यांना यशस्वी जीवनाचे शिल्पकार समजले जाते, अशांची संख्या फार मोठी नसते, परंतु त्यांचे यश हे सर्वांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारे असते. अशा काही यशस्वी मान्यवरांच्या शोधात लेखिका शिल्पा खेर आहेत. त्यांच्या यशाचे गमक, त्यांची मानसिकता, त्यांचा एकूण दृष्टिकोन, यशापयशाची मीमांसा या सगळ्यांचा शोध त्या घेत आहेत. या शोधाचा पहिला भाग यापूर्वी प्रकाशित झाला आहे. आता दुसरा भाग प्रकाशित झाला आहे.

या भागात एकूण अकरा मान्यवरांचा समावेश करण्यात आला आहे. त्यातील डॉ. अनिल काकोडकर, विक्रम गोखले, अजित पारसनीस, डॉ. विठ्ठल कामत, मेधा पाटकर, डॉ. वि.ना. श्रीखंडे, प्रभाकर देवधर, हृषीकेश यादव, जस्टिस बी.एन. श्रीकृष्ण, सुमित्रा महाजन आणि दिलीप वेंगसरकर ही सगळी मान्यवर मंडळी वेगवेगळ्या क्षेत्रांतली असून त्यांनी त्या क्षेत्रात आपला लौकिक प्राप्त केलेला आहे, व्यक्तित्वाचा ठसा उमटवलेला आहे. त्यामुळेच त्यांच्या नावापुढे अणुतूनी साकारिले ब्रह्मांड, नटसम्राट, लोकनायक, किमयागार, तपस्विनी, जस्ट ग्रेट अशी बिरुदावली लेखिकेने बहाल केलेली आहे. या सर्वांच्या कार्याचा, कर्तृत्वाचा परीघ स्वतंत्र गाथेएवढा प्रचंड आहे. तो एका मर्यादेत मांडणे अशक्य आहे. परंतु लेखिकेने मोजक्या प्रश्नांसह त्यांच्या एकूण यशस्वी व्यक्तिमत्त्वाचा, कार्याचा, विचारांचा धांडोळा घेतलेला दिसून येतो. त्यासाठी एक प्रश्नावली तयार केली असून तिच्यातून हा प्रवास उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. कुठल्याही यशस्वी माणासासाठी चपखल बसतील असे ते प्रश्न आहेत.

आई-वडील, शिक्षक, गुरू, कर्तव्य त्याग, सत्यमेव जयते, भीती, सन्मान, यशापयशाचा-सामाजिक जाणिवेविषयीचा दृष्टिकोन, भारत देशाची आजची स्थिती, लोकसंख्या, ग्रामीण भाग, अशा विषयांची गुंफण करत मुलाखतीचे स्वरूप ठेवून एकेकाचे व्यक्तिमत्त्व फुलवलेले आहे. यात लालित्य असावे आणि आपण ज्या उद्देशाने हा प्रकल्प राबवत आहोत त्याच्या उद्दिष्टापर्यंत जाता यावे यासाठी कथानकाची सुंदर योजना केलेली आहे. ही एक सुंदर कल्पना म्हणता येईल. मान्यवरांच्या मुलाखतींचे संकलन करून वर्गात त्यांचे वाचन व विवेचन करायचे. असा उपक्रम विद्यार्थ्यांसमोर केला तर तो त्यांच्यासाठी प्रेरणा देणारा कल्पक उपक्रम ठरू शकेल असा लेखिकेला विश्वास आहे, त्यांच्या 'भाग्यश्री फाऊंडेशन'मध्ये असे विषय उपक्रम राबवले जातात. शिल्पा खेर या केवळ लेखिका नाहीत, तर एक संस्थाचालक, विद्यार्थी हा घटक समोर ठेवून त्यांना बहुउद्देशीय साहाय्य करणारी सक्रिय कार्यकर्ती आहेत. 'प्रयोगशील' लेखिका, समाजाचे दायित्व सांभाळणाऱ्या दातृत्वकर्त्या आहेत. त्यामुळे त्यांचे लेखन हे इतरांहून वेगळे ठरते. त्यांचा आतापर्यंतचा एकूण लेखनप्रवास समाजभानाची जाणीव ठेवणारा प्रत्येक प्रवास आहे, संस्कारी प्रवास आहे. ''तुम्ही असं काहीतरी काम करायला हवं, ज्याचा समाजाला उपयोग होईल आणि तुमच्या मनाला त्यानं समाधान वाटेल.'' डॉ. अनिल काकोडकरांचे हे वाक्य लेखिकेने आत्मसात केलेले आहे, असे निश्चित म्हणता येईल.

''खरं यश म्हणजे तुमच्यावर झालेले चांगले संस्कार, जे तुमचा पाया मजबूत करतात. पैसे, प्रसिद्धी हे खरं यश नाही,'' विक्रम गोखले आपला सिद्धांत सांगतात. यशस्वी जीवन हे एकट्याचे नसते, समाजालाही ते मान्य असायला हवे, असे पारसनीस स्पष्ट करतात. ''यश मिळतं पण अंमलबजावणी होत नाही, तेव्हा ते अपयश ठरतं.'' हे मेधा पाटकर अनुभवातून सांगतात. ''जर तुम्ही strength, weakness, opportunity, threat यांचं गणित मांडलं नसेल, तुमचे कात आणि डोळे नीट उघडे नसतील तर १०० टक्के अपयश येणार,'' असं विठ्ठल कामत स्पष्ट करतात.

या सर्व मान्यवरांचे अनुभव उत्तमरीतीने वाचकांसमोर ठेवलेले आहेत, ते प्रेरक समाधान देण्यासाठी नक्कीच उपयुक्त आहेत.

**मूल्य ६०० रु.  सवलतीत ३५० रु.**

## ग्रंथपान

### मालवणी भाषेतील वाक्प्रचार आणि हुमाणी

**विद्या प्रभू**




**बोलीभाषेचे अलंकार**

''कोणत्याही भाषेतील म्हणी आणि वाक्प्रचार हे त्या भाषेचे ऐश्वर्य असते. संस्कृतीचा तो अनमोल ठेवा असतो. आपल्या भावना, कल्पना किंवा तत्त्वविचार हे साध्या-सरळ पद्धतीने न सांगता म्हणी किंवा वाक्प्रचार यांच्या रूपात मांडले तर भाषेला सौंदर्य येते आणि बोलणे प्रभावी होते.''

भाषेच्या समृद्धीसाठी शब्दकोशांची अधिकाधिक भर पडणे आवश्यक समजले जाते. त्याप्रमाणे संस्कृती आणि जनजीवनाची रहाटी यासाठी वाक्प्रचार व म्हणींची आवश्यकता असते. त्यामुळे भाषेचे केवळ वैभव वृद्धिंगत होते असे नाही तर त्या भाषेच्या विविधतेची कल्पना स्पष्ट होत जाते, त्या प्रदेशाचे वैशिष्ट्य त्यातून व्यक्त होत राहते आणि त्याचप्रमाणे अशा वाक्प्रचाराचा व म्हणीचा वापर झाल्याने संबंधित व्यक्तीच्या व्यक्तित्वाचाही अमीट ठसा समोरच्या व्यक्तीवर उमटल्याशिवाय राहत नाही. त्यातून उलगडत जाणारी विविधता ही शेवटी भाषेच्या विविधतेत भर घालणारी ठरते.

विद्या प्रभू यांनी मालववण प्रदेशातील वाक्प्रचार आणि म्हणींचा संग्रह वाचकांच्या समोर ठेवला, नव्हे मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेत मोलाची भर घातली आहे. असा संग्रह करणे म्हणजे निबिड प्रदेशातून आपलीच वाट आपण शोधत ईप्सितापर्यंत पोहोचण्यासारखे आहे. समुद्राच्या तळाशी असलेल्या शिंपल्यातून एकेक मोती वेचून काढणे आणि त्यांचा सुंदर गोफ तयार करणे यासाठी लागणारे परिश्रम, कौशल्य आणि पारख असावी लागते, ती विद्या प्रभू यांच्याकडे आहे. त्यामुळेच हा सुंदर संग्रह साकारला गेला आहे. लोकसाहित्याचा, संस्कृतीचा, चालीरीतींचा एकेक शिंपला शोधून त्यांनी हे मोती गुंफलेले आहेत. यासाठी त्यांचे मनापासून कौतुक करायला हवे. 'अबोली', शब्दसौरभ', 'कोकणातील लोककथा आणि गजाली' यासारख्या प्रकाशित झालेल्या साहित्यातून त्यांची संशोधन वृत्ती, लोकसाहित्याचा, मालवण प्रदेशातील भाषेचा व्यासंग सिद्ध झालेला आहे. त्याच गुणांचा परिचय प्रस्तुत पुस्तकातून होतो.

मालवणी भाषेचा गोडवा आणि त्यातला तिरकसपणा सर्व मराठी वाचक-रसिकांच्या समोर आणला तो गंगाराम गवाणकर यांनी. त्याअगोदर या भाषेविषयीचा अभ्यास विष्णू सदाशिव सोहोनी, रा.ब. वासुदेव, अनंत प्रभू-बावर्डेकर, बा.रा. प्रभू यासारख्या अभ्यासकांनी या भाषेचे वैभव संशोधनाद्वारे अभ्यासकांच्या समोर आणले होते. विद्या प्रभू आज या संशोधकांच्या मांदियाळीत सामील झालेल्या आहेत.

वाक्प्रचार आणि हुमाणी, हुमाणी म्हणजे म्हणी, उखाणे. आतापर्यंत मराठीत आलेल्या कोशांमध्ये वाक्प्रचार व म्हणींचा अर्थ सांगितलेला आहे. परंतु विद्या प्रभू यांनी केवळ अर्थ सांगण्यापुरते आपले लेखन मर्यादित ठेवलेले नाही. वाक्प्रचार वा म्हणी, त्यात आलेल्या शब्दांचा प्रत्येकाचा स्वतंत्र अर्थ, त्याचे लिंग, त्याची पूर्वपीठिका वा संदर्भ आणि त्यास जोडून आलेली आख्यायिका वा उपकथानक ज्याला आपण इतिहासदेखील म्हणू शकतो, असा विस्तृत आढावा प्रत्येकाभोवती गुंफलेला आहे. उदहरणार्थ-

'कोचीचो हुंदीर'. हुंदरी म्हणजे उंदीर, अर्थ - केवळ संपन्न आणि प्रसिद्ध देशात राहिल्याने कोणी मोठा होत नाही. हा वाक्प्रचार जन्माला आला तो केरळमधील कोची बंदरात येणाऱ्या जहाजांमुळे आणि त्यात असलेल्या उंदरांमुळे. जहाजांची येजा होत राहते. परंतु उंदरांचे राज्य जहाजापुरतेच मर्यादित राहते. त्यावरून आलेला हा वाक्प्रचार, मोठ्या शहरात राहून आल्याचा रुबाब दाखवणार्यासाठी वापरण्यात येतो.

असे अनेक वाक्प्रचार हे विविध कारणांनी प्रचारात आहेत असे १०८ वाक्प्रचार यात आहेत. त्याचप्रमाणे म्हणी व उखाणे ९३ आहेत. ज्यांना हुमाणी म्हटले जाते. 'दोघा मत्सून इत्सेव न जाना', 'नथीत्सून तीर मारना', 'पावन्याच्या काठ्येन साप मरना' अशा म्हणी मराठी भाषेत आहेत तशाच परंतु मालवणी थाटात आलेल्या आहेत. परंतु

'झिपरी बाय आणली घरा।<br>
ती म्हणता आधी पूजा करा।।'<br>
'खाट खाट खुबो वाटेर हुबो।<br>
तीन डोळ्यांचा बापूस तुजा।।'

अशा खास त्या ढंगातील म्हणी आहेत.

वाक्प्रचार, म्हणी, उखाणे यातून उलगडणारा सांस्कृतिक, लोकसाहित्याचा, भाषेचा थाट हा विद्या प्रभू यांनी अतिशय परिपूर्णतेने सजवलेला आहे. त्या भाषेचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांसाठी आणि चोखंदळ वाचकांसाठी एक उत्तम संदर्भग्रंथ म्हणून याचे स्थान मोलाचे आहे. प्रा. डॉ. बाळकृष्ण रामचंद्र लळीत यांनी दिलेली अभ्यासपूर्ण प्रस्तावना या संदर्भग्रंथाचे मर्म उलगडून दाखवणारी आहे.

सतीश भावसार यांचे मुखपृष्ठ सुंदर आणि साजेसे आहे.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**आठवडीबाजार आणि समाजजीवन**

**राज कुलकर्णी**




**व्यवहाराच्या रोखपणाखालचा खणखणाट**

''कुलूप सहजगत्या उघडण्याची कला जोपासण्याच्या झोरी समाजाला अजूनही ना त्याच्या नशिबाचे कुलूप सापडले ना अशा कुलपाची चावी त्यांना सापडलेली आहे.''

आठवडाबाजार ही संकल्पना माहीत नसलेला विरळाच, पण त्याच्या अंतरंगात डोकावणाराही विरळाच सापडेल. राज कुलकर्णी यांनी या बाजाराचे अंतरंग वाचकाच्या समोर उलगडून ठेवले आहे. बाजारात सुई-लाचकनपासून विळा-खुरण्यापर्यंत, बांगडीपासून कपडालत्त्यापर्यंत सर्वकाही मांडून ठेवलेले असते. हा बाजार हे एक सांस्कृतिक केंद्र असते. या केंद्रात काळानुसार, गरजेनुसार, सोईनुसार बदल होत गेला आहे. तो फरक कुलकर्णी यांनी म नोगतात स्पष्ट केला आहे. एकूण २८ लेख या संग्रहात असून डॉ. मंदार काळे यांची प्रस्तावना या संग्रहाला लाभलेली आहे. खरेदी-विक्रीच्या या आठवडे बाजारातील रोख व्यवहाराची जिज्ञासा, मानसिकता आणि व्यवहारीपणाचे कुतूहल, एकूण समाजजीवन यांचा सखोल धांडोळा राज कुलकर्णी यांनी घेतलेला आहे. तो प्रत्येक बाजार पाहताना वाचकाला स्मरण देणारा असेल, इतका तो परिपूर्ण आहे.

'दक्षिण काशी तेर' या पुस्तकाचे लेखक राज कुलकर्णी यांचे हे दुसरे पुस्तक. ते उस्मानाबाद येथे वास्तव्याला असून तेथील आठवडे बाजाराविषयीची माहिती या पुस्तकात दिलेली आहे. या बाजारात आपले दुकान थाटून बसलेल्यांपैकी काही वैशिष्ट्य असलेल्या, आपले वेगळेपण कायम जपलेल्या व्यावसायिकांशी संवाद साधून त्यांनी ही माहिती संकलित केली आहे. अशा माहितीमध्ये एकसाचीपणा येण्याची शक्यता असते. परंतु व्यवसाय प्रत्येकाचा वेगळा तसा त्यांचा तपशीलही वेगळा राहील याची जाणीवपूर्वक काळजी त्यांनी घेतलेली आहे. व्यवसायाचे गणित, उगम, व्यावसायिकाचा इतिहास, जात, पोटजात, त्यांच्या चालीरीती, प्रथा, विधी, असा सर्वांगीण तपशील मोजकेपणाने घेतलेला आहे, ज्याला ते समाजजीवन संबोधतात. पाथरवट, भोई, लोहार, झोरी, सोनार, लोणारी, बुरुड, काशी कापडी, या समाजांचे जीवन, त्यांचे व्यावसायिकपण ठळकपणे उलगडून दाखवलेले आहे.

घिसाडी लोहार हे तवा, विळी, झाऱ्या, कुर्हाड, कुदळ, खुरपे, कोयता अशा वस्तू बनवणारा समाज. त्यांच्यात मराठी घिसाडी, टांगेवाले घिसाडी, पत्रेवाले घिसाडी असे पोटप्रकार आहेत. परंतु हाच लोहार समाज मध्ययुगात चितोड परिसरात राजपूत वीरांना तलवारी बनवून देण्याचा व्यवसाय करत असे. हा इतिहास लेखक येथे सांगून जातात. तसेच त्यांचा बाणेदारपणाही सांगतात, 'महाराणाचा पराभव झाला तेव्हा या समाजाने चितोड सोडले, पुन्हा स्वतंत्र होत नाही तोपर्यंत गंभिरा नदी ओलांडून चितोडमध्ये यायचे नाही अशी शपथ त्यांनी त्यावेळी घेतली होती.'

बंजारा समाजाच्या वेशभूषेची वैशिष्ट्ये सांगताना ते त्यांच्या भाषेचाही परिचय करून देतात. झाकण, काटली, गाला, गळणी, टोपली, बर्ची, झोळणा हे त्यांचे काही विधीतील शब्द. लग्न-बाया, नवरदेव-येतुडू, नवरी-नवलोरी यांचीही ते ओळख करून देतात.

बांगडी ही आकारानुसार भरली जाते, तिला गाळा म्हणतात. हा गाळा एक-१६ आण्याच्या हिशोबाने असतो. सगळ्यात लहान १४ आणे, सगळ्यात मोठा २-६ आण्यांचा, म्हणजे १६+१६+६ = ३८ आण्यांचा. फिरोजाबाद हे बांगडीउत्पादनाचे प्रमुख केंद्र.

जिलेबी हा सगळ्यांच्या परिचयाचा गोड पदार्थ. याला सुधा कुंडलिका म्हणतात. तिला ते एक गोड यवनी आहे असे म्हणतात. झुल्बी-झोल्बिया-जिलेबी अशी तिची व्युत्पत्ती देतात. इमरती हा जिलेबीचा प्रकार. तो इमिरात म्हणजे साम्राज्य, तिचा अपभ्रंश इम रती. हिचा उल्लेख मोहम्मद बिन हरून अल बगदादीच्या पुस्तकात आहे, असा संदर्भही देतात. असे अनेक संदर्भ विषयानुसार त्यांनी दिलेले आहेत. काथवट या लाकडी परातीची माहिती देताना 'मनमा चंगा तो कथोटीमे गंगा' हा दोहा देतात. भोई समाजाच्या पोटजाती स्पष्ट करताना शंकर वैद्यांचा उल्लेख येतो. ते शब्द हे 'पालखीचे भोई' असे म्हणत. 'चलो रे डोली उठाओ कहार' ही ओळही चपखलपणे दिलेली आहे. जाते हे प्रत्येक घरी असायचे. जात्याचे आणि ओवीचे नाते देतानाच ओव्याही दिलेल्या आहेत. अडकित्ता, कुलूप, झाडू, चणे-फुटाणे, चुना, पिशव्या, तंबाखू, पाथरवड अशा अनेकांची माहिती या पुस्तकात आहे. नोटाबंदीचा संदर्भही आहे. समाजजीवनाचा जवळून परिचय असलेले कुलकर्णी त्यांच्या सहज लालित्यपूर्ण शैलीने एक मोठी उपेक्षित समूह वाचकांसमोर आत्मीयतेने उलगडून दखवतात.

फोटो आणि चित्रांची मांडणी केल्याने पुस्तकाच्या उठावदारपणात भर पडली आहे. मुखपृष्ठही साजेसे आहे.

**मूल्य १८० रु.  सवलतीत ११० रु.**

## ग्रंथपान

**उभारणी**

**भगवान इंगळे**




### देह चंदनाचा वसा परिसाचा

आत्मचरित्रांचे खंड यापूर्वी प्रकाशित झालेले आहेत. प्र.के. अत्रे यांच्या 'कऱ्हेचे पाणी' या आत्मचरित्राचे पाच खंड प्रकाशित झालेले आपण वाचले आहेत. त्यानंतर आनंद यादव, ह.मो. मराठे यांची आत्मचरित्रे खंडात्मक पद्धतीने प्रकाशित झालेली आहेत. भगवान इंगळे हे या पंक्तीला आलेले आणखी एक साहित्यिक. 'ढोर' या आत्मचरित्राने मराठी साहित्यात त्यांचे स्थान अधोरेखित केले. त्याची आठवी आवृत्ती नुकतीच प्रकाशित झाली आहे. या उत्तम खंडानंतर त्यांचा पुढील दुसरा खंड 'उभारणी' या नावाने प्रकाशित झाला आहे. त्याचीही दखल मराठी साहित्यात घेतली जाईल इतके दर्जेदार लेखन 'उभारणी'च्या निमित्ताने वाचकांसमोर आले आहे.

खंडात्मक लेखनात एक टप्पा पूर्ण झाला की त्याच्या पुढील टप्पा दुसऱ्या खंडात सुरू होतो. 'ढोर' या आत्मचरित्रात चरित्रनायकाचे बालपण, कुमारपण ते प्राध्यापकाच्या पेशात पदार्पणपर्यंतचा जीवनप्रवास, समाजदर्शन, चालीरीती, अंधश्रद्धा, मान–अपमान, गरिबी, कौटुंबिक परिस्थिती, व्यवसाय, नातेवाईक, शिक्षण असा मोठा विलक्षण पट कवेत घेतल्यासारखा उलगडून दाखवलेला आहे. त्याचा पुढचा टप्पा सुरू होतो तो 'उभारणी'त आला आहे. प्राध्यापक म्हणून स्वत:चे करिअर उंचावत म्हणजे वसई–पालघर करत भवन्स, मरीन लाईन्सला चौपाटीवर विसावतो. सौभाग्यवती आशा यांचे आशेच्या आकांक्षा पूर्ण करत संपूर्ण कॉलेज शिक्षण पदव्युत्तरपर्यंत झेपावते, प्राध्यापक म्हणून एसएनडीटीत समर्पित होते. हा उभयतांचा शिक्षणप्रवास आणि अध्यापनप्रवास जिद्दीचा, चिकाटीचा, आशा–अपेक्षांचा, कधी उपेक्षेची झळ सोसलेला, तरी संयमाने ईप्सित साध्य करणारा प्रेरक प्रवास आहे. ग्रामीण भागातून आलेले बुजरेपण बाजूला सारून स्वत:च्या कर्तृत्वाचे नाणे खणखण वाजवून दाखवणारा कलदार प्रवास आहे, जो 'आकांक्षापुढे आकाश ठेंगणे'ची प्रचीती देतो.

साधारणपणे मोठ्या सन्मानाला गवसणी घातल्यानंतर माणसे आपले पूर्वायुष्य विसरतात, आप्त–नात्यागोत्यापासून अलिप्त राहून स्वत:ची कडक इस्त्रीची प्रतिष्ठा जपण्याचा प्रयत्न करतात, आपला नवा मुखवटा सांभाळण्याची कसरत करण्यात आयुष्याची इतिश्री मानतात. परंतु भगवान इंगळे हे या सगळ्याला अपवास आहेत. आतड्याला पीळ पडला तरी नाळ तुटणार नाही या बाण्याने वागतात. सगळ्यांना धरून आपल्या पायरीपर्यंत आणण्याचा प्रयत्न करतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मुक्ता. मुक्तासाठी केलेले प्रयत्न, दाखवलेले आपलेपण हे परोपकाराचे उदाहरण नसून इतरांसाठी आपला चांगला उपयोग झाला पाहिजे, हे समाजभान, कर्तव्य, माणूसपण आणि उदार दृष्टिकोनाचे उदाहरण म्हणता येईल.

कन्या नीलम ही व्यक्तिरेखा म्हणजे स्वतंत्र कादंबरीचा विषय म्हणता येईल. संस्कार, शिक्षण, पाठबळ, जिद्द, धाडस घालून साकारलेले हे व्यक्तिमत्त्व. कॅप्टन नीलम वैमानिक म्हणून समाजासमोर आदर्श उभा करतात. तेव्हा इंगळे दापंत्याच्या कर्तृत्वाला सलाम करावासा वाटतो. पाठोपाठ निखिलही वैमानिक, जावई रॉबिन वैमानिक, म्हणजे एकाच कुटुंबात तीन वैमानिक! असे अनोखे भाग्य लाभलेले इंगळे हे मराठीतील एकमेक साहित्यिक असावेत. हे भाग्य आपोआप आलेले नाही, त्यासाठी त्यांना रक्त आटवावे आणि चपला झिजवाव्या लागलेल्या आहेत.

कॉलेजातील सहकारी प्राध्यापक, विद्यार्थी, गावाकडील नातेवाईक, गावाकडील चालीरीती, लग्नप्रथा, घरखरेदीचा अनुभव, बँकांचे व्यवहार, व्याख्याने, सत्कार, असे अनेक अनुभव 'उभारणी'त आलेले आहेत. कधी आनंद, कधी दु:ख, कधी समाधान, कधी नैराश्य असे अनुभव आहेत. परंतु या सगळ्यात ते ठामपणे उभे राहिले आहेत. आपल्या विचारांवर, निर्णयांवर ठाम राहिले आहेत. सतत इतरांना मदत करण्याच्या, चांगुलपणावर विश्वास ठेवण्याच्या भूमिकेशी ठाम राहिले आहेत. हा ठामपणा केवळ आपल्या कुटुंबाच्या उभारणीसाठी नाहीतर इतरांच्याही आयुष्याला आकार देण्यासाठीचा आहे. कृतज्ञताभावनेचा आहे. मुलगा निखिल अमेरिकेत स्थिर होऊ पाहतो तेव्हा ते त्याला मायभूमीची, इथल्या ऋणाची, आठवण देत मायदेशी माघारी बोलवतात, हे मनाचे ठाम मोठेपण लेखनात जागोजागी आढळते.

संघर्षाच्या ज्वालेने तावूनसुलाखून निघालेले हे अस्सल लोह परीस होऊन इतरांच्या जीवनाचे सोने करण्यासाठी स्वत:चा कस पणाला लावते, त्याचा प्रत्यय म्हणजे 'उभारणी'. दर्जेदार प्रवाही, नितळ, संवादी लेखन, हा गुण लेखकाच्या प्रामाणिक प्रतिभेचा आविष्कार आहे.

मुखपृष्ठाची रचना आत्मकथनाला उभारणी देणारे आहे.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

## रति–विलास

**मंजिरी पाटील**




**रतिरसाचे ओथंबलेले घट, अनवट वाटेवरचे**

पहाटे वसंतातल्या स्वैरवेळी
टिपावीस माझ्या तनूची नव्हाळी
भरातील लाटा फुटावी त्सुनामी...

आयुष्यात व्यापून टाकणाऱ्या, सुख–समाधानाच्या उत्कट अनुभवाच्या, हळुवार तरल भावनांच्या विषयावर आतापर्यंत झालेले लेखन हे रसिक वाचकांच्या समोर आलेले आहे ते लावणी या साहित्यप्रकारातून. काही मान्यवर कवींनी या विषयाला त्यांच्या सामर्थ्यवान लेखणीतून अलगद फुलवले आहे. परंतु थेट 'रति–विलास' अशा प्रकारची त्यांची जातकुळी नव्हती. त्यातून या एकाच विषयाला धरून काव्याच्या प्रांतात लावणी वगळता लेखन झालेले नाही. हा पहिलाच काव्यसंग्रह असावा, जो केवळ 'रति–विलास'साठी ओळखला जाईल.

असा विषय हाताळणे म्हणजे मोठे धोक्याचे वळण पार करण्यासारखे आहे. तोल सावरला तर ईप्सिताकडे नाहीतर टीकेच्या खोल दरीत. हा विषय तरलतेने, हळुवार अलवारतेने फुलवताना कवीच्या प्रतिभेचा कस लागू शकतो. **अन्यथा 'अश्लील' या एकाच बाणाने त्याची शिकार होते. मंजिरी पाटील यांनी हा 'कसा'ची कसदार परीक्षा पाहणारा संग्रह** वाचकांच्या हाती सोपवला आहे तो विश्वासाने, धैर्याने आणि संयमानेसुद्धा. या संग्रहात कविता, गीते आणि लावण्या असा त्रिवेणी गोफ गुंफलेला आहे. त्यांचे स्वतंत्र विभाग केलेले नाहीत, त्या एकत्रित आहेत. त्यातल्या काहींचा बाज हा गवसला जवळ करणारा आहे. शृंगार हाच विषय वेगवेगळ्या अंगांनी टिपताना त्याच्या छटांची मांडणी मुक्तपणे त्यातून केलेली आहे, याला टप्पे आहेत. अभिसारिका, प्रणायिनी, प्रेयसी अशा अनेक रूपांत ती स्वत:ला पाहते, रेखते, व्यक्त होत जाते, ती स्वत:चे वर्णन करताना सहजपणे व्यक्त होते,

भर ज्वानीच्या या माझ्या सोळा कळा
बहरला लावण्याचा मळा

स्त्री देहाची कमनीयता, लवलवता नवथर बांधा, रेखीवता, त्यातील विलोभनीयता ही तिच्याच शब्दातून येते. तेव्हा तिच्या गंधाने जणू वारा खुळा होतो. ती आतूर असते तेव्हा सख्याच्या भेटीसाठी उधाणलेल्या लाटेसारखी धावत निघते. त्याची एकांती भेट घेण्यासाठी जणू मुरलीचे स्वर तिला साद घालत असतात आणि भेट होते तेव्हा त्याची–तिची मिठी अलवारपणे बिलगत जाते. त्याच्याशी होणारे एकत्व, हिंदकळणे, परमोच्च बिंदूवर झेपावणे, म्हणजे लखलखणाऱ्या... देहामध्ये मोर नाचले रसरसलेलेच.

शृंगाराच्या विषयावर केलेली वर्णने कधी थेट तर कधी काव्यात्मक. पण ती बीभत्स वा अश्लील नसून अतिशय तरल भावनेचा आवेग आहे. चित्रकार ज्या पद्धतीने चित्रातल्या जागा हळुवारपणे खुलवत त्याला पूर्ण आकार देतो तशी दृश्यचित्रमयता या शैलीत आहे. रूपक–प्रतिमांचा वापर हा तर या संग्रहाचा ठेवा म्हणता येईल.

हळव्या हुरहुर डोळ्यांनी पितंय ऊन
उभंच्या उभं... जास्वंदीला... ओथंबून

यासारख्या ओळींनी ओथंबलेली कविता कवयित्रीच्या सजग, सहज लेखणीला मिळालेले वरदान म्हणावी इतकी ती उत्कट आणि चपखल आहे. शृंगाराची वर्णने करताना त्यात जीवनाकडे पाहण्याची सौंदर्यदृष्टी कशी तरल असावी याचा प्रत्यय देते. यातले शब्द हे लेखणीच्या रंगांनी माखलेले आहेत आणि लयीच्या नादात नादावलेले त्यामुळे थेट हृदयापर्यंत जाऊन मिळतात.

आतापर्यंत प्रियकराच्या नजरेतून आपण प्रेम–प्रणयाच्या भावना सहवेदनेने, सहभावनेने अनुभवत आलो. परंतु 'रति–विलास'च्या रूपाने प्रेयसी, रती, मदनमंजिरी, रसवंती, लुब्धाच्या उत्कट भावना आपल्यासमोर आल्या आहेत. कवितेची उत्तम जाण, व्यक्त होण्याची सहजसुंदर शैली, ताल–लयीचे भान ठेवून रचना बायकांच्या मनात स्वत:चे कायमचे स्थान निर्माण करील असा विश्वास वाटतो. एक चांगला कवितासंग्रह ही कवयित्रीची खरी ओळख असते ती मंजिरी पाटील यांनी निर्माण केली आहे. 'रिमझिमता एकांत', 'मोहाची फुले' या त्यांच्या काव्यसंग्रहांतून निर्माण झालेली अपेक्षा 'रति–विलास'ने पूर्ण केली आहे.

सतीश भावसार यांचे मुखपृष्ठही देखणे आहे.

**मूल्य १०० रु.   सवलतीत ६० रु.**




## ग्रंथपान

**आनंदयात्री**
**पोलीस अधिकाऱ्याची डायरी**
**जयंत नाईकनवरे, आय.पी.एस.**




**आनंदाचे डोही आनंदतरंग**

जीवनात पैसा, प्रतिष्ठा, यश यांना प्राधान्य आहेच; परंतु आपल्या इच्छेप्रमाणे आशा-आकांक्षांची पूर्ती करण्यातला तो एक टप्पा असतो इतकेच. जगणे या पलीकडचे असते, ज्यात 'वांछिले ते ते मेळविले'चा समावेश असतो. असे मनाजोगे आयुष्य वाटपाला आलेली माणसे जी स्वबळाने त्यांच्या पूर्ततेचा शिखरावर पोहोचतात, ती केवळ त्यांच्यापुरती मर्यादित राहत नाहीत. ती इतरांसाठी पथदर्शक मापदंड ठरलेली असतात. अशा कर्तृत्ववान व्यक्तींचे संपन्न अनुभवविश्व लिखित स्वरूपात समाजापुढे येणे ही त्या त्या काळातील पिढीच्या, भवितव्यातील आवश्यक बाब असते. त्या पिढीच्या आयुष्याचा पाया भक्कम करण्याची जबाबदारी पार पाडण्याचे कर्तव्य यांच्या समृद्धपणातून साकारले जाऊ शकते. असे समृद्ध अनुभवविश्व वाचकांसमोर उलगडून दाखवणारे पुस्तक म्हणजे 'आनंदयात्री पोलीस अधिकाऱ्याची डायरी' हे होय.

पोलीसखात्यात असलेले जयंतराव नाईकनवरे यांचे हे अनुभवविश्व म्हणजे 'आनंदयात्री पोलीस अधिकाऱ्याची डायरी' हे पुस्तक. आत्मचरित्र-आत्मकथन असे याचे स्वरूप दिसत असले तरी ते पारंपरिक पद्धतीने लिहिलेले नाही. त्याला 'डायरी'चे तंत्र वापरलेले आहे. 'डायरी' तंत्रात लेखकाला आपला कोश मर्यादित ठेवता येतो. आलेले अनुभव, त्या अनुषंगाने स्वत:ची मते, त्या अनुभवांकडे पाहण्याचा दृष्टिकोन अशा नेमकेपणाला या लेखनात अधिक महत्त्व दिलेले असते. तेच या पुस्तकात अनुभवास येते. नाईकनवरे हे पोलीसखात्यात सर्व सन्मानप्राप्त पदांवर यशस्वी सेवा बजावलेले कर्तव्यदक्ष अधिकारी ठरलेले आहेत. या प्रतिष्ठित पदापर्यंतचा प्रवास कसा झाला, आलेले अनुभव कसे होते त्यांची नोंद त्यांनी त्यांच्या स्वत;च्या विशिष्ट हेतूने केलेली होती. त्या अनुभवांचे पुस्तक कसे झाले, याबाबत त्यांच्या मनोगतात तपशील दिलेला आहे. हा तपशील त्यांच्या विचारांचा, स्वत:कडे पाहण्याचा नितळपणा दाखवतात.

आयुष्यात करिअरला फार महत्त्व असते. तसे नाईकनवरे यांचे करिअर सुरू झाले ते प्लास्टिक इंजिनीयरिंगने. पुढे विक्रीकर अधिकारी म्हणून. त्यानंतर डीवायएसपी या थेट नेमणुकीने. पुढे ही घोडदौड पोलीस उपायुक्त, आयपीएस, केंद्रीय कॅडरपर्यंत शाही थाटात झालेली आहे. अंगावर कडक स्टार्च केलेला युनिफॉर्म, चकचकीत स्टार्स आणि अशोकचक्र यांच्या प्रतिष्ठेचा सन्मान कायम उंचावत राहील अशी अभिमानास्पद कामगिरी पार पाडत असतानाही त्यांच्यातला कर्तव्यदक्ष करडा अधिकारी वेगळा आणि आयुष्याचा आनंदमय रस प्राशन करणारा सौंदर्यवादी रसिक माणूस वेगळा असल्याचे दिसून येते. दोघांची कुठेही गल्लत झालेली नाही. 'द ॲटलास श्रग्ड द फाऊंटन हेड, द सिक्रेट द जुडास, द सायन्स ऑफ गेटींग रीच न्यू शॉट' अशा पुस्तकांची मोठी यादी त्यांच्या चतुरस्त्र वाचनाची साक्ष देते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांती मोहिमेचा भाग म्हणून बोस्निया, स्वीडन या देशांत प्रतिनियुक्तीवर जातात तेव्हा तेथील सामाजिक, आर्थिक लोकजीवनाचा आणि इतिहासाचाही मागोवा घेतात. तेथील निसर्ग, पर्यटनाचा आस्वाद घेतात. कॅनडा, अमेरिका, बँकाक, फ्रान्स-पॅरीस येथील पर्यटनाची वर्णने ही त्यांच्यातल्या जाणकार रसिकत्वाचा परिचय देतात.

साधारणत: वर्दीतला माणूस स्वत:च्या वैगुण्यांकडे अभावानेच पाहतो, सार्वजनिकपणे त्यांचा अभावानेही उच्चार करत नाही. परंतु नाईकनवरे याला अपवाद म्हणावे लागतील. आपल्याला जाणवणाऱ्या दहा वैगुण्याची ते स्पष्टपणे कबुली देतात. हा मनाचा निर्मळपणा त्यांच्या पदकांइतकाच उठावदार दिसून येतो. स्पर्धापरीक्षा ही आजच्या तरुणांपुढे करिअरची द्वारे उघडणारी संधीकिल्ली. या परीक्षेसाठी मार्गदर्शन करणारी दशसूत्री आणि अर्थसूत्री सांगितली आहे. कौटुंबिक जीवन, पत्नी रीना, मुले यश आणि जाई यांच्या शैक्षणिक यशाची ओळख करून देताना आपण त्यांच्यासाठी पुरेसा वेळ देऊ शकलो नाही ही खंत व्यक्त करतात आणि त्याचवेळी पत्नी रीना यांनी स्वत:चे करिअर सोडून कौटुंबिक जबाबदाऱ्या उत्तमपणे पार पाडल्या यासाठी मन मोठे करून कौतुक करतात.

हे लेखन डायरीवजा आहे परंतु लेखनात सातत्य आहे. नेमकेपणाने सर्व तपशील दिलेले आहेत. पोलीससेवा, प्रत्येक टप्प्यावर असलेले वेगवेगळे विभाग, तपासाचे प्रकार यांची माहिती वाचकांसाठी उपयुक्त ठरावी. लेखनात प्रसन्नपणा आहे. एफआयआर किंवा पोलीस डायरीसारखे रूक्षपणाचे हे लेखन नाही. 'मेरे पास दया नायक है'सारखी वाक्ये सहजपणे आणि चपखलपणे आलेली आहेत. प्रसन्न अनुभवांची रसिकतेने केलेली मांडणी, असे हे पुस्तक आहे, जे शीर्षकाचे सार्थपण सिद्ध करते. आतील प्रकरणांची शीर्षके, त्यांना अनुसरून रेखाटनांची मांडणी झकास आणि मुखपृष्ठही आशयाशी नाते जोडणारे आहे.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

ग्रंथपान

चांगदेव काळे

संपर्क : ९८६९२०७४०३

## जगण्यातल्या असोशीने काठोकाठ भरलेला संग्रह

**तसबीर**

**सदानंद डबीर**



*मी ययाति ह्या युगाचा, दे मला अतृप्तता*
*न्हायल्या केसातला तो ओलसर अंधार दे!*

सदानंद डबीर ओळखले जातात ते गझलकार म्हणूनच. त्यांची आतापर्यंत प्रकाशित झालेली काव्यसंपदा पाहता त्यात गझलची संख्या मोठी आहे असेच दिसून येते. या गझलसंग्रहाच्या शेवटी त्यांचा परिचय जोडलेला आहे, तो जिज्ञासूंनी अवश्य पाहावा असा आहे. कविता, गीत, गझल अशा काव्याच्या विविध मैफिलींत त्यांचा मुक्त संचार आहे, तोही त्यांच्या स्वतःची नाममुद्रा असलेला.

आपण एखाद्या साहित्याच्या प्रांतात मुशाफिरी करू पाहतो वा लागतो तेव्हा त्याच्या वाटांचा अभ्यास प्रथम आपण केलेला असेल तर पुढचा प्रवास विनासायास आणि विश्वासाने पार पडतो. गझल हा साहित्यप्रकार सहज, सोपा आणि हमखास हुकूमत मिळवणारा आहे, असे सांगण्याचे धाडस सहसा कुणीच करू शकत नाही. त्यासाठी अभ्यासाची, मेहनतीची आणि हमखास कलाकुसरीची आवश्यकता असते. असे हुकूमत असणारे जे मोजकेच गझलकार आहेत त्यात सदानंद डबीर हे एक नाव आले. हे कुणी तिर्हाईताने सांगण्याऐवजी त्यांनी स्वतः या गझलसंग्रहाला लिहिलेली प्रस्तावना वाचली. यात बडेजाव नाही, आत्मस्तुती तर नाहीच. आहे ती गझलविषयीची प्रगल्भ जाण. तिच्याविषयीचा केलेला अभ्यास, आणि त्यानंतर प्राप्त केलेली हुकूमत! बोल, बनाव, बंदिस्त हे तीन शब्द या प्रस्तावनेत सापडतात तेव्हा काव्यप्रांतात हे गड, दुर्ग, किल्ले यातला फरक लक्षात येतो. त्यामुळे ही प्रस्तावना म्हणजे होतकरू गझलकारांसाठी एक लहानसा पाठ्यपुस्तकातला 'धडा' आहे असे ठामपणे म्हणता येते.

गझलची परंपरा सुरेश भटांपासून मराठीत समृद्धपणे सुरू झाली. साधारणपणे गझल म्हटली, की प्रेमभंग, नैराश्य, विरह, मृत्यू, स्वप्न या भावनांची आळवणी कमी-अधिक प्रमाणात दिसून येते. परंतु अलीकडच्या काळात या भावनांच्या पलीकडे जाऊन गझल नवनवीन मनोवस्थांची वर्णने करू लागली. त्यामुळे सुरेश भट हे जसे स्वतःचे एक स्थान निर्माण करणारे झाले तसे सदानंद डबीर हेही या स्थानी पोहोचलेले आहेत, असे ठामपणे म्हणता येते. प्रेम, शृंगार, स्वप्न हे त्यांच्या गझलमध्ये आहेच, त्याचवेळी जगण्याकडे असोशीने पाहण्याची वृत्तीही दिसून येते. जगण्यातल्या प्रत्येक टप्प्याचा आनंद आणि भावावस्था ते आपल्या गझलेतून व्यक्त करतात. ज्याला आपण मूड असा शब्दप्रयोग वापरतो, तसा जगण्यातल्या प्रत्येक मूडाचा शेर त्यांच्या गझलमध्ये समाविष्ट झाला आहे. त्याला चिंतनाची, विचारांची प्रगल्भ बैठक आहे. प्रत्येक शेर स्वतंत्र आहे. तसा त्याचा लहेजा स्वतंत्र आहे.

*किती कळ्या ह्या आसुसलेल्या फुलण्यासाठी*
*किती फुलांशी बोलायाचे... अजून बाकी।*

अजून बाकी (९८), या गझलेत व्यक्त झाल्याप्रमाणे जी असोशी ते दाखवतात, त्याचवेळी हेही सांगतात, 'पाप पुण्याची कशाला बाळगू पत्रास मी?' प्रार्थनाही करतात,

*माझे जगणेच ओवी, तुझा आनंद अभंग*
*कधीतरी तुझा-माझा देवा एक व्हावा रंग*

काव्याची उत्तम जाण असलेले डबीर नवकाव्याखाली चाललेल्या, हरवलेल्या वृत्तीवर प्रखरपणे टीका करतात. शब्द भाषा, लय, या साध्या गोष्टीही हे कवी सांभाळत नाहीत, त्यामुळे कवितेची हानी होत आहे अशी खंत व्यक्त करतात. यासाठी 'हजल - एक गुस्ताखी माफ' (६६) जरूर वाचावी.

सदानंद डबीर यांनी गझलसोबतच 'मुक्तक'सुद्धा लिहिलेले आहेत. दोन ओळींचा शेर असतो आणि त्याचे अस्तित्व स्वतंत्र असते. परंतु अनेकदा असेही होते की जे सांगायचे ते दोन ओळींत सांगून होत नाही, अशावेळी चार ओळी होतात, अशा चार ओळींचा शेर म्हणजे मुक्तक. यालाच दुसरे नाव आहे 'कत्आ' हा चार ओळींचा शेर एक गझलच्या समान समजला जातो. असे काही मुक्तक या या संग्रहात आहेत, त्यापैकी पान ३० वरचा मुक्तक अंतर्मुख होण्यास भाग पडतो आणि त्यावेळी मुक्तपणे दाद दिली जाते; क्या बात है!

लय, नाद, ताल यांचीही उत्तम जाण त्यांच्या काव्यातून व्यक्त होत जाते. त्यामुळे वाचत असताना लय साधतेच, शिवाय तिचा आस्वादही मन प्रफुल्लित करत जातो. अरबी, फारसी, उर्दू शब्दांचा वापर गझलमधून दिसून येतो. हा वापर रसभंग करत नसून स्वतःची चपखल जागा दाखवतो, गझलची खुमारी वाढवतो.

जगण्यावर भरभरून प्रेम करणारा, जगण्यातली असोशी दाखवणारा, आनंद देणारा, स्वप्नाळू वृत्तीतून वास्तवाचे भान देणारा एक उत्तम गझलसंग्रह म्हणजे 'तसबीर!'

या संग्रहाचे मुखपृष्ठ साकारले आहे संगीतकार मिलिंद जोशी यांनी. मिलिंद जोशी यांनी डबीरांच्या अनेक गीते, पदांना लयबद्ध नादमधुर चाली लावलेल्या आहेत. त्यांच्यातला चित्रकाराचा सुंदर आविष्कार म्हणजे हे मुखपृष्ठ! तसबीर म्हटली की त्याला फ्रेम हवीच. ती सुवर्णवर्ख लावलेली, जाडजूड, सुंदर नक्षीकाम केलेली असेल तर फोटो उठावदार होतो. परंतु आत दाखवली आहे ती पेटलेली पणती मन चर्र्र करणारी. पण नाही, काळोख दूर करणारी, मंद प्रकाश तेवणारी ज्योत म्हणजे प्रकाशाचे प्रतीक. हीच ज्योत 'शमा' नावाने ओळखली जाते. आणि ही शमा गझलेचा आत्माही असते. जी प्रेमाचे अखंड दीप तेवत राहोत आणि जगण्याचा नितांत सुंदर आनंद तेजोमय राहो हा संदेश देते.

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

## ग्रंथपान

**जगावेगळी माणसं!**

**रमेश वाघमारे**




### आपल्या माणसांतले भावलेले वेगळेपण

''दाजीकाकांचं एक वैशिष्ट्य म्हणजे ते अठरा महिने तेरा काळ एक सफेद कापडाची कानटोपी घालत. आधीच दाजीकाकांना कमी ऐकू येत असे. त्यात ही बर्लिनची भिंत उभारल्यावर सारं कसं शांत शांत होई. कानानं थोडे बहिरे असूनसुद्धा त्यांना गप्पा मारण्याचा शौक होता. अर्थात ते दुसर्याला बोलण्याची संधी न देता स्वत:च सारखे बोलत राहत. उद्देश हा की आपल्या कानाचा अँटेना तीक्ष्ण नाही हे दुसर्याला न समजावे.''

'जगावेगळी माणसं' हा रमेश वाघमारे यांचा लेखसंग्रह. खरे तर याला व्यक्तिचित्रसंग्रह म्हणायला हवे. 'बनगरवाडी', 'माणदेशी माणसं', 'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकांचे स्मरण करणारा संग्रह आणि त्याच पुस्तकांच्या पंक्तीत आपले पान राखून ठेवायला सांगणारा संग्रह. हा संग्रह लक्ष वेधून घेतो तो त्याच्या शीर्षकातील वेगळेपणामुळे. ही जगावेगळी माणसं आहेत हे खरेच, परंतु त्यांच्या स्थानाचा ठावठिकाणही तेथेच दिलेला आहे– काळुपुऱ्यातील–गौरपुऱ्यातील व प्रतिभापुऱ्यातील. यावरून लक्षात यावे की जगावेगळी माणसं तीन वेगवेगळ्या प्रांतांतील आहेत.

पहिला पुरा– मोहल्ला, गल्ली म्हणजे बडोदा. आताचा वडोदरा. हा लेखकाचा माहेरचा वारसा लाभलेला पुरा. (माहेर या अर्थाने की लेखक आता कॅनडास्थित आहेत.) त्यामुळे बालपणचा–सवंगड्याचा तो काळ ज्यांनी आपलेपणाने जपला, ज्यांनी मनात कायमचे स्थान पक्के करून ठेवलेले आहे आणि तरीही त्यांनी आपापले वेगवेगळेपण अधोरेखित केलेले आहे, अशा माणसांविषयीचा हळुवारपणा या लेखांमधून व्यक्त झाला आहे. या व्यक्ती लेखकाच्या सहवासाला सुगंधित करणाऱ्या असल्याने आणि घडलेले प्रसंग खरे असल्याने त्यांच्या असण्याविषयीची शंका घेण्याचे कारण नाही. हा काळुपुरा आणि तेथे राहिलेल्या विविध स्वभावधर्मांच्या व्यक्ती म्हणजे नारायण ऊर्फ नरोबा, ह.भ.प. लवलेकरबुवा, धर्मरक्षक काकासाहेब पंढरपूरकर, दाजीकाका अशा एकाहून एक सरस आणि आपल्या गुणवैशिष्ट्यांनी ठासून भरलेल्या व्यक्तिरेखा आहेत. 'अ' म्हणजे अंतरपाट की अंत्यविधी याचे सोयरसुतक नसलेला नारोबा दोन्ही ठिकाणी मदतीला हजर. धार्मिक विधीसाठी कर्मठ व सोवळे असलेले काकासाहेब चोरून सगळी हौसमौज पूर्ण करत. 'रोज एक सफरचंद खाऊन प्रकृती तंदुरुस्त ठेवा' या म्हणीप्रमाणे 'रोज एक भांडण उकरून काढा आणि प्रकृती तंदुरुस्त ठेवा' या म्हणीची सार्थकता सिद्ध करणारी नर्मदामावशी, चिदानंद ऊर्फ चिंध्या कुंटे, यासारखी आणखी माणसं या काळुपुऱ्यात आहेत. हा काळुपुरा केवळ माणसांच्या विविधतेने नटलेला नाही. तेथील सामाजिक जीवन, लग्नविधी, नाटक–संगीत, शिक्षण आदि वैविध्याने नटलेला आहे. गेली सत्तावन्न वर्षे ही विविधता लेखकाच्या सोबत आहे.

गौरपुरा म्हणजे अर्थात अमेरिका, कॅनडा या गोऱ्या लोकांचा देश. शिक्षण आणि व्यवसायामुळे येथे स्थायिक झाल्यानंतर अनेकांशी अनेक प्रकारे संबंध, नाते निर्माण झाले. येथील वास्तव्याचा कालावधी नक्कीच मोठा आहे. तसा जगावेगळी माणसांचा जथाही मोठाच असणार. त्यापैकी मोजक्याच आठ व्यक्ती येथे निवडलेल्या आहेत. हसरा, गमतीशीर, नकला करणारा; परंतु कुणाच्याही मदतीला निरपेक्षपणे धावणारा मिलान नास्को, स्वच्छंदी आयुष्य जगणारा नील मॅकमार्टिन, वजन साधारण २७५ पौंड असणारी घरमालकीण मिसेस हिल्डा मार्शक यांच्या–सारख्या व्यक्तिरेखा स्वभावप्रदेशाची सफर घडवून आणतात.

प्रतिभापुऱ्यातील गो.पु. देशपांडे आणि पद्मजा फाटक या दोन प्रतिमासंपन्न लेखकांचा परिचय या लेखामधून करून दिलेला आहे. त्यांचे साहित्य आणि त्यांच्याशी आलेल्या संबंधाचे वर्णन वाययकोशातील वर्णनाइतकेच समर्पक तर्हेने केलेले आहे.

या लेखसंग्रहात एकूण वीस लेख आहेत. यात आलेल्या व्यक्तींची वैशिष्ट्ये जशी ठळकपणे दाखवलेली आहेत, तशी लेखकाच्या लेखनाविषयी ठळक वैशिष्ट्ये सांगता येतात. गौरपुर्यात राहूनही मराठी भाषेच्या प्रवाही सौंदर्याला आंग्लभाषेचे ठिगळ कुठे लागलेले नाही. सहजसुंदर आणि प्रसन्न शैली या लेखनाला लाभलेली आहे. विनोद, उपरोध यांचा छान वापर केल्याने व्यक्तिरेखा खुलते तसे भाषेचे वैभव खुललेले आहे. 'गेंड्याला पावडर लावण्याचा पफ फेकून मारल्यावर त्याच्यावर जेवढा परिणाम होईल तेवढाच परिणाम नारोबावर झाला.' 'मुलगा कानात जानवे न घालता बहिर्दिशेला जाताना दिसला तर त्याची कानउघाडणी होई.' 'मराठी कवीमंडळीत ज्ञानेश्वरीपूजनाला जे महत्त्व असते ते शेठिया मंडळीत चोपडा पूजनाला असते.' अशी वाक्ये सहजतेचा आनंद देतात.

सुधीर ठाकूर यांनी आतली व्यंगचित्रे सजवलेली आहेत, तर सतीश भावसार यांनी सुंदर मुखपृष्ठ साकारलेले आहे.

**मूल्य ३५० रु.   सवलतीत २१० रु.**

# ग्रंथपान

**यशप्राप्तीचं रहस्य**
**डॉ. प्रेमानंद रामाणी**




## ध्यास आणि समर्पणाच्या वाटेवर 'अशक्य'ला स्थान नाही!

''आज वैद्यकीय क्षेत्रातील माझी प्रतिष्ठा ही सहज मिळालेली नाही. ती वर्षानुवर्षाच्या माझ्या कठोर परिश्रमाचं फळ आहे. संधीचा फायदा घेता आले तरी त्या संधी मला माझ्या समाजाकडून देण्यात आलेल्या आहेत याचा विसर मला पडलेला नाही. मी समाजाचं देणं लागतो आणि याच भावनेनं समाजातील गरजू विद्यार्थी, रुग्ण, वृद्ध यांच्यासाठी बरेच मोफत उपक्रम आयोजित करत असतो.''

डॉ. प्रेमानंद रामाणी, आतंरराष्ट्रीय कीर्तीचे वरिष्ठ न्यूरो स्पायनल सर्जन आहेत. 'न्यूरो स्पायनल सर्जन्स असोसिएशन' व 'जागतिक आरोग्य संघटनेच्या स्पाइन कमिटी'चे अध्यक्ष आहेत. 'मायक्रोडिसेक्टोमी', प्लिफ', 'ए.सी.एफ. इम्पालंट', 'डायनॅमिक कॉरपेक्टॉमी केजेस' आणि 'आर्टिफिशिअल सर्व्हायकल डिस्क' अशा पाठीच्या कण्यावरील शस्त्रक्रियेसाठी उपयुक्त ठरणार्या शोधाचे ते जनक आहेत. त्यांच्या या क्षेत्रातील भरीव योगदानासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक कीर्तीचे सन्मान त्यांच्या शिरपेचात आहेत. याशिवाय साहित्यसेवाही रुग्णसेवेइतकीच भरीव आहे. आतापर्यंत साठहून अधिक प्रकाशित पुस्तकांची निर्मिती त्यांच्या नावावर आहेत. ही पुस्तके म्हणजे केवळ प्रतिभेचा विलास नाही, तर त्यांचे कठोर परिश्रम, ध्यास, त्याग, नावीन्याचा शोध, प्रचंड अनुभव यांचे अनुभूतीसार आहे. यातून केवळ लेखनाचा छंद, आवड, आनंद एवढीच माफक अपेक्षा नाही, तर होतकरू तरुणांपासून वृद्धत्वाकडे झुकलेल्या ज्येष्ठांपर्यंत उपयुक्त ठरणारे मार्गदर्शन, समुपदेशन त्यातून दिलेले आहे. आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा इतरांना व्हावा हा हेतू त्यातून व्यक्त झालेला आहे. सदरचे पुस्तक त्या मालिकेतील पुढचा टप्पा आहे.

यश मिळवण्यासाठी प्रत्येकाची धडपड सुरू आहे. यशाविषयीच्या संकल्पना प्रत्येकाच्या वेगळ्या आहेत. त्याच्या प्राप्तीसाठीचे प्रयत्न प्रत्येकाचे वेगवेगळे आहेत. यातून काही यशस्वीतेला गवसणी घालतात, काही त्याच्या पायरीपर्यंत पोचतात, परंतु अनेकांचे हात पायरीपर्यंतही पोचत नाहीत. अशावेळी देव आणि दैव यांचा हवाला पुढे करण्यात येतो. 'नशीब' हा परवलीचा शब्दप्रयोग हमखास शस्त्रासारखा करण्यात येतो. ही वरवरची आणि स्वत:चे फसवणूक केलेल्या समाधानाची कारणे होत. खरे यश म्हणजे काय, त्याच्या प्राप्तीसाठी कोणत्या गुणांची आणि परिश्रमाची आवश्यकता असते, त्यासाठी कोणत्या पायर्या आहेत, त्यासाठी कोणत्या मार्गदर्शनाची, अभ्यासाची गरज असते यांचा अभाव अनेकदा स्पष्टपणे दिसून येतो. झटपट यश मिळवून देणारी गुरुकिल्ली अजून सापडलेली नाही, परंतु त्या मार्गावर जाण्यासाठीचे मार्गदर्शन उपलब्ध आहे. ते मार्गदर्शन स्वत:च्या अनुभवावर आधारलेले असल्याने त्याला विचाराचे, चिंतनाचे अधिष्ठान प्राप्त झालेले आहे. असे मार्गदर्शन यशाच्या रहस्यात दडलेले आहे, ते डॉ. रामाणी या पुस्तकातून सढळ हस्ते वाचकांच्या हाती सुपूर्द करत आहेत. यात केवळ मार्गदर्शन नाही; तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, शरीरशास्त्र, अध्यात्म यांची त्याला उत्तम गुंफण लाभलेली आहे. स्वत:वरचा विश्वास, ध्येयनिष्ठता, अथक परिश्रम आणि स्वयंशिस्त या गुणांची सुंदर कलाकुसर नजाकतीने केलेली आहे.

यशाच्या मार्गात केवळ आर्थिक अडचणी बर्लिनच्या भिंतीसारख्या आड येतात हा समज चुकीचा आहे. भीती, नैराश्य, नकारात्मक भावना, राग, लोभ, कटुता, मत्सर, ईर्ष्या, वैर, सजगतेचा अभाव, शिस्तीचा अभाव, संधी शोधण्याचा अभाव, धाडस–ध्यास––नावीन्य यांची ओढ नसणे, प्रयत्नात सातत्य नसणे, अशी अनेक मानसिक, भावनिक, सामाजिक आणि शारीरिक कारणेही यशापर्यंत जाण्यापासून रोखतात. या सगळ्यांवर मात करायची तर स्वत:त बदल घडवण्याची आवश्यकता आहे. मन–चित्त–भावना स्थिर हव्यात. सकारात्मक विचाराची बैठक हवी. प्रत्येक संधीचे सोने करण्याची आस हवी. सतत एकाच ध्येयाचे एकाग्र चिंतन हा ध्यास हवा. यासाठी अनेक उपाय आहेत. ते उपाय यशाच्या रहस्यात दडलेले आहेत. ते हिरेमोती डॉ. रामाणी यांनी या पुस्तकाद्वारे वाचकांच्या ओंजळीत टाकलेले आहेत.

या पुस्तकात एकूण पंधरा लेख आहेत. प्रत्येक लेखाच्या सुरुवातीस थोर मान्यवरांच्या थोर विचारांची मांडणी केलेली आहे, जी प्रेरक आणि आचरणात आणावी अशी आहे. लेखांची भाषा सोपी, सुटसुटीत, मुद्देसूद असून तिला विचारांची पक्की अनभुवाधिष्ठित जोड आहे. प्रत्येक विषय अभ्यासपूर्ण पद्धतीने स्पष्ट केला आहे. त्यातला सखोलपणा वाचकाला स्वत:ला तपासून पाहण्यास भाग पाडणारा आहे. यशस्वी माणूस आणि यशस्वीतले समाधान याचे समग्र वर्णन म्हणजे 'यशप्राप्तीचं रहस्य' हे पुस्तक होय.

पुस्तकात रेखाचित्रांचाही समावेश आहे, जी विषयाचे अंतरंग उलडगून दाखवतात. पुंडलिक वझे यांची ही चित्रे आशयाला नेमकेपणाने साकारतात. मुखपृष्ठावर डॉ. रामाणी यांची मुद्रा आहे. अंजली रावत यांनी हे मुखपृष्ठ सजवलेले आहे.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**




# ग्रंथपान

**पोलीस नभोमंडळातील आयपीसएस नक्षत्रं**

**प्रतिभा बिस्वास**




## जिद्द व कर्तृत्वापुढे आकाश ठेंगणे

''मुलाखतीचं पॅनल त्या दृष्टीने खडूस नसतं. ते तुम्हाला पहिली संधी देतात. कम्फर्टेबल होण्याआधी उमेदवार टेन्स असतो. तुमच्यामध्ये कार्यालयीन क्षमता आहे की नाही ते त्यांना पाहायचं असतं. तुमचं व्यक्तिमत्त्व कसं आहे, सोशलवर्कमध्ये, सर्व्हिसमध्ये ऑफिसर म्हणून तुम्ही देशाला काय देऊ शकता? पैशासाठी तुम्ही येथे येता का? असा त्यांना सगळा आढावा घ्यायचा असतो.''

यूपीएससी अर्थात केंद्रीय लोकसेवा आयोगाची स्पर्धापरीक्षा. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यास आयएएस, आयपीएस, आयएफएस अशा अनेक सेवांची द्वारे खुली होतात. त्या त्या क्षेत्रात उत्तम कामगिरी करण्याची संधी मिळते तशी लोकांशी थेट संपर्क होत असल्याने समाजसेवा करण्याची उत्तम संधी या परीक्षेमुळे आपोआपच चालून येते. ही परीक्षा उत्तीर्ण होणे कठीण, अवघड की सहजसोपे, याचे उत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेले त्यांच्या अनुभवाद्वारे निश्चितपणे सांगू शकतात. जे या परीक्षेत अनुत्तीर्ण झाले, त्यांच्यासाठी केवळ कठीण, अवघड हे शब्द पुरेसे नाहीत. त्यांची क्षमता, अभ्यासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, अभ्यासासाठी दिलेला वेळ, अथक प्रयत्न, नियोजन, शिस्त, जिद्द, पाठबळ आदि घटकांचाही यात समावेश असतो. यातला एखादा घटक कमकुवत ठरला तर ज्या यशाच्या सोपानावर उभे राहण्याचा प्रयत्न असतो तो सोपान सापशिडीचा खेळातला ठरू शकतो.

'पोलीस नभोमंडळातील एकवीस आयपीएस नक्षत्रं' या पुस्तकात २१ आयपीएस परीक्षा उत्तीर्ण असलेले, आपली या क्षेत्रातली कामगिरी उत्तम रीतीने बजावलेले सर्व वरिष्ठ अधिकारी आहेत. ही परीक्षा केवळ सन्मान देत नाही तर या क्षेत्रातले सर्वोच्च पद बहाल करते. अभिमान, समाधान, प्रतिष्ठा, आदर, दबदबा यांचेही अवकाश स्वत:भोवती निर्माण करते. कडक वर्दीतील हे व्यक्तिमत्त्व खरोखर नक्षत्रासारखे स्वयं तेजाने सगळ्यांचे लक्ष वेधून घेते. अशा स्वयंप्रकाशी नक्षत्रांची ओळख या पुस्तकात तन्मयतेने करून दिली., यासाठी लेखिका प्रा. प्रतिभा बिस्वास यांचे अभिनंदन करायला हवे. १९५८ साली उत्तीर्ण झालेले के.पी.एस. गिल आणि १९६४ सालचे अरविंद इनामदार हे कर्तृत्वान अधिकारी आज हयात नाहीत, परंतु त्यांची कारकीर्द कायम स्मरणात राहील अशी होती. तिथपासून ते २०१२ सालचे अधिकारी सोहेल शर्मा यांच्यापर्यंतच्या पोलीससेवेतील अधिकार्यांची निवड या लेखनासाठी केलेली आहे. यात डॉ. किरण बेदी, मीरा बोरवणकर, शारदा राऊत, ज्योतिप्रिया सिंग, मोक्षदा पाटील, तेजस्वी सातपुते या सहा महिला अधिकार्यांचा समावेश आहे.

यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम, त्यांची जिद्द याविषयी त्यांचे अनुभव आहेत, तसे त्यांच्या कारकिर्दीतील सेवेचे अनुभव आहेत. सेवेत अडचणी असतातच, परंतु त्यावर मात करून पुढे जाण्याची जबाबदारी पार पाडावी लागते. यासाठी मनोबल, धैर्य, धाडस आणि कुशल नियोजनही आवश्यकता असते. गडचिरोली भागात केवळ नक्षलवाद्यांचा बंदोबस्त करायचा नाही तर त्या सेवेत आपले सहकारी शहीद होणार नाहीत हे पाहणे महत्त्वाचे असते. वेळ, काळ, साहाय्य याची तमा न बाळगता अतिरेक्यांशी सामना करण्यासाठी ताजमध्ये धैर्याने सामोरे जाण्याची गरज असते. जातीय दंगल, वाहतूकव्यवस्था, निवडणुका, स्कॅंडल्स, रॅकेट्स, महिला अत्याचार, राजकीय दबाव अशा अनेक नाजूक, संवेदनशील, गुंतागुंतीच्या प्रसंगी धाडसाने आणि तितक्याच संयमाने विचारपूर्वक कर्तव्य पार पाडावे लागते. अशा अनेक प्रसंगी स्वत:चा कस लावून यशस्वीपणे स्वत:चा ठसा उमटवणारे हे अधिकारी आहेत. यात सतीश माथूर, दत्ता पडसलगीकर, प्रदीप देशपांडे, संजय लाटकार, डॉ. रवींद्रकुमार सिंगल, मिलिंद भारंबे, विश्वास नांगरे-पाटील (मनमें है विश्वास), कृष्णप्रकाश, डॉ. सुहास वारके, संदीप पाटील, मनोजकुमार शर्मा (ट्वेल्थ फेल), डॉ. अभिनव देशमुख, सोहेल शर्मा यांचे अनुभव लेखिकेने ओघवत्या आणि बांधेसूद शैलीत मांडलेले आहेत, अनुभवकथनातून स्वत:च्या कार्याची, परिश्रमाची ओळख आहे तशी होतकरू तरुण, ज्यांना या परीक्षेविषयी ओढ आहे, त्यांना चार मौलिक मार्गदर्शनाचे सल्लेही आहेत. प्रेरणा आणि जिद्द यांचा सुंदर मिलाफ या लेखनातून वाचायला मिळतो, तसा यशाकडे जाणारा मार्ग सुकर कसा होईल यासाठी हे पुस्तक उत्तम सोबतकार ठरू शकते.

यूपीएससीची संपूर्ण माहिती, सदरक्षणाय खलनिग्रहणाय आयपीएसचा इतिहास सोबत दिलेला आहे. प्रश्न-उत्तरे असा मुलाखतीचा बाज न ठेवता सलग कथनात्मक निवेदन ठेवल्याने वाचनसुलभता आली आहे. उत्तम अशी प्रास्ताविकाची जोड आणि बिरुदावली असावी अशी शीर्षकाची निवड, त्यामुळे त्या त्या व्यक्तिमत्त्वाची खास ओळख निर्माण झाली आहे. मुलाखतीसाठीचे परिश्रम आणि लेखनातली सहजता, दोन्हीही कौतुकास्पदच! भूषण गगराणी यांची सुंदर प्रस्तावना लाभली आहे. सतीश भावसार यांनी मुखपृष्ठाची सुंदर मांडणी केलेली आहे.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**शिकणारी शाळा 'अभिरंग'**
**संपादन : वैशाली रोडे**




**शिकणारी शाळा 'बालरंग'**
**संपादन : वैशाली रोडे**




**ध्येय, ध्यास आणि पूर्तता यांची गाथा**

'शिक्षणासाठी नवता' आणि 'शिक्षण व्यवस्थापन' ही अंगे एकमेकांपासून सुटी करता येत नाहीत. शिक्षणातली नवता म्हणजे गुणवत्तावाढीसाठी दर्जेदार शिक्षणासाठी सातत्याने केलेले प्रयत्न आणि प्रयोग, तर शिक्षण व्यवस्थापन म्हणजे कार्यालयीन व्यवस्थापनाबरोबर भौतिक सुविधांचे (जमीन, इमारत इ.) शैक्षणिक साधन–सुविधांचे, वर्गपातळीवरच्या गरजांचे आणि अर्थातच निधीपुरवण्याचे व्यवस्थापन. तसंच शासकीय पातळीवरचा (स्थानिक स्वराज्य संस्था आणि राज्य व केंद्र सरकारशी संबंधित) शिक्षण व्यवस्थापनाचाही त्यात अंतर्भाव असतो.

'शिकणारी शाळा 'अभि'रंग' आणि 'शिकणारी शाळा बालरंग' अशा दोन शाळांविषयीचा दस्तऐवज 'ग्रंथाली'ने प्रकाशित केला आहे. गोरेगाव, मुंबईचे एक उपनगर येथे प्रथम शाळा सुरू करण्यात आली तिचे नाव 'अ.भि.गोरेगावकर इंग्लिश स्कूल.' १९४२ साली स्थापलेल्या शाळेचे नाव 'इंग्लिश स्कूल' असे असले तरी तिचे माध्यम मराठी आहे. मग 'इंग्लिश स्कूल' हे नाव कसे? तर ज्या शाळेत पाचवीपासून इंग्रजी विषय (इंग्रजी पहिली) शिकवला जातो. तिला इंग्लिश स्कूल म्हणायची प्रथा तेव्हा होती. हे त्याचे उत्तर ही शाळा सुरू करण्याची प्रेरणा गोविंद पांडुरंग पालकर या शिक्षकाची. तिला नावारूपाला आणायचे श्रेय दयानंद गोविंद प्रभूसर यांचे. त्यामुळे ही पातकरांची शाळा तशी प्रभूसरांची शाळा म्हणून ओळखली जाते. या शाळेसाठी ज्या गोरेगावकरांनी रोख देणगी दिली त्यांचे अनंत भिकोबा हे नाव या शाळेच्या नावाशी जोडले गेले.

त्याकाळी गोरेगाव भागात केवळ चौथीपर्यंत शिक्षणाची सोय होती. पुढील शिक्षणाची सोय हा एक हेतू या शाळेच्या स्थापनेमागे होता, तसा केवळ मुलांना शिक्षण देणारी शाळा नव्हे तर माणूस घडवणारी शाळा असावी, असा दुसरा हेतू होता. शून्यातून म्हणजे केवळ सात विद्यार्थ्यांपासून सुरुवात झालेली शाळा आज शिक्षणक्षेत्रात नावारूपाला आलेली अग्रगण्य संस्था म्हणून ओळखली जाते. इंग्रजीचा अट्टहास हा परवलीसारखा असतानाही मातृभाषेतून दर्जेदार शिक्षण देणारी ही शाळा आपला लौकिक टिकवून आहे. वर्गात जे शिक्षण दिले जाते ते केवळ पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित नाही. त्यापलीकडे जाऊन अनेक प्रयोग करून उत्तर आकलन होईल आणि त्यात गती प्राप्त होईल असे शिक्षण इथे दिले जाते. प्रत्येक ज्ञानशाखेत शिक्षणासाठीची नवता आणि अद्ययावतपणा ही या शाळेची वेशिष्ट्ये. शिक्षक हा मुख्य घटक, त्याची गुणवत्ता केवळ पदवीप्रमाणपत्राच्या आधारे तपासली जात नाही, तर प्रत्येक शिक्षकाची शिक्षण आणि विद्यार्थी यांच्याविषयीची आस्था, तळमळ, ऊर्जा, प्रयोगशीलता यानुसार ठरवली जाते. वेगळ्या पद्धतीने विचार करणारे, समर्पित भावनेने काम करणारे शिक्षक या शाळेला लाभलेले आहेत आणि शिक्षकापेक्षा पालकत्वाच्या भूमिकेतून विद्यार्थ्यात एकजीव झालेले आहेत. शाळा नावारूपाला येण्यासाठी शिक्षकांची ही समर्थन भावना तितकीच महत्त्वाची आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांकडे लक्ष दिले जातेच, त्याला समजून घेतले जाते. मुलांसाठी समुपदेशन केंद्र सुरू करण्याची कल्पना तर अभिनवच म्हणायला हवी.

संस्थेला पन्नास वर्षे झाल्यानंतर तिने पुढचे पाऊल टाकले. शिशूवर्गापासून चौथीपर्यंतची शाळा सुरू केली. एकदा विद्यार्थ्याने प्रवेश घेतला, की संपूर्ण शालेय शिक्षण एकाच छताखाली व्हावे हा यापाठी उद्देश. विशेष म्हणजे मराठी माध्यम हाच ध्यास कायम आहे. या पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक शाळेची स्थापना १९९९मध्ये म्हणजे संस्थेला सत्तावन्न वर्षे झाल्यानंतर करण्यात आली आहे. या शाळेचा समग्र आढावा. 'बालरंग' या दुसऱ्या पुस्तकातून घेतलेला आहे. या शाळेतही प्रयोगशीलता कशी जपलेली आहे, याची सविस्तर माहिती दिलेली आले.

या अभिरंग आणि बालरंग पुस्तकांतील लेख हे शाळेतील शिक्षक, माजी विद्यार्थी, पदाधिकारी यांनी लिहिलेले आहेत. या लेखांच्या आधारे एखादी शैक्षणिक संस्था स्थापन करण्यापासून ती नावारूपाला येईपर्यंत कशी प्रवास करते, त्यासाठी प्रत्येक टप्प्यावर व्यवस्थापनाला किती प्रयास करावे लागतात, याची मार्गदर्शक ठरावी अशी माहिती समोर येते. विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे, साहाय्य करणाऱ्यांचे अनुभव खूप उद्‌बोधक आहेत. त्यामुळे त्यातून संपूर्ण शाळा आणि तो काळ नजरेसमोर दृश्यस्वरूपात उभा राहतो. या सगळ्यांकडून लेख लिहून घेणे आणि त्याचे संपादन करणे म्हणजे १९४० पासूनचा काळ कवेत घेण्यासारखे आहे. हे अवघड काम वैशाली रोडे यांनी कुशलतापूर्वक केले आहे. मांडणी विषयानुरूप केलेली आहे. इंट्रो आणि फोटो यामुळे पुस्तकांच्या सौंदर्यात भर पडलेली आहे. आणि पुस्तकाच्या शीर्षकाने या सगळ्यावर मात केलेली आहे. सतीश भावसार आणि सौमित्र देशमुख यांनी सुंदर मुखपृष्ठांची साथ दिलेली आहे. नवीन शिक्षणसंस्था स्थापन करणाऱ्यांसाठी आणि आदर्श शिक्षणसंस्था असावी. याचा ध्यास असणाऱ्यांसाठी ही पुस्तके उत्तम मार्गदर्शक आहेत.

**मूल्य २५० रुपये   सवलतीत १५० रुपये**
**मूल्य २५० रुपये   सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथपान

### यशपुष्प
**डॉ. आशुतोष रारावीकर**




**आशयसंपन्न विचारधन**

*रक्ताचा रंग लाल, आकाशाचा रंग निळा*
*पाण्याला तर रंगच नाही*
*पण जीवनाचे सगळे रंग ज्याला उमजतात*
*त्याच्या आयुष्याच्या रंगाचा बेरंग कधीच होत नाही.*

आयुष्याकडे पाहण्याचा, आयुष्य जगण्याचा दृष्टिकोन प्रत्येकाचा वेगवेगळा असू शकतो. या जगण्यात यश आहे तसे अपयशही गृहीत धरलेले असते. म्हणजे जगण्याची लढाई ही जिंकण्यासाठीच असते. परंतु लढाईत अपयश येणार नसले तरी त्याची मानसिक तयारी ठेवली तर त्या अपयशाने खचून जाण्याची वेळ येत नाही. हा जो विचार आहे त्याला समांतर अशी अनेक उदाहरणे स्वतःच्या स्वरुपात पाहावयास मिळतात. घागर मोठी करण्यापेक्षा तिला छिद्र पडणार नाही याची खबरदारी घेतलेली बरी. थोडक्यात पुढे चालणे ही आयुष्याची साधना आहे. पावलांना ठोकर वा ठेच लागणे या प्रवासात गृहीत धरले तर प्रथम अशी ठेच लागणार नाही याची काळजी महत्त्वाची ठरते. तेव्हा आयुष्याच्या सगळ्या बाजू समजून घेतल्यावर रंगाचा बेरंग होण्याची शक्यता सहसा वाट्याला येत नाही.

डॉ. आशुतोष रारावीकर यांचा विचारपुष्पांचा खजिना असलेले पुस्तक 'ग्रंथाली'ने प्रकाशित केले आहे. त्याचे नाव आहे 'यशपुष्प.' या शीर्षकाविषयी लेखकाने मनोगतात स्पष्ट केलेले आहे. ज्यांच्या संस्काराची उत्तम शिदोरी लाभली, जीवनाची सार्थकता ज्याच्यामुळे कळली ते ती. आई आणि ती. बाबा यांच्या नावाची केलेली संधी; वडिलांचे नाव यशवंत म्हणून 'यश' आईचे नाव पुष्पलता म्हणून 'पुष्प' असे 'यशपुष्प'. परंतु एवढाच अर्थ या शीर्षकाचा मर्यादित नाही. लेखकाने प्राप्त केलेले यश आणि त्यासाठी त्याच्यावर झालेली पुरस्कारांची, सन्मानाची कीर्तीची पुष्पवृष्टीही तेवढीच अभिमानास्पद आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक आहेत. नामांकित अर्थतज्ज्ञ असून अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सन्मान त्याच्या यशाच्या शिरपेचात आहेत. बारावीला बोर्डात पहिला येण्याचा मान त्यानी पटकावलेला आहे. सात पुस्तके त्यांची प्रकाशित आहेत. शैक्षणिक कारकीर्दही सुवर्णाक्षरांनी लिहावी अशीच आहे. अशा तज्ज्ञ रारावीकरांच्या विचारांची झेपही त्यांना साजेशी नसली तरच नवल. 'यशपुष्प' हे त्यांच्या मुक्तचिंतनाचा, आयुष्याकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहण्याचा आणि त्याचवेळी खेळकरवृत्तीने सामोरे जाण्याचा ठेवा त्यांनी वाचकांच्या हाती सोपवलेला आहे. त्याला त्यांनी नाव दिलेले आहे, 'यशस्वी जीवनासाठी विचारपुष्पांचा खजिना.' त्यांची विभागणी 'गंध अंतरिक्षाचा', 'स्मितलहरी', 'लॉकडाऊनच्या वेळेत' आणि 'पुष्पांजली परमेशाला' या चार भागात केलेली आले. गंध अंतरिक्षाचा यातील विचार हे मुक्तप्रमाणे ठाशीव, चपखल आणि जीवनानुभवाचे सार असलेले स्पष्ट विचार आहेत. गझलेच्या शेराप्रमाणे प्रत्येक विचार स्वतंत्र, अर्थगर्भ असलेला. ते मुक्तपणे व्यक्त झालेले असले तरी त्यांचा बाज कवितेसारखा आहे. त्यातील अर्थच्छटा प्रत्येकाच्या आकलनानुसार अनेकपदरी आहेत. त्यांच्यातील स्पष्टता आणि विचारांची खोली थेट भिडणारी आहे. जे साध्य करायचे त्याची कालमर्यादा ठरवून त्याच्याआत ते साध्य करा अथवा कालबाह्य ठरण्याचा धोका ठरलेला. जिंकण्यासाठी शर्यतीत उतरलेच पाहिजे. परंतु त्यासाठी कुणाला पाडण्याची गरज नाही, स्वतःची गती वाढवा. माणूस कसाही असला तरी त्यांच्या अंतरी चांगलेपणाचा दीप तेवत असतो. कुठल्याही युद्धासाठी आपण सज्ज असले पाहिजे. भविष्य पाहण्यापेक्षा भविष्य घडवणं महत्त्वाचं हा दृढविश्वास ते जागृत करतात.

स्मितलहरी या भागात विनोदाचा शिडकावा करताना उपहास वा विडंबन करत नाहीत. तर निखळ मनोरंजन करताना आयुष्याची दुसरी बाजू प्रकाशात आणतात, जी वाचत असताना चेहऱ्यावरच नव्हेतर अंतरंगातही स्मितलहरीचे तरंग उमटवतात. कोरोनामुळे 'लॉकडाऊन' झाले. या लॉकडाऊनमुळे अनेकांवर अनेक प्रसंग गुदरले. यातला सगळ्यात मोठा प्रसंग म्हणजे कुटुंबातील सर्वजण आता एकमेकांना पूर्णपणे ओळखू लागले. या लॉकडाऊनसाठी स्वतंत्र एक भाग यात समाविष्ट आहे. शेवटचा भाग हा 'पुष्पांजली परमेशाला'. यातून व्यक्त झालेले विचार हे वैश्विक विचार असल्याचे स्पष्ट होते. प्रार्थना करता करता एकदिवस प्रार्थनेचं उत्तर आपण व्हावं, असा विचार ते मांडतात तेव्हा पसायदानाचे स्मरण इतके वैश्विक अधिष्ठान यातून व्यक्त होते.

प्रत्येक विचार हा सुभाषितांप्रमाणे प्रत्येकाने केवळ मुखोद्गत करावा असे नाहीतर तो आचरणात आणावा. तसे झाले तर पण म्हणजे काय? हा प्रश्न कधी कुणाला पडणार नाही. एक चांगहा विचारसंग्रह वाचल्याचे समाधान हे पुस्तक देते. या पुस्तकाची निर्मितीसुद्धा अतिशय उत्तमपणे झालेली आहे. प्रत्येकाने संग्रही ठेवावा असा हा संग्रह आहे. उत्तम कांबळे यांची प्रस्तावना या पुस्तकाचे कौतुक करणारी आहे. समीर अन्नारकर यांनी मुखपृष्ठ आणि मांडणी केलेली आहे.

**मूल्य २०० रुपये   सवलतीत १२० रुपये**

## ग्रंथपान

**प्रेमसेतू**
**संदीप रामराव काळे**



**तुम्हीपण काळजी घ्या!**

एखादी व्यक्ती खूप इमोशनल असते आणि तिला एखादा पर्याय सापडतो आणि तो पर्याय आता असलेल्या व्यक्तीपेक्षा अधिक चांगला आहे, असे तिला वाटते, तेव्हा ती नवा पर्याय नक्कीच स्वीकारू शकते. पण, हा नवीन पर्याय स्वीकारत असताना जुने ऋणानुबंध, आत्मिक भावना यांचा गंध कुठेतरी चिकटलेला असतो.

प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे... प्रेम हा जीवनाचा गाभा. प्रेमही जीवनाची संजीवनी, प्रेम म्हणजे सर्वस्वाचं सार, प्रेम म्हणजे... प्रेम ही भावना सर्वकाळ जीवनाला व्यापून टाकणारी, चिरंतन सोबत करणारी, तिच्यासाठी कुठलेच निर्बंध, मर्यादा नसणारी, दोन नात्यांना एकत्वात बांधणारी, हसवणारी, फुलवणारी, ओढ-जिव्हाळ्यात चिंब भिजवणारी, स्वत:ला वेढून टाकणारी, स्वर्गीय आनंद देणारी आणि त्याचवेळी विस्कटली तरी दरीच्या तळाशी, डोहाच्या भोवर्याशी समाधी देणारी... प्रेमाची रूपे, प्रेमाची सफलता, विफलता याविषयी सर्वकाळ लिहिले जात आहे. प्रत्येकाचे अनुभव, चिंतन, आकलन यांचे दर्शन त्यातून होत असते. कथा, कादंबरी, कविता यातून ती वाचकांच्या समोर व्यक्त झालेली कहाणी असते, गाथा असते, भावनोद्गार असते... तरीही ती प्रत्येकवेळी वेगळी आणि तितकीच वाचकाला भिडणारी असते. कितीही लिहिले तरी कधीही कोमेजलेला नाही असा हा एक विषय आहे ज्याचे नाव आहे प्रेम! हाच विषय घेऊन आलेले आहेत संदीप काळे.

संदीप काळे हे पत्रकार, संपादक, प्राध्यापक, व्याख्याते, अभ्यासक, अनुवादक या नात्याने सर्वांना परिचित आहेत. आतापर्यंत त्यांची सुमारे १८ पुस्तके प्रकाशित आहेत. त्यापैकी 'मु. पो. आई' हे सर्वाधिक वाचक पसंतीस उतरलेले पुस्तक (१६ आवृत्त्या). हरहुन्नरी, उत्तम सामाजिक भान असलेले, अनेक शासकीय पुरस्कारांनी सन्मानित झालेले बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणजे संदीप काळे.

'प्रेमसेतू' ही गाथा काव्याचा आविष्कार आहे, कादंबरीचा वेगळा प्रकार आहे आणि म्हटले तर चरित्राचा एक अंश आहे. लेखन प्रथमपुरुषी असल्याने हे लेखन त्यांच्या आत्म्याचा हुंकार म्हणावयास प्रत्यवाय नाही. प्रेम हा हळवा, नाजूक भावनेचा दवबिंदू आहे. त्याचा सागरही होतो, सूरही होतो आणि विश्वही. याचा बांधलेला, उभारलेला, गुंफलेला सेतू वाचकासाठी खुला केलेला आहे. उत्कटता आणि दाहकता आा दोन स्तंभाच्या आधारावर उभा असलेला हा सेतू. काव्याचा आणि कथानकाचा प्रचंड मोठा प्रवाह आपल्या काळजाशी कवटाळून आहे. या प्रवाहाचा वेग आणि त्याची घनगंभीर सखोलता एखाद्या प्रपातासारखी आहे, याचा अनुभव ही गाथा वाचताना येते, पूर्णपणे मनाला वेढून टाकते, काळजाचा ठाव घेते, आपलेपणाचे भान जागृत करते. 'अरे, हा तर माझाच प्रवास आहे' हे पुन:पुन्हा मनावर ठसवत जाते. ज्याला लेखकाने नाव दिले आहे, 'आत्मिक साहित्य!'

प्रेमसेतू हा तेरा खांबांवर उभा आहे; स्पर्श, तृप्ती, प्रेम, जिव्हाळा, तुझे असणे, तुझ्यासाठी, जिवलगा, भावना, जाणीव, मित्रत्व, वेदना, दिवस सरताना आणि विरह. प्रयोगशाळेत कुठल्याही प्रयोगासाठी जे घटक ठरलेले असतात तसे प्रेमासाठी या तेरा घटकांनी स्वत:चे स्थान अबाधित ठेवलेले आहे. या सर्व घटकांची वैशिष्ट्ये, उत्कटता, दाहकता आणि त्यातून आलेली सोशिकता व्यक्तिगणीक वेगवेगळी असू शकते, परंतु अनुमानात फारसा फरक पडत नाही. तेच या गाथेतून व्यक्त झालेले आहे. परंतु इथे केवळ प्रियकराने प्रेयसीशी साधलेला, अंत:करणातून प्रवाहित झालेला संवादच नाही, त्याला प्रत्येकाला एकेका उपकथानकाची उत्तम अशी जोड आहे. अमृता प्रीतम-इमरोझ, सरलादेवी-म. गांधीजी, मल्लिका-नामदेव ढसाळ, विनी-नेल्सन मंडेला, कादंबरी-रवींद्रनाथ टागोर, एमिली-सुभाषचंद्र बोस, राधा-मीरा-कृष्ण, रेखा-अमिताभ बच्चन, ॲनी-चार्ल्स, मार्गारेट (निवेदिता)-स्वामी विवेकानंद, फॅनी-डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सोनी-महिवाल (राजकुमार इज्जत बेग), ऊर्मिला-लक्ष्मण, मामाची मुलगी-प्राध्यापक; या प्रत्येक उपकथानकात एक प्रेमगाथा आहे. या प्रत्येक गाथेशी प्रियकराचे आणि प्रेयसीच्या प्रेमाचे नाते आहे. ती गाथा आपली आहे, ही भावना, अनुभव म्हणून त्याचा उल्लेख संदर्भासारखा या गाथेत आलेला आहे.

प्रेम हे काव्य असते म्हणून त्याचे व्यक्त होण्याचे माध्यम काव्यच निवडले जाते. 'प्रेमसेतू' हे कवितासंग्रहासारखे रूप धारण करून आलेले नाही. परंतु जो संवाद साधला आहे तो काव्यापेक्षा वेगळा नाही. एक मुक्तकाव्य म्हणावे असा हा प्रेमसेतू आहे. कविता, शेर यांचाही साधा समावेश आहे तो याच प्रवाहाचा एक भाग आहे. भाषा मार्दव हा गुण उत्कटतेने जाणवतो. आकस, द्वेष, दूषण या विकारापासून ही भाषा अंतर राखून आहे. कथानकाला आरंभ, मध्य आणि शेवट असतो, तसे प्रत्येक टप्पे इथे आहे. त्यामुळे कथानकाचा सहजसुंदर प्रवास प्रत्ययास येतो. या प्रवासाविषयी लेखकाने स्वत:च्या मनोगतात व्यक्त केलेल्या भावना या गाथेचे प्रकरण असावे इतक्या संवादी आहेत. डॉ. वृषाली किन्हाळकर यांची साक्षेपी प्रस्तावना ही प्रेमसेतूसाठी मोठी शाबासकी म्हणता येईल. नयन बारहाते यांचे मुखपृष्ठ हे या गाथेचे कोंदण असावे इतके सुंदर आहे.

**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथपान

**छपाई ते लेखणी**
**यशवंत मराठे**



**यशस्वी उद्योजगाची लेखनातली चौफेर मुशाफिरी 'मुलुखगिरी'**

''गेली साधारणत: दोन-अडीचशे वर्षे अत्यंत लोकप्रिय असलेली ही पूजा (सत्यनारायण) त्या आधीच्या धार्मिक जीवनाचा भाग नव्हती. ही पूजा शिवकालात नव्हती. छत्रपतींच्या कारकिर्दीत अनेक विवाहसमारंभापासून किल्ले उभारणीपर्यंत - मंगलकार्ये झाली, परंतु शिवाजीमहाराजांनी कधी सत्यनारायण केल्याचे उल्लेख नाहीत. अगदी पेशवाईतसुद्धा ही पूजा केली जात नव्हती.''

'छपाई ते लेखणी' हा लेखसंग्रह आहे. यात २८ लेख आहेत. यशवंत मराठे यांनी २०१८ मध्ये 'सरमिसळ' या नावाने ब्लॉग लेखन सुरू केले. अवघ्या दोन वर्षांच्या काळात या लेखांची संख्या १७५ वर पोचली. त्यापैकी हे निवडक लेख. ब्लॉगवरचे लेखन हे स्वतंत्र आणि स्वांत असते. म्हणून ते टिकाऊ नसून टाकाऊ असते किंवा त्या त्या वेळची ते ऊर्मीलेखन असते असे अजिबात नाही. लेखन हे कसदार आणि विषयाला न्याय देणारे असते. महत्त्वाचे त्याला प्रकाशात आणण्यासाठी 'ब्लॉग' हे तंत्रज्ञानाने उपलब्ध करून दिलेले माध्यम सोयीचे ठरते. त्याचा वाचक अर्थातच तंत्रज्ञानाशी जुळवून घेणारा असतो, आणि आज बहुतेक सगळेच वाचक या माध्यमाशी सराईत होत असल्याने वाचकांची संख्या मोठी भरते. त्यावर प्रतिक्रियाही त्याचवेळी त्याच माध्यमावर देता येते. असे लेखक आणि वाचक यांना जुळवून घेणारे आणि व्यक्त होण्यास साहाय्य करणारे माध्यम म्हणजे ब्लॉग. त्या ब्लॉगवरील लेखांचा हा संग्रह, 'छपाई ते लेखणी'.

शीर्षकात छपाई आणि लेखनाचा उल्लेख आहे तो दोन अर्थाने. सुबक छपाईसाठी क्रांतिकारक ठरणारे मुद्रणयंत्र म्हणजे 'ऑफसेट प्रिंटिंग मशीन'चे उत्पादन करणारा उद्योगसमूह हा 'मराठे उद्योग' समूह आहे. आज जगभरात या मशीनचा छपाईसाठी उपयोग करण्यात येत आहे. या यशस्वी व्यवसायातून निवृत्ती घेतल्यानंतर यशवंत यांनी सामाजिक कार्य करत असूनही फावल्या वेळात लेखनाकडे विशेष लक्ष दिले. त्या अर्थाने छपाई ते लेखणी.

हे एका यशस्वी उद्योजकाचे चरित्र वा आत्मचरित्र नाही. (खरे तर त्यांनी ते लिहायलाच हवे.) तरीही लेखनाच्या ओघात दोन लेखांचा यात समावेश आहे; 'अप्पासाहेब' आणि 'बाबा'. अप्पासाहेब हे लेखकाचे आजोबा, सखाराम पुरुषोत्तम ऊर्फ अप्पासाहेब मराठे आणि बाबा हे लेखकाचे पिताजी सुरेश सखाराम मराठे. हे दोन्ही उद्योगमहर्षी. आज प्रसिद्ध असलेला मराठे उद्योगसमूह ही त्यांच्या मेहनत-परिश्रम-कल्पकतेचे प्रतीक. प्रतिकूल परिस्थितीतही शून्यातून विश्व निर्माण करण्याची क्षमता असलेले हे उद्योगपुरुष. त्यांचाच वारसा चालवणारे तिसर्‍या पिढीचे प्रतिनिधी लेखक यशवंत मराठे होत. त्यांचा उद्योगसमूह कसा उभा राहिला याचा इतिहास आणि व्यक्ती म्हणून असलेली जडणघडण या लेखांमधून वाचायला मिळते.

आचार्य रजनीश ऊर्फ ओशो - एक त्सुनामी, जोशीकाका, धन्वतरी, लतादीदी हे व्यक्तिचित्रण करणारे लेख आहेत. या लेखांतून केवळ व्यक्तिपरिचयच नाही तर त्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व, त्यांचे अनुभव, समाज आणि त्यांच्या भोवतीचे वातावरण या सगळ्यांचा परिपूर्ण असा वेध घेतलेला आहे.

लेखांना विषयांचे बंधन नाही. इतिहास, ज्योतिष, खगोलशास्त्र, विज्ञान, अध्यात्म, सामाजिक जीवन, संस्कृती असा विशालपट त्यांच्या लेखनातून वाचायला मिळतो. त्यातील बरीचशी माहितीही आकडेवारीसह, तपशिलासह दिलेली आहे, जी संदर्भ म्हणून नक्कीच उपयुक्त ठरते. 'गावगाडा' यात बारा बलुतेदार असतात तसे अठरा अलुतेदार असतात, त्यांची नावे या लेखात त्यांच्या संदर्भासह दिलेली आहेत. पंचागातले कोष्टक आणि त्यांची गणना सुलभपणे स्पष्ट करून सांगितलेली आहे, तिच्या आधारे कुणालाही या शुभ नि अशुभ तिथींची नोंद करता येईल. ढगाची अकरा प्रकारांत विभागणी, विजेची दहा प्रकारांत ओळख असते ती यातील लेखांवरून लक्षात येते. यासाठी प्रकांड गणिती वराहमिहिर व त्यांची बृहतसंहिता यांचा संदर्भ दिलेला आहे. 'बरखाराणी' हा पावसावरील लेख तसाच सुंदर आहे.

सामाजिक जीवनाचा आलेख काही लेखांतून आलेला आहे. बेरोजगारी या समस्येचे मूळ आणि त्यावरचे उपाय, मला उमगलेले अध्यात्म हा प्रत्येकाच्या मनातला विषय, यांचे विश्लेषण लक्षात घेण्यासारखे आहे. आज मुंबईत 'भय्या'कडे ज्या नजरेने पाहतो, त्याच नजरेने परदेशातील नागरिक त्यांच्या देशात भारतातून आलेल्या मुलांकडे पाहतात, ही दाहकता अस्वस्थ करणारी तरी वास्तववादी आहे.

या संग्रहातील सगळेच लेख हा अभ्यास, निरीक्षण आणि त्याच्या मुळाशी जाऊन केलेल्या संशोधनावर आधारित आहेत. त्यांची शैली उत्तम आहे. प्रत्येक मुद्दा स्पष्ट करणारी सहज सुलभ आणि वाचनीयता कायम ठेवणारी आहे. त्यामुळे ते संस्मरणीय आणि संदर्भमूल्य असलेले ठरते.

सुधीर जोगळेकर यांची प्रस्तावना या संग्रहाला लाभलेली आहे. स्वत: लेखकाचे मनोगतही त्यांची लेखनामागची प्रेरणा व्यक्त करते. मुखपृष्ठावर छपाईचे ठसे आणि लेखणी यांची योजना केलेली आहे. सतीश भावसारांची ही कल्पकता आशयाशी नाते सांगणारी आहे.

**मूल्य २०० रुपये   सवलतीत १२० रुपये**